
CMYK



आज मतदान करायचेच...

सोलापूर

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

धाराशिव | मंगळवार, ७ मे २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ३८ वे अंक १८६ | पाने १२ | किंमत रु. ६/-

RNI No. MAHMAR/2023/86468

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com

लोकशाहीचा उत्सव साजरा करु, मतदानाचा पवित्र हक्क बजावू

# सोलापूर, माढ्यात आज मतदान



## तिसऱ्या टप्प्यात राज्यातील आकरासह देशातील ९४ जागांचे भवितव्य होणार मतपेटीत बंद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मे-**

राज्यभरात चर्चेत आलेल्या सोलापूर आणि माढा लोकसभा मतदारसंघात मंगळवार, ७ मे रोजी मतदान होत असून तिसऱ्या टप्प्यात राज्यातील ११ लोकसभा जागांसह देशातील ९४ जागांचा फैसला या मतदानाने होणार असून या जागांवर उभे असलेल्या उमेदवारांचे राजकीय भवितव्य मतपेटीत बंद होणार आहे. सोलापूर लोकसभा मतदारसंघात भाजपा महायुतीचे उमेदवार आ. राम सातपुते आणि काँग्रेस महाआघाडीच्या उमेदवार आ. प्रणिती शिंदे यांच्यात तगडी लढत होत आहे. तर माढा लोकसभा मतदारसंघात भाजपा महायुतीचे उमेदवार खा. रणजितसिंह निंबाळकर आणि राष्ट्रवादी महाविकास आघाडीचे उमेदवार धैर्यशिल मोहिते-पाटील यांच्यात जंगी मुकाबला होत आहे.

लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यात १२ राज्यांतील ९४ जागांसाठी मंगळवारी मतदान होत आहे. यात महाराष्ट्रातील ११ जागांचा समावेश आहे. या निवडणुकीची आयोगाने जय्यत तयारी केली आहे.

तिसऱ्या टप्प्यात ९५ जागांसाठी मतदान होणार होते, पण गुजरातच्या सुरत मतदारसंघातील निवडणूक अविरोध झाल्याने आता ९४ मतदारसंघात मतदान होणार आहे. मतदान शांततेत आणि सुरळीत पार पडावे म्हणून कडेकोट सुरक्षा व्यवस्था करण्यात आली आहे. मतदान कर्मचारी ईव्हीएम मशीनसह मतदान केंद्रावर पोहोचले आहेत.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, नागरी उड्डयण मंत्री ज्योतिरादित्य शिंदे, आरोग्यमंत्री मनसुख मंडाविया, एमएमएमई मंत्री नारायण राणे, मध्यप्रदेशचे माजी मुख्यमंत्रिद्वय शिवराजसिंह चौहान आणि दिग्विजयसिंह यांच्यासह अनेक प्रमुख उमेदवारांचे भाग्य या मतदानाने ईव्हीएममध्ये बंद होणार आहे. ९४ मतदारसंघात १,३५१ उमेदवार रिंगणात आहेत.

### बारामतीकडे देशाचे लक्ष

बारामती मतदारसंघात शरद पवार यांच्या कन्या सुप्रिया सुळे आणि अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांच्यात होणाऱ्या लढतीकडे देशाचे लक्ष लागले आहे.

### महाराष्ट्रातील या ११ मतदारसंघात आज मतदान

तिसऱ्या टप्प्यात महाराष्ट्रातील ११ लोकसभा मतदारसंघात मतदान होणार आहे. यात माढा, सांगली, सातारा, लातूर, सोलापूर, रायगड, बारामती, कोल्हापूर, धाराशिव, हातकणंगले आणि रत्नागिरी-सिंधुदुर्गचा समावेश आहे.

# केजरीवालांवर आता 'एनआयए' बॉम्ब

## नायब राज्यपालांचे गृह मंत्रालयाला पत्र

**वृत्तसंस्था,**
**नवी दिल्ली, ६ मे**

खलिस्तानी दहशतवादी संघटना शिख्स फॉर जस्टिस अर्थात् एसएफजेकडून अरविंद केजरीवाल यांनी १.६० कोटी डॉलर्सचा निधी घेतला असून, त्याची एनआयए चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करणारे पत्र दिल्लीचे नायब राज्यपाल विजयकुमार सक्सेना यांनी केंद्रीय गृह मंत्रालयाला पाठवले आहे. त्यामुळे केजरीवाल यांच्या अडचणी वाढल्या आहेत. आम आदमी पार्टीने हा एक कट असल्याचा आरोप केला.

खलिस्तानी दहशतवादी देवेंद्रपाल भुल्लरची सुटका आणि खलिस्तानी भावना भडकवण्यासाठी कट्टरवादी गटांकडून केजरीवाल यांच्या आप पक्षाला १.६० कोटी डॉलर्स मिळाले, असा आरोप करीत विश्व हिंदू महासंघाने सक्सेना यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली होती. या तक्रारीच्या आधारे सक्सेना यांनी एनआयए चौकशी करण्यात यावी, अशी शिफारस गृह मंत्रालयाकडे केली आहे. ही तक्रार एका मुख्यमंत्र्याच्या विरोधात आहे आणि एका प्रतिबंधित दहशतवादी संघटनेकडून राजकीय पक्षाला मिळालेल्या निधीशी संबंधित आहे. त्यामुळे तक्रारदाराने दिलेले इलेक्ट्रॉनिक पुराव्यांसह संपूर्ण चौकशी आवश्यक असल्याचे या पत्रात म्हटले आहे.

एसएफजेचा प्रमुख आणि प्रतिबंधित दहशतवादी गुरपतवंतसिंग पन्नूने जारी केलेल्या एका व्हिडीओचा उल्लेख तक्रारीत करण्यात आला. २०१४ आणि २०२२ दरम्यान खलिस्तानी गटांनी आपला १.६० कोटी डॉलर्स दिल्याचा आरोप त्याने व्हिडीओत केला होता.



आंध्रप्रदेशच्या राजमुंद्री येथे सोमवारी आयोजित भाजपाच्या प्रचार सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा धनुष्यबाण देऊन सन्मान करण्यात आला.

# टी-२० विश्वचषकावर दहशतवादाचे सावट

**वृत्तसंस्था,**
**पोर्ट ऑफ स्पेन, ६ मे**

अमेरिका आणि वेस्ट इंडीज यांच्या संयुक्त विद्यमाने होणाऱ्या टी-२० विश्वचषकाला दहशतवादी धोका निर्माण झाला आहे, असे त्रिनिदादचे पंतप्रधान डॉ. कीथ रॉली यांनी सांगितले. राष्ट्रीय सुरक्षेच्या तयारीसाठी अतिरिक्त प्रयत्न केले जात आहेत. भारतासह २० संघांचा समावेश असलेली ही स्पर्धा १ जूनपासून सुरू होणार आहे.

पंतप्रधान डॉ. कीथ रॉली यांनी म्हटले की, दुर्दैवाने २१ व्या शतकातही दहशतवादाचा धोका जगात कायम आहे. ते म्हणाले की, येथे येणाऱ्या संघांना कोणताही धोका होणार नाही यासाठी स्पर्धेच्या संपूर्ण कालावधीत बारकाईने निरीक्षण केले जाईल. तथापि, धोके कमी करण्यासाठी आम्ही स्थानिक आणि प्रादेशिक स्तरावर सतर्क आहोत. वेस्ट इंडिजमधील विश्वचषकाचे सामने अँटिग्वा आणि बार्बुडा, बार्बाडोस, गयाना, सेंट लुसिया, सेंट व्हिन्सेंट, ग्रेनाडा, त्रिनिदाद आणि टोबॅगो येथे होणार आहेत.

## वडेट्टीवार... आरोप सिद्ध करा, अन्यथा कारवाईला सज्ज राहा!

**मुंबई :** सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर गोळी कसाबने मारली की अन्य कोणी, हा आता वादाचा मुद्दाच असू शकत नाही. मात्र, विजय वडेट्टीवारांनी रा. स्व. संघ आणि मुंबई पोलिसांवर केलेला आरोप नक्कीच गंभीर वादाचा मुद्दा असून, त्यांनी आरोप सिद्ध करावे अन्यथा कारवाईला सज्ज रहावे, असे दोनच पर्याय आहेत.

विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवारांनी अकलेचे तारे तोडण्यात दिग्विजय सिंहांनाही मागे टाकले आहे. त्यांनी मोठ्या आवेशात वक्तव्य केले, पण प्रकरण अंगलट आल्याचे लक्षात आल्यावर हे वक्तव्य माझे नाही. मी तर केवळ मुंबईचे माजी पोलिस महानिरीक्षक एस. एम. मुश्रीफ यांनी लिहिलेल्या 'हू किल्ड करकरे?' या पुस्तकाचा दाखला दिल्याचे ते सांगू लागले आहेत. मुळात बिहारचे माजी आमदार राधाकांत यादव यांनी याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयात सदर पुस्तकाच्या आधारे याचिका दाखल केली होती. ती याचिका न्यायालयाने ऑगस्ट २०१० मध्ये खारीज केली. त्यानंतर हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले आणि तेथे जुलै २०१८ रोजी न्या. ए. के. सिक्री व न्या. अशोक भूषण यांच्या न्यायासनाने याचिका खारीज करताना, तुमची शंका किंवा पुस्तक पुराव्यांत रुपांतरीत होत नाही, ज्याआधारे पुन्हा प्रकरण उघडून तपास करण्याचा आदेश द्यावा, अशा शब्दांत तत्कालीन पोलिस महानिरीक्षक राहिलेल्या एस. एम. मुश्रीफांना फटकारत याचिका खारीज केली. त्यावेळी उच्च आणि सर्वोच्च न्यायालयाने पुस्तक नव्हे, ठोस पुरावे आणा, असे ठणकावून सांगितले होते आणि वडेट्टीवार पुन्हा त्याच पुस्तकाचा पुरावा म्हणून दाखला देत आहेत.

# मंत्र्याच्या पीएच्या नोकराकडे सापडली कोट्यवधींची रोकड



**वृत्तसंस्था,**
**रांची, ६ मे**

झारखंडमधील मंत्री आलमगिर आलम यांच्या स्वीय सहाय्यक अर्थात् पीएच्या नोकराच्या घरावर छापेमारी करीत ईडीने सुमारे ३३ कोटी रुपयांची रोकड जप्त केली.

गादीखाना चौकातील इमारतीच्या खोलीत एका मोठ्या बॅगमधून तपास यंत्रणेचे अधिकारी नोटांचे मोठाले बंडल काढत असल्याचे छायाचित्रे आणि चित्रफितींमध्ये दिसून आले. यात तपास यंत्रणेचे काही अधिकारी दिसत आहेत.

झारखंडचे ग्रामीण विकास मंत्री आलम यांच्या पीएचा घरगडी येथे राहत असल्याचे सांगितले जात आहे. छापेमारी आणि जप्तीबाबत प्रतिक्रिया विचारण्यासाठी आलम यांच्याशी संपर्क साधला असता, कारवाईबाबत मला कोणतीही अधिकृत माहिती देण्यात आली नाही, असे सांगितले. मी टीव्ही पाहत असून, त्यावर सरकारने मला दिलेल्या स्वीय सहाय्यकाशी संबंधित ठिकाणावर छापेमारी केल्याचे सांगितले जात आहे, असे आलम यांनी सांगितले. नोकराच्या घरात सापडलेल्या घबाडामुळे ईडीचे अधिकारीही अवाक् झाले. अखेर त्यांनी नोट मोजण्याचे यंत्र मागवले. ही रोकड ३३ कोटी रुपयांच्या जवळपास असल्याचे सांगितले जात आहे. यात बहुतांश नोटा ५०० रुपयांच्या आहेत. काही दागिनेही जप्त करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# लोकशाहीचा महाकुंभ





## निवडणुकायन

### मुसाफिर हूँ यारों...



**'मुसाफिर हूँ यारों**
**ना घर हैं, ना ठिकाना**
**मुझे चलते जाना हैं**
**बस...चलते जाना'**

**१९७२** मध्ये जितेंद्रच्या 'परिचय' चित्रपटासाठी गुलजार यांनी हे अप्रतिम गाणे लिहिले. तेव्हा अगदी ५२ वर्षांपूर्वी त्यांना याची सूतरामही कल्पना नसावी की, त्यांच्या गाण्याच्या ओळी गांधी घराण्याच्या सुपुत्राला अगदी चपखल बसतील. ज्या पद्धतीने त्यांची मुशाफिरी चालते, त्यावरून तरी त्यांना 'मुसाफिर'च म्हटले पाहिजे. त्यांची भटकंती कायम एका मतदारसंघातून दुसरीकडे, एका देशातून दुसऱ्या देशात, एका खटल्यासाठी एका राज्यात तर दुसऱ्यासाठी आणखी कुठे अशी सुरूच असते.

वायनाडमधून त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला, तेथे मतदानही झाले. मग पुन्हा रायबरेलीत येण्याचे प्रयोजन काय? हे आता देशातील जनतेला पुरते कळले आहे. एकतर त्यांना वायनाडमध्ये जिंकण्याची शाश्वती नसावी किंवा आपला सुरक्षित गड सोडायचा नाही, ही भावना असावी. दोन्ही ठिकाणी मुद्दा असुरक्षिततेचाच आहे ना! ही असुरक्षितता आज निर्माण झालेली नाही. मागील १५ वर्षांपासून त्यांना राजकारणात 'सेटल' करण्याचा जीवतोड प्रयत्न सुरू आहे. मात्र, ते काही केल्या स्थिरावलेले नाहीत. बरे, कधीतरी सक्रिय झाले, असे वाटू लागताच ते थेट 'मामाच्या गावा'ला निघून जातात. (म्हणजे निदान असे सांगितले जाते... प्रत्यक्षात कुठे जातात, कोणालाच माहिती नाही म्हणे)

दुसरे असे की, त्यांच्या प्रतिज्ञापत्रातून हे स्पष्ट झाले आहे की, आजही त्यांचे स्वतःचे कोणते घर नाही. (संसारही नाही) मागील वेळी एका खटल्यात दोषी आढळल्याने त्यांना खासदारांसाठीचे सरकारी निवासस्थान सोडावे लागले होते. म्हणजे 'ना घर हैं, ना ठिकाना' ही ओळही त्यांच्यासाठीच आहे.

तिसरे म्हणजे, मागील काही महिन्यांपूर्वी त्यांनी 'भारत जोडो यात्रा' केली. बरेच पायी चालायचे बिच्चारे... दाढीही वाढली होती. प्रथम दक्षिण ते उत्तर आणि नंतर पूर्व ते पश्चिम असा त्यांचा प्रवास झाला. म्हणून 'मुझे चलते जाना है...बस्स...चलते जाना' या ओळीही त्यांच्यासाठी समर्पकच आहेत.

अमेठीतून मागील वेळी पराभवाचे चटके बसल्याने कानाला हात लावला आणि आता वायनाडपाठोपाठ त्यांनी रायबरेलीतून अर्ज भरला आहे. कुठे तरी तुक्का लागेलच, अशी भाबडी आशा काँग्रेसीजनांना आहे. ते कुठून तरी निवडून यावे, ही आशा खरेतर तमाम भारतीयांनाही आहे. कारण राहुल गांधी लोकसभेत नसतील तर सभागृहात चैतन्य कसे येणार? सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, पंतप्रधान मोदींची (त्यांच्या इच्छेविरुद्ध) थेट गळाभेट घेण्याची हिंमत दुसरे कोण करणार? ही हिंमत त्यांच्यातच आहे. इतक्या वर्षांत कोणत्या भाजपा नेत्याचीही तशी हिंमत झाली नव्हती. राहुल गांधी भर सभागृहात स्वतःचे स्थान सोडून मोदींकडे आले आणि त्यांनी बसलेल्या मोदींची गळाभेट घेतली. (नंतर मोदींनाही हसू आवरले नव्हते) अशा घटना आणि दृश्यांना देश मुकायला नको आणि इतक्या कार्यव्यस्ततेत असणाऱ्या मोदींना चेहऱ्यावर हसू फुलवित चार हलकेफुलके क्षण देणारा नेता देशासाठी खरे तर उपकारकर्ताच म्हटला पाहिजे. अशा नेत्याला दोन काय चार ठिकाणांहून अर्ज भरण्यासाठी प्रोत्साहित केले पाहिजे. कारण, ते संसदेत आणि राजकारणात असलेच पाहिजे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळापासून कोणत्याही नेत्याची इतकी गरज कधीच निर्माण झाली नव्हती, हे मान्य करायलाच हवे. ■

# भाजपाचे आमदार फोडण्याची उद्धव ठाकरेंची होती योजना

## मुख्यमंत्री शिंदे यांचा कार्यकर्ता मेळाव्यात गौप्यस्फोट

◆ **मुंबई, ६ मे**



भाजपा आमदारांच्या घरावर छापे टाकायचे आणि त्यांच्यावर दबाव आणून फोडण्याची योजना मुख्यमंत्रिपदावर असताना उद्धव ठाकरे यांनी आखली होती. विधिमंडळात भाजपाचे संख्याबळ कमी करण्यासाठी त्यांच्या आदेशावरूनच १२ आमदारांना निलंबित करण्यात आले होते, असा गौप्यस्फोट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी ठाणे येथे आयोजित कार्यकर्ता मेळाव्यातून केला.

महायुती व शिवसेनेचे उमेदवार नरेश म्हस्के यांच्या प्रचारासाठी घेतलेल्या मेळाव्यात मुख्यमंत्री म्हणाले, उद्धव ठाकरे यांना पाच वर्षे मुख्यमंत्रिपदावर राहायचे होते. फेसबुक लाईव्ह करून ते सरकार चालवायचे. कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांच्या समस्या ऐकायला ते कधीही वेळ देत नव्हते. कार्यकर्त्यांना ते घरगड्यासारखी वागणूक द्यायचे. त्यांच्या कारभाराला कंटाळून अनेक पदाधिकारी माझ्याकडे यायचे. ती सुद्धा अनेकदा त्यांची भेट घेण्याचा प्रयत्न केला; मात्र त्यांच्या सभोवताल असलेल्यांचा त्यांच्यावर इतका पगडा होता की, ते भेटायलाही वेळ देत नव्हते. मला राज्यसभा, विधान परिषदेच्या प्रक्रियेतून बाहेर काढले. भाजपाच्या अनेक नेत्यांना तुरुंगात टाकून मलाही संपवण्याचे कटकारस्थान रचले गेले. एका गुन्ह्यात माझे नाव गोवण्याचा प्रयत्न करण्यात आला. ◂*(तभा वृत्तसेवा)*

### दिघे यांचा छळ करणाऱ्यांचे नाव उघड करू

**मी कुणाकडे पद मागितले नाही. मला आनंद दिघे यांनी पुढे आणले. माझ्या दुःखाच्या प्रसंगी दिघे यांनी साथ दिली. दिघे यांनी आग्रह केल्याने मी सभागृह नेतेपद स्वीकारले. यावेळी पक्षातील अनेकांनी माझ्या नावाचा विरोध केला होता. राजन विचारे हे दिघे यांचे नकली शिष्य आहेत. दिघे यांना कुणी त्रास दिला, त्यांचा छळ कुणी केला, हे मला माहीत आहे. त्यांचे नाव उघड केले तर अनेकांना बाहेर तोंड दाखवायला जागा उरणार नाही. वेळ आल्यावर त्यांचीही नावे उघड करू, असा इशारा मुख्यमंत्र्यांनी दिला.** ■

# मी राजकारणातली सासू, अर्जुन खोतकर माझी सून

## रावसाहेब दानवेंची मिश्कील टिप्पणी

◆ **जालना, ६ मे**



अर्जून खोतकर हे राजकारणातील सून, तर मी सासू आहे. मी निधी आणायचा आणि तो खर्च करण्याची जबाबदारी खोतकर यांच्याकडे द्यायची, असे आमचे नाते असल्याची मिश्कील टिप्पणी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांनी प्रचारसभेतून केली.

गोलापांगरी येथे आयोजित सभेत दानवे म्हणाले, मी चांगले काम केले, त्यामुळेच तुम्ही मला खासदार केले. पैसा आणणे माझे काम आहे. मोदी यांच्या नेतृत्वात देशात विकासाचा धडाका सुरू आहे. सध्या देशाची अर्थव्यवस्था पाचव्या स्थानावर असून, लवकरच ती तिसऱ्या स्थानावर येईल. देशाला प्रगतिपथावर न्यायचे असेल, तर मोदी यांच्याशिवाय पर्याय नाही. देशातच नव्हे, तर मोदी जगातील सर्वांत लोकप्रिय नेते आहेत. शेजारी देशात मोदी यांची दहशत असून, आता देशात बॉम्बस्फोट करण्याची हिंमत करीत नाही. मोदी बोलत नाही, तर करून दाखवतात. मी विश्वास देतो की, मतदारसंघात विकासनिधीची कमतरता भासू देणार नाही. काँग्रेस पक्षाचे नेते सध्या पाकिस्तानला पूरक असे वक्तव्य करीत आहे. ६० वर्षांत देशाला खड्ड्यात घालण्याचे काम काँग्रेसने केले. त्यांना पुन्हा संधी देवू नका, असे आवाहन त्यांनी मतदारांना केले. ◂*(वृत्तसंस्था)*



हिमाचल प्रदेशच्या मंडी जिल्ह्यात भाजपा उमेदवार कंगना राणावतने प्रचाराचा धडाका लावला आहे. सोमवारी राज्याचे मुख्यमंत्री जयराम ठाकूर हे देखील कंगनासोबत प्रचारात सहभागी झाले होते

# विजय वडेट्टीवारांवर गुन्हा दाखल करण्याचा आदेश द्या

## भाजपाची निवडणूक आयोगाकडे मागणी

◆ **मुंबई, ६ मे**



२६/११च्या मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यात पोलिस अधिकारी हेमंत करकरे यांना लागलेली गोळी कसाबच्या बंदुकीतील नव्हती, तर रा. स्व. संघाशी समर्थित पोलिस अधिकाऱ्याने झाडली होती. हे सत्य वकील उज्ज्वल निकम यांनी न्यायालयापासून लपवून ठेवले, असा निखालस खोटा आरोप केल्याबद्दल विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्याविरुद्ध देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याचा आदेश द्या, अशी मागणी भाजपाने निवडणूक आयोगाकडे केली. प्रदेश भाजपातर्फे कायदा विभागाचे संयोजक ॲड. अखिलेश चौबे यांनीही मुंबईतील मरीन ड्राईव्ह पोलिस ठाण्यात वडेट्टीवार यांच्याविरुद्ध तक्रार दाखल केली आहे.

भाजपाने दिल्लीत निवडणूक आयोगाकडे दाखल केलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, वडेट्टीवार यांनी मुंबईवर २६ नोव्हेंबर २००८ रोजी झालेल्या हल्ल्यासंदर्भात ॲड. उज्ज्वल निकम यांच्या विरोधात अत्यंत खोटे, बदनामीकारक आरोप केले आहेत. त्या हल्ल्यात दहशतवाद्यांविरोधात प्राणाची पर्वा न करता लढणाऱ्या असंख्य योद्ध्यांच्या बलिदानाचीही वडेट्टीवार यांनी क्रूर थट्टा केली आहे. वडेट्टीवार यांनी केलेल्या बिनबुडाच्या आरोपांमुळे निकम यांची बदनामी झाली आहे तसेच निवडणूक आचार संहितेचेही उल्लंघन झाले. वडेट्टीवार यांच्या विधानाबाबत काँग्रेस पक्षाकडून अद्याप कोणतीही प्रतिक्रिया आलेली नाही. याचा अर्थ काँग्रेसची वडेट्टीवार यांच्या आरोपांना संमती असल्याचे दिसते. वडेट्टीवार यांच्या विधानांमुळे भादंवित देशद्रोहा संदर्भातील कलम १२४ अ आणि लोकप्रतिनिधी कायदा १९५१ कलम १२३ (४) चे उल्लंघन झाले आहे. त्यामुळे वडेट्टीवार यांना बिनशर्त माफी मागण्याचा आणि वडेट्टीवार व काँग्रेसविरुद्ध गुन्हा दाखल करण्याचा आदेश देण्यात यावा, निवडणुकीच्या उर्वरित कालावधीत वडेट्टीवार यांना प्रचार करण्यास बंदी करावी, आदी मागण्या भाजपाने आयोगाकडे केल्या आहेत. ◂*(तभा वृत्तसेवा)*

# पवारांनी लेकीसाठी लावली जोरदार फिल्डिंग

## जवळच्या सहकाऱ्यांना उतरवले मैदानात

◆ **बारामती, ६ मे**



बारामती लोकसभा मतदारसंघातील प्रचारतोफा रविवारी सायंकाळी थंडावल्या. मंगळवारी येथील जवळपास २३ लाख ७२ हजार मतदार शरद पवार यांच्या कन्या खासदार सुप्रिया सुळे तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांच्या भवितव्याचा फैसला करणार आहेत. पवार कुटुंबातील या हायव्होल्टेज लढतीच्या पृष्ठभूमीवर ८४ वर्षीय शरद पवार यांनी बारामतीचा किल्ला सर करण्यासाठी आपल्या विश्वासू सहकाऱ्यांना हाताशी धरून त्यांच्या खांद्यावर मतदारसंघातील बुथ केंद्रांची जबाबदारी सोपवली आहे.

शरद पवार यांनी बारामती मतदारसंघातील भोर, वेल्हा व मुळशी येथील बुथ केंद्रांची जबाबदारी आमदार संग्राम थोपटे यांच्यावर सोपवली. तर पुरंदरचा गड राखण्याची जबाबदारी आमदार रोहित पवार यांच्या मातोश्री सुनंदा पवार, संजय जगताप यांच्या खांद्यावर टाकण्यात आली आहे. इंदापूर भागात स्वतः रोहित पवार तळ ठोकणार आहेत, तर बारामतीची जबाबदारी अजित पवार यांचे सख्खे धाकटे बंधू श्रीनिवास पवार व त्यांचे सुपुत्र युगेंद्र पवार यांच्यावर सोपवण्यात आली आहे.

याशिवाय खडकवासला विधानसभा मतदारसंघातील बुथ केंद्रांची जबाबदारी सचिन दोडके यांच्याकडे देण्यात आली असून, दौंडचा किल्ला नामदेव ताकवने लढवणार आहेत. एवढेच नाही तर, पवार कुटुंबातील इतर सदस्यसुद्धा गरजेनुसार बुथ यंत्रणा सांभाळणार आहेत. ◂*(वृत्तसंस्था)*

# राहुल गांधींसाठी अखिलेश यांची रसद महत्त्वाची

◆ **नवी दिल्ली, ६ मे**



अमेठीऐवजी रायबरेलीतून निवडणूक लढविण्याचा निर्णय राहुल गांधी यांनी घेतला आहे. तेथे अखिलेश यादव यांच्या नेतृत्वाखालील समाजवादी पक्षाकडून पुरवली जाणारी रसद त्यांच्यासाठी मोलाची ठरणार आहे. मुख्य म्हणजे, काँग्रेसचा येथे परंपरागत मतदार असल्यामुळे त्याचाही फायदा राहुल यांना होणार आहे. त्यांची लढत भाजपाचे उमेदवार दिनेश प्रतापसिंह यांच्याशी होणार आहे.

राहुल गांधी यांनी उत्तरप्रदेशातून निवडणूक लढवली नसती, तर त्यांना पंतप्रधानपदाचे गंभीर उमेदवार मानले गेले नसते. शिवाय, राहुल हे प्रचार सभांतून सातत्याने मोदी यांना लक्ष्य करीत आहेत. भारतीय राजकारणात आजही उत्तरप्रदेशचे महत्त्व अबाधित आहे. म्हणूनच मोदी यांनीही दोन वेळा वाराणसी मतदारसंघातून आतापर्यंत निवडणूक लढवली. देशात आतापर्यंत झालेल्या १५ पंतप्रधानांपैकी नऊ जणांनी उत्तरप्रदेशातील मतदारसंघांतून निवडणूक जिंकली आहे.

राहुल यांचे आजोबा फिरोज गांधी यांच्याप्रमाणेच इंदिरा गांधी आणि त्यानंतर सोनिया गांधी यांनीही रायबरेलीतून निवडणूक लढवली होती. खरे तर, खुद्द राहुल हेही तीनदा अमेठीतून लोकसभेवर निवडून गेले होते. या पृष्ठभूमीवर अमेठीच्या तुलनेत रायबरेली सुरक्षित मतदारसंघ आहे, असे काँग्रेसच्या धुरिणांना वाटते. सुरुवातीला काँग्रेसमध्ये असाही एक मतप्रवाह होता की, राहुल यांनी रायबरेलीतून आणि प्रियांका यांनी अमेठीतून निवडणूक लढवावी. तो विचार मागे पडला आणि हिमाचल प्रदेशातील मंडी मतदारसंघातून प्रियांका यांनी निवडणूक लढवावी, यावर चर्चा झाली. मात्र, प्रियांका यांनी त्यास नकार दिला. आता गांधी कुटुंबाची रणनीती अशी आहे की, राहुल गांधी वायनाडमधून जिंकले, तर तेथे होणाऱ्या पोटनिवडणुकीत प्रियांका यांना संधी द्यायची. तसे संकेत काँग्रेसचे माध्यम सरचिटणीस जयराम रमेश यांनी दिले आहेत. ◂*(वृत्तसंस्था)*

# प्रचारासाठी आलेला गोविंदा उमेदवाराचे नावच विसरला

◆ **मावळ, ६ मे**

मावळ लोकसभा मतदारसंघात प्रचारादरम्यान एक वेगळीच घटना घडली आहे. अभिनेता गोविंदा महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारासाठी आला होता. यावेळी अचानक तो कोणाच्या प्रचारासाठी आला हेच विसरला. अखेर भाजपा आमदार उमा खापरे यांना त्यांना श्रीरंग बारणे यांचे नाव सांगावे लागले.

याचा व्हिडीओही सोशल मीडियावर व्हायरल झाला असून, चर्चा रंगल्या आहेत. महायुतीचे स्टार प्रचारक गोविंदा सध्या जोरदार प्रचार करताना दिसत आहेत. रविवारी श्रीरंग बारणेंच्या प्रचारासाठी गोविंदा मावळमध्ये उपस्थित होता, पण ज्यांच्या रोड शोसाठी गोविंदा मावळमध्ये आले, त्या बारणेंचे नाव शेजारी बसलेल्या भाजपाच्या आमदार उमा खापरेंना सांगावे लागले. हा सर्व प्रकार माध्यमांच्या कॅमेऱ्यात कैद झाला आहे. ◂*(वृत्तसंस्था)*

# गुजरातमध्ये सर्व २६ जागा जिंकण्याची भाजपा हॅट्ट्रिक करणार!

**श्यामकांत जहागीरदार**

◆ **नवी दिल्ली, ६ मे**

गुजरातमध्ये लोकसभेच्या गेल्या दोन निवडणुकांमध्ये २६ पैकी २६ जागा जिंकणारा भाजपा यावेळी पुन्हा २६ जागा जिंकत विजयाची आगळीवेगळी हॅट्ट्रिक करणार का, याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे. याची सुरुवात भाजपाने यावेळी सुरतची जागा अविरोध जिंकून केली आहे.

गुजरात हे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांचे गृहराज्य. त्यामुळे या राज्यातील निवडणुकीकडे सगळ्यांचे लक्ष राहणे स्वाभाविक म्हणावे लागेल. २०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत गुजरातमधील सर्व २६ जागा भाजपाने जिंकल्या होत्या. दिल्लीत आल्यानंतरही गुजरातवर आपली पकड असल्याचे यातून मोदी आणि शाह यांनी दाखवून दिले होते.



आपली पहिली निवडणूक मोदी यांनी गुजरातमधील बडोदा आणि उत्तरप्रदेशच्या वाराणसी मतदारसंघातून लढवली होती. दोन्ही ठिकाणी निवडून आल्यानंतर भविष्यातील राजकीय समीकरणाच्या दृष्टीने त्यांनी बडोदाच्या जागेचा राजीनामा देत वाराणसीची जागा कायम ठेवली होती. २०१९ ची लोकसभा निवडणूक मोदी यांनी वाराणसी या एकाच मतदारसंघातून लढवली होती. मोदी यांनी एकप्रकारे गुजरात सोडले असले तरी त्यांचे गुजरातवरील आणि गुजरातच्या जनतेचे त्यांच्यावरील प्रेम कायमच राहिले नाही, तर ते वृद्धींगतही झाले आहे. गृहमंत्री अमित शाह गुजरातची राजधानी गांधीनगरमधून लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात आहे.

केंद्रीय मंत्री पुरुषोत्तम रूपाला यांच्या एका विधानामुळे राजपूत समाज नाराज झाला होता. भाजपाने ही नाराजी दूर करण्यासाठी ऑपरेशन डॅमेज कंट्रोल तातडीने हाती घेतले. त्या विधानाबद्दल रूपाला यांनीही माफीही मागितली होती. त्यामुळे आज या मुद्याची तीव्रता तेवढी राहिली नाही.

राज्यातील प्रत्येक मतदारसंघ फक्त जिंकण्याचे नाही, तर किमान पाच लाख मतांनी जिंकण्याचे उद्दिष्ट भाजपाने ठेवले आहे. गुजरातचे तत्कालीन मुख्यमंत्री माधवसिंह सोळंकी यांनी क्षत्रीय, हरिजन, आदिवासी, मुस्लिम यांना हाताशी धरत खाम समीकरण तयार केले. या समीकरणाच्या आधारे काँग्रेसने राज्यात विधानसभेच्या १४४ जागा जिंकल्या होत्या. क्षत्रीय आणि राजपूत समाजाची नाराजी लक्षात घेता काँग्रेसने यावेळी पुन्हा खाम समीकरणाच्या आधारे भाजपाला अडचणीत आणण्याची व्यूहरचना ठरवली आहे. मात्र, ती यशस्वी होण्याची शक्यता नाही. ■

### बिहारमध्ये अपक्ष उमेदवाराचे अपहरण

◆ **सुपौल, ६ मे**

बिहारच्या सुपौल लोकसभा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार मोहम्मद कलीम खान यांचे तीन अज्ञातांनी त्यांच्या घरातून अपहरण केले. त्यांना मारहाण करून झाडाला लटकवण्यात आले. गावकऱ्यांनी त्यांना रुग्णालयात दाखल केले, जिथे त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

४५ वर्षीय मोहम्मद कलीम खान पिपरा पोलिस स्टेशन हद्दीतील थडी भवानीपूर वॉर्ड क्रमांक ७ मध्ये राहतात. ते अपक्ष उमेदवार म्हणून निवडणुकीच्या रिंगणात उभे आहेत. कलीम खान यांनी सांगितले की, रात्री दोन वाजता तीन अज्ञात लोकांनी घरातून बोलावले. बाहेर आल्यावर त्यांना गळा पकडून गाडीत बसवले. यानंतर त्यांनी घरापासून एक किलोमीटर दूर नेऊन मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यांना निवडणूक लढविण्याबाबत विचारले जात होते. ते लोक विचारत होते, तुम्ही का उभे आहात? तुम्ही कोणाला विचारून निवडणूक लढवत आहात, असे विचारले. ◂*(वृत्तसंस्था)*

# २०१४ मध्येच गुजरातमधून काँग्रेसचे अस्तित्व संपले

◆ **नवी दिल्ली, ६ मे**

२०१४ प्रमाणेच २०१९ मध्ये राज्यातील लोकसभेच्या २६ जागा भाजपाने जिंकल्या होत्या, पण २०१४ च्या तुलनेत २०१९ मध्ये भाजपाच्या मतांमध्ये २.९० टक्क्यांनी वाढ झाली होती. २०१४ मध्ये भाजपाने २६ जागा जिंकत ५९.१० टक्के मते मिळवली होती. २०१९ मध्येही भाजपाने २६ जागा जिंकल्या, पण यावेळी भाजपाच्या मतांच्या टक्केवारीत २.९० टक्क्याने वाढ होत ती ६२ वर गेली होती.

काँग्रेसला दोन्ही लोकसभा निवडणुकीत राज्यात एकही जागा जिंकता आली नसली तरी काँग्रेसची मतांच्या टक्केवारीत घट झाली नाही. २०१४ मध्ये काँग्रेसला ३२.९० टक्के मते मिळाली होती, २०१९ मध्ये ती ३२ टक्क्यांवर आली. २०१४ मध्ये अन्य पक्षांना ८ टक्के मते मिळाली होती. २०१९ मध्ये ती ६ टक्क्यांवर आली. म्हणजे, अन्य पक्षांची २ टक्के तर काँग्रेसची ०.९० टक्के भाजपाकडे गेली.

भाजपा राज्यातील सर्व २६ जागा स्वबळावर लढवत आहे. काँग्रेसने यावेळी आपशी आघाडी केली. काँग्रेस २४ तर आप २ जागा लढवत आहे. गुजरातचे वैशिष्ट्य म्हणजे, राज्यात भाजपा आणि काँग्रेस यांच्यात सरळ लढत होते. हे दोन पक्ष सोडून अन्य कोणत्याही पक्षाचा राज्यात फारसा प्रभाव नाही. नाही म्हणायला आता आप गुजरातमध्ये आपले अस्तित्व निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे. खेडा, कच्छ, सुरत, पाटन, भरुच, दाहोद, आणंद, अमरेली, जुनागड, महेसाणा, नवसारी, राजकोट, वलसाड, बडोदा, बारडोली, गांधीनगर, जामनगर, भावनगर, बनासकांठा, पंचमहल, साबरकांठा, सुरेंद्रनगर, छोटा उदयपूर, अहमदाबाद पूर्व आणि अहमदाबाद पश्चिम असे गुजरातमधील २६ लोकसभा मतदारसंघ आहे. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर झालेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने गुजरातमधील २६ पैकी २४ जागा जिंकल्या होत्या. भाजपाला त्यावेळी एक जागा मिळाली होती. १९८९ च्या निवडणुकीत भाजपाला १२ तर जनता दलाला ११ जागा मिळाल्या होत्या. १९९१ मध्ये भाजपाने २० जागा पटकावल्या. २००४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाने १४ तर काँग्रेसने १२ जागा जिंकल्या होत्या. २००९ मध्ये भाजपा १५ तर काँग्रेसला ११ जागा मिळाल्या होत्या. २००४ नंतर राज्यात भाजपाचा आलेख वाढत गेला. २०१४ नंतर राज्यातून काँग्रेसचे अस्तित्व आणि प्रभाव संपला. ◂*(तभा वृत्तसेवा)*



## राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

**मुंबई, दि.६ मे-**

लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त गिरगावातील खेतवाडी निधनस्थळी येथील शाहू स्मृतीस्तंभास सकाळी अभिवादन करण्यात आले. यावेळी १०० सेकंद स्तब्धता पाळून राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना आदरांजली वाहण्यात आली. यावेळी पर्यावरणमंत्री मंगल प्रभात लोढा त्यांना शाहू महाराज यांची फोटो बायोग्राफी भेट दिली. यावेळी स. पोलीस आयुक्त रवी सरदेसाई, राजश्री शाहू मालिकेचे दिग्दर्शक सतीश रणदिवे, पैलवान संग्राम कांबळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनय घोरपडे, उपायुक्त रावसाहेब सांगोलकर, पोलीस सागर पट्टणकुडी, विनायक गाजरे, शिवसेना शाखाप्रमुख शशिकांत पवार, बीजेपी संघटक अजय मिश्रा आदी उपस्थित होते.

## विजय वडेट्टीवार यांनी अकलेचे तारे तोडले

**मुंबई, दि.५ मे:**

विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी पुन्हा एकदा अकलेचे तारे तोडत पाकिस्तान धार्जिणी भूमिका घेतली. शहीद हेमंत करकरे यांच्यावर चाललेली गोळी पाकिस्तानी दहशतवादी अजमल कसाबची नव्हती असा जावईशोध वडेट्टीवार यांनी लावला आहे, असा अशी टीका भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली. वडेट्टीवार यांच्या वक्तव्याबाबत त्यांनी 'एक्स' वर मांडलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे, निवडणुकीत मतं मिळविण्यासाठी काँग्रेस किती खालच्या पातळीला जाणार? भाजपालाविरोध करण्यासाठी तुम्ही २६/११ मुंबई हल्ल्यातील दहशतवादी कसाबची बाजू घेता? थोडी तरी लाज बाळगा. जेव्हापासून मोदीजी सत्तेत आले दहशतवाद्यांचं कंबरडं मोडलं पण आज काँग्रेस दहशतवाद्यांसाठी अश्रू गाळत आहेत.

# आनंद दिघेंच्या संपत्तीवर उद्धव ठाकरेंचा होता डोळा

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा घणाघाती आरोप

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**ठाणे, ता. ६ मे :**

धर्मवीर आनंद दिघे साहेबांची लोकप्रियता वाढत होती. यशाच्या शिखरावर असताना त्यांना त्रास देण्याचे काम त्यांनी केले. इतकेच काय त्यांचे जिल्हाध्यक्षपद काढून घेण्याचे कारस्थान सुरु होते. दिघेंचे आयुष्य आश्रमात गेले मात्र जेव्हा निधन झाले तेव्हा दिघे साहेबांची कुठे कुठे प्रॉप्रटीवर आहे, असा पहिला प्रश्न उद्धव ठाकरेंनी विचारला होता. दिघे यांच्या प्रॉपर्टीवर उद्धव ठाकरेंचा डोळा होता, असा गंभीर आरोप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.

ठाणे लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार नरेश म्हस्के यांच्या प्रचारासाठी आयोजित महायुतीच्या कार्यकर्ता मेळाव्यात ते बोलत होते. मुख्यमंत्री म्हणाले की, दिघेंचे जिल्हाध्यक्षपद काढले तर ठाणे जिल्ह्यात पक्षच उरणार नाही, असे जेव्हा त्यांना समजले तेव्हा थांबले. त्यांनी उत्तराधिकारी म्हणून राज ठाकरेंचे नाव सुचवले म्हणून दिघेंना त्रास देण्यात आला




आनंद दिघे यांनी मला आयुष्यात उभे केले. तुला समाजासाठी काम करायचेय हे दिघेंचे शब्द आजही कानात घुमतात. धर्मवीर सिनेमात यासंदर्भात राजन विचारे यांनी राजीनामा देऊ केल्याचा दाखवलेला प्रसंग काल्पनिक आहे. प्रत्यक्षात त्यावेळी राजन विचारे राजीनाम देण्यास तयार नव्हते. जेव्हा दिघे साहेबांनी त्यांच्या भाषेत समजावले तेव्हा विचारे यांनी राजीनामा दिला. आता खरी वस्तुस्थिती सिनेमाच्या दुसऱ्या भागात समोर येईल, असे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १० वर्षात एकही सुट्टी घेतली नाही. महायुतीकडे नेशन फर्स्ट आहे तर महाविकास आघाडीकडे कट ,करप्शन ,कमिशन आहे, मी फार प्रेमळ आहे पण ठरवले तर करेक्ट कार्यक्रम करतो, मी कार्यकर्ता म्हणून प्रचाराला जातो, मुख्यमंत्री म्हणून नाही. मी जिथे जातो तिथे विरोधकांचा बाजार उठून जातो, अशी टीका त्यांनी केली.

# नकली हिंदुत्ववादी गप्प का?

### मुख्यमंत्री मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा उद्धव ठाकरेंचा सवाल

**तभा वृत्तसेवा। विशेष प्रतिनिधी**
**ठाणे, दि.६ मे-**

विरोधी पक्षनेते विजय वड्डेटीवारांनी २६/११ हल्ल्यातील शहिद पोलिसांबाबत केलेल्या संतापजनक वक्तव्यावर काँग्रेसच्या मांडीला मांडी लावून बसलेले नकली हिंदुत्ववादी गप्प का? असा सवाल मुख्यमंत्री मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंना विचारला आहे. सोमवारी पत्रकारांशी बोलताना त्यांनी काँग्रेस का हाथ पाकिस्तान के साथ असल्याची टीका केली.

मुख्यमंत्री म्हणाले की, विजय वड्डेटीवाराचे वक्तव्य प्रचंज चीड आणि संताप आणणारे आहे. भारत जोडो नाही भारत तोडो यात्रा करणाऱ्या राहुल गांधींच्या नादाला लागून वड्डेटीवार वेडे झालेत. आरएसएस ही नसानसात राष्ट्रभक्ती भरलेली संघटना आहे, उज्वल निकम यांनी अनेक देशद्रोह्यांना फासावर लटकले, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

काँग्रेसचे धोरण पाकिस्तान धार्जिणे आहे. पाकिस्तानच्या वक्तव्याला हो करणारे वक्तव्य काँग्रेसच्या नेत्याकडून होणे हे दुर्दैवी आहे. त्यांच्या मांडीला मांडी लावून बसताना जनाची नाही तर किमान मनाची लाज बाळगायला हवी होती, असा टोला मुख्यमंत्र्यांनी उद्धव ठाकरे यांना लगवला.

नकली हिंदुत्व, मी हिंदू आहे, मी मर्द आहे असे बोलून कोणी हिंदू होत नाही. आज हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे असते तर यांना चांगलेच धुतले असते, असे मुख्यमंत्री म्हणाले.

मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तानशी बदला घेतला जाईल, अशी अपेक्षा होती, मात्र केंद्रात आणि राज्यात काँग्रेसचे सरकार होते. त्यामुळे ही अपेक्षा फोल ठरली. नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यानंतर बालाकोटमध्ये सर्जिकल स्ट्राईक करुन भारत मजबूर नाही तर मजबूत देश आहे, असे दाखवून दिले. 'काँग्रेसचा हाथ पाकिस्तान के साथ' असे म्हणणे वावगे ठरणार नाही. जेव्हा काँग्रेस निवडणुकीत जिंकतो तेव्हा पाकिस्तानात फटाके फुटतात. जेव्हा भारत मॅच हरतो तेव्हा पाकिस्तानात फटाके फुटतात. काँग्रेस इतकी वर्ष सत्तेत असताना देखील काश्मिरबाबत बोटचेपी धोरण ठेवले. अशी टीका मुख्यमंत्री शिंदे यांनी केले.

# उत्तर पश्चिम लोकसभा मतदारसंघातील लढाई असली विरुद्ध नकली : ॲड. शेलार

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.५ मे :**

उत्तर पश्चिम मुंबई लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार रवींद्र वायकर यांच्या प्रचाराचा नारळ शनिवारी मुंबई भाजप अध्यक्ष आमदार ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते वाढवण्यात आला. या मतदार संघातील लढाई असली विरुद्ध नकली अशी आहे, असा टोला त्यांनी लगावला.

मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार रवींद्र वायकर यांच्या प्रचारार्थ काल संध्याकाळी महायुतीची जाहीर सभा गोरेगाव बांगूर नगर येथे झाली. पाकिस्तानची भाषा बोलणारे आणि दहशतवाद्यांना घरात घुसून मारणाऱ्यांमधली ही लढाई आहे, अशी भूमिका यावेळी आमदार शेलार यांनी मांडली. त्यामुळे ही लोकसभा निवडणूक देशासाठी महत्त्वाची असून मतदारांनी असली शिवसेनेचे उमेदवार रवींद्र वायकर यांना भरघोस मतांनी विजयी करावे, असे आवाहन यावेळी केले. ज्या काँग्रेसने मुंबईला केंद्रशासित केले, महाराष्ट्रापासून तोडण्याचा



प्रयत्न केला, संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यामध्ये ज्या काँग्रेसने आंदोलन करणाऱ्यांवर गोळ्या झाडल्या, त्या काँग्रेसशी उद्धव ठाकरे यांनी हात मिळवणी केली आहे. यावेळी खासदार गजानन कीर्तिकर म्हणाले की, नरेंद्र मोदी यांच्या सोबत संसदेत काम करण्याची मला संधी मिळाली. ३७० कलम हटवले गेले, असे अनेक ऐतिहासिक निर्णय झाले, त्या ऐतिहासिक निर्णयांचा मला साक्षीदार होता आले. यावेळी आमदार अमित साटम, विद्या ठाकूर आदी उपस्थित होते.

# बीकेसीतून बनावट नोटाचा साठा जप्त

**तभा वृत्तसेवा। विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.५ मे-**

लोकसभा निवडणुकीतील तिसऱ्या टप्प्यातील मतदानासाठी दोन दिवसाचा असताना मुंबई पोलिसांनी बनावट नोटा तयार करणाऱ्यांचे मोठे रॅकेट उघड केले आहे. शनिवारी रात्री वांद्रे-कुर्ला संकुल येथील भारतनगर परिसरात बनावट नोटा तयार करणाऱ्या एका कारखान्यावर पोलिसांनी धाड टाकून मोठ्या प्रमाणात बनावट नोटा जप्त केल्या आहेत. या कारवाईमुळे खळबळ उडाली आहे. येथे ५, १०, २०, १०० आणि ५०० रुपयांच्या बनावट नोटा तयार केल्या जात होत्या.

मुंबई पोलिसांना बीकेसी येथे एक बनावट नोटा तयार करण्याचा कारखाना सुरू असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पथक तयार करून धाड टाकण्यात आली. या याठिकाणी बनावट नोटा तयार करण्याचे काम सुरू असल्याचे त्यांना दिसले. या प्रकरणी काही जणांना अटक करण्यात आली आहे.


तसेच बनावट नोटा आणि त्यासाठी लागणाऱ्या कागदाचा साठा पोलिसांनी जप्त केला आहे. या प्रकरणी नौशाद शाह, अली सय्यद या दोघांना अटक करण्यात आली असून त्यांना न्यायालयाने ५ दिवसांची पोलिस कोठडी ठोठावली आहे. पोलिस सध्या आरोपींची चौकशी करत आहेत. बिकेसीत हा कारखाना चालवला जात होता.


सोलापूर तरुण भारत

**सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील तमाम मतदार बंधू आणि भगिनींना विनम्र आवाहन....**

राष्ट्रहितासाठी प्रत्येकाने मतदानाचा अधिकार बजावणे हे आपले आद्य कर्तव्य आहे. आपण बजाविलेल्या पवित्र अशा मतदान हक्क कर्तव्याच्या राष्ट्रकार्याचे कौतुक आम्ही करणार आहोत. दैनिक सोलापूर तरुण भारत आणि वृत्तवेध चैनल च्या वतीने आपणास सूचित करण्यात येते की, आपण आपला मतदानाचा हक्क नक्की बजावावा. आपल्या परिवारासह मतदानाचा हक्क बजावून परिवारासहचा एकत्रित मतदान केल्याचा फोटो आम्हाला starunbharat@gmail.com या ईमेलवर आवश्य पाठवावा.

आपण परिवारासह केलेल्या मतदानाचा एकत्रित फोटो दैनिक 'तरुण भारत' मध्ये प्रसिद्ध करू आणि 'वृत्तवेध चैनल' वर देखील प्रसारित केला जाईल.



प्रशांत माने
निवासी संपादक
दैनिक सोलापूर तरुण भारत
वृत्तवेध चॅनल, सोलापूर.
98811 91443



चला तर मग आपण परिवारासह आपला मतदानाचा पवित्र हक्क बजावून राष्ट्रहिताचे कर्तव्य पार पाडू या.


# राष्ट्रवादीच्या घडयाळाची टिकटिक वाजणार की तुतारी?

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**शिरूर, दि.५ मे :**

पश्चिम महाराष्ट्रातील महत्त्वाच्या लोकसभा मतदारसंघापैकी एक असलेल्या शिरुरमध्ये यंदा पुन्हा दोन मातब्बर नेत्यांच्या लढतीमुळे वातावरण तापले आहे. विद्यमान खासदार अमोल कोल्हे व माजी खासदार शिवाजीराव आढळराव-पाटील यांनी दंड थोपटले आहेत.

शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर राज्याबरोबरच या जिल्ह्यातील राजकारणाची सगळी संदर्भ बदलली आहेत. गेल्या लोकसभेपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केलेले कोल्हे हे अनेक आमिषे, प्रलोभने असतानाही शरद पवारांची एकनिष्ठ राहिले. तर पाटील यांनी सेनेतील फुटीनंतर शिंदे गटात आणि उमेदवारी मिळविण्यासाठी अजित पवार यांच्या पक्षात प्रवेश करत हाती घड्याळ बांधून घेतले. त्यामुळे असली व नकली राष्ट्रवादी मध्येच खरी झुंज होत असून घड्याळाची टिकटिक वाजते की तुतारी? याबद्दल सर्वांना उत्सुकता लागून राहिलेली आहे. या ठिकाणी वंचितच्या आफताब शेखसह अन्य अपक्ष ही रिंगणात आहे. मात्र त्यांचा दुरंगी लढतीवर फारसा परिणाम होणार नाही.

ऐतिहासिकदृष्ट्या या मतदारसंघाला विशेष महत्त्व आहे. याठिकाणी शिवाजी महाराजांचे जन्मस्थळ 'शिवनेरी', छत्रपती संभाजी महाराजांचे समाधीस्थळ 'वढू-तुळापूर', ज्ञानेश्वर महाराजांनी जीवंत समाधी घेतलेले 'आळंदी', बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेले भीमाशंकर, हुतात्मा राजगुरुंचे जन्म स्थळ राजगुरुनगर (पूर्वीचे खेड) यांसारख्या स्थळांचा समावेश आहे.

शिरुर हा सुरुवातीच्या काळात काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला होता. मात्र त्यानंतर शिवसेनेच्या भगव्याचे या ठिकाणी वर्चस्व राहिले. या मतदारसंघावर








**रणसंग्राम लोकसभेचा; लक्षवेधी लढत**

**शिरूर लोकसभा मतदारसंघ**

काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या आमदारांचे प्राबल्य असतानाही आढळराव यांनी सलग तीनवेळा या मतदारसंघात विजय मिळवण्याची किमया साधली होती.

या लोकसभा मतदारसंघात जुन्नर, आंबेगाव, खेड-आळंदी, शिरूर, भोसरी, आणि हडपसर या सहा विधानसभा मतदारसंघांचा समावेश आहे. यापैकी जुन्नरमध्ये अतुल बेनके, आंबेगावमध्ये दिलीप वळसे-पाटील, खेडमध्ये दिलीप मोहिते पाटील, शिरुरमध्ये अशोक पवार, भोसरीत भाजपचे महेश लांडगे तर हडपसरमध्ये चेतन तुपे हे आमदार आहेत.

शिरुरमध्ये आढळराव यांचा पराभव करणे ही २०१९ पर्यंत अशक्यप्राय बाब मानली जात होती. अमोल कोल्हे हे टेलिव्हिजनवरील 'राजा शिवछत्रपती' आणि 'स्वराज्यरक्षक संभाजी' या मालिकांमुळे प्रचंड लोकप्रिय झाले होते. शरद पवारांनी त्यांना शिवसेनेतून आपल्या पक्षात घेतले आणि शिरुरमधून रिंगणात उतरवले. तरीही ते आढळराव पाटील यांच्यासमोर

**खा. अमोल कोल्हे यांच्या सकारात्मक बाबी**

- ✻प्रभावशाली व्यक्तिमत्व व उत्कृष्ट वक्तृत्व शैली
- ✻ दूरचित्रवाणीवरील ऐतिहासिक भूमिकामुळे घराघरात ओळख
- ✻बैलगाडा शर्यती व अन्य महत्त्वाच्या प्रश्नांचा संसदेत पाठपुरावा.

**नकारात्मक बाबी**

- ✻ केवळ अभिनेता म्हणून विरोधकांकडून होणारा अपप्रचार
- ✻ गेल्या निवडणुकीत प्रचाराची सूत्रे सांभाळणारे अजित पवार यांच्याकडून विरोधात सर्वशक्ती पणाला
- ✻ प्रचारासाठी अन्यत्र मागणी असल्याने मतदारसंघात कमी वेळ.

**शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या सकारात्मक बाबी**

- ✻ निवडणुकीतील डावपेचात मुरब्बी
- ✻ महायुतीची प्रचंड प्रचार यंत्रणा
- ✻ उपमुख्यमंत्री अजित पवारांसाठीचीही प्रतिष्ठा पणाला

**नकारात्मक बाबी**

- ✻ सततच्या पक्षांतरामुळे नकारात्मक प्रतिमा
- ✻ उद्धव ठाकरे व शरद पवार यांच्याबद्दल मतदारांमधील सहानुभूती
- ✻ प्रतिस्पर्धी उमेदवाराच्या तुलनेत वक्तृत्व शैलीचा अभाव

टिकाव धरु शकतील, का याबाबत शंका होती. मात्र, त्या निवडणुकीत त्यांची एक चूक त्यांना भोवल्याचे सांगितले जाते. प्रचारादरम्यान त्यांनी अमोल कोल्हे यांच्या जातीचा उल्लेख केला. त्यामुळे मतदारांची अमोल कोल्हे यांना सहानुभूती वाढली आणि ते कोल्हे जायंट किलर ठरले. गेल्या पाच वर्षांमध्ये अमोल कोल्हे यांनी संसदेत प्रभावी कामगिरी केली आहे. लोकसभेतील उपस्थितीपासून ते प्रश्न विचारण्यापर्यंत अमोल कोल्हे यांनी आपली एक वेगळी प्रतिमा निर्माण केली आहे. एक अभ्यासू आणि संयमीपणे खासदार म्हणून त्यांचा लौकिक वाढला आहे. त्यामुळे त्यांना तीनवेळा संसदरत्न पुरस्कार मिळाला आहे.

अंगभूत वक्तृत्व, अभिनय शैली व कौशल्यामुळे ते आपला मुद्दा प्रभावीपणे मतदार आणि जनतेपर्यंत पोहोचवतात. त्यामुळे निवडणुकीच्या काळात होणाऱ्या शाब्दिक द्वंद्वामध्ये कोल्हे हे आढळराव यांच्यापेक्षा काहीसे वरचढ ठरताना दिसतात. या मतदारसंघात खेड, चाकण, भोसरी, रांजणगाव यांसारख्या औद्योगिक क्षेत्राचा समावेश होतो. गेल्या काही वर्षांमध्ये या मतदारसंघात विकासामुळे शेतीचे क्षेत्र झपाट्याने कमी होत चालले आहे. त्यामुळे शेतकरी वर्ग न्यायाच्या प्रतीक्षेत आहे. याशिवाय,या मतदारसंघात बैलगाडा हा मुद्दा जिव्हाळ्याचा आहे. सर्वोच्च न्यायालयाने अलीकडेच बैलगाडा शर्यतीवरील बंदी उठवली होती. यावरुन श्रेयवादाचे राजकारण रंगले होते. परंतु, निवडणुकीत बैलगाडा चालक आणि बैलगाडाप्रेमी कोणाच्या पारड्यात मत टाकणार, हे पाहावे लागेल. याशिवाय, मराठा आरक्षण आंदोलन, ओबीसी मोर्चाचा परिणाम या निवडणुकीवर झालेला दिसून येईल.







जनहितार्थ जारी

मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो;
मतदान करू, राष्ट्रहिताचे कर्तव्य पार पाडू



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# उधळले बेताल जिभेचे वारू...

काहीही करून राजकारणातील सभ्यतेची आणि संस्कृतीची पातळी सोडायचीच, असे एकदा ठरविल्यावर देशाच्या प्रतिष्ठेला, सुरक्षेला आणि राजकारणाच्या नैतिकतेला वेठीस धरण्याची काँग्रेसची सवय नवी नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी नेहमी ज्यांचा उल्लेख 'शहजादा' असा करतात ते काँग्रेसचे सर्वोच्च नेते राहुल गांधी यांनी परदेशातील विविध व्यासपीठांवरून मुलाखती देताना देशाच्या ऐक्याविषयी, समाजस्वास्थ्याविषयी आणि धार्मिक भावनांविषयी केलेल्या काही अप्रिय वक्तव्यांमुळे अकारण वाद ओढवून घेतल्याच्या अनेक घटना देशाला आठवत असतील. भारत हे प्राचीन काळापासून एकसंध राष्ट्र आहे आणि भारतीयत्व हा या राष्ट्राचा आत्मा आहे. या राष्ट्रात विविध धर्म, प्रांत, पंथ, भाषा, संस्कृती आपापल्या परंपरा जपत ऐक्यभावनेने हजारो वर्षांपासून नांदत असताना, त्यांना प्रांतभेदामध्ये, धर्मभेदामध्ये गुरफटवून किंवा जातीय द्वेषाची बीजे रुजवून समाजाच्या या ऐक्याला धक्का देण्याचे प्रयोग राजकीय स्वार्थासाठी नेहमीच सुरू असतात. मोदी सरकार सत्तेवर आल्यापासून व देशात प्रचंड जनाधार प्राप्त झाल्यापासून सत्तेची स्वप्नेदेखील दुरापास्त झाल्यामुळे वैफल्याच्या गर्तेत गुरफटलेले अनेक नेते संयम सोडून बेताल वक्तव्ये करू लागली आहेत. १० वर्षांपूर्वी, जेव्हा मोदी सरकारला देशाने प्रचंड बहुमताने विजयी करून देशाची सत्ता भाजपाच्या हाती सुपूर्द केली, तेव्हा सत्तेची ऊब हरपल्यामुळे नैराश्यग्रस्त झालेल्या काही नेत्यांमध्ये काँग्रेसचे नेते पहिल्या रांगेत होते. त्याच वेळी काँग्रेसचे नेते मणिशंकर अय्यर यांनी पाकिस्तानला घातलेले एक साकडे देशाला कधीच विसरता येणार नाही. नोव्हेंबर २०१५ मध्ये एका विदेशी वाहिनीवरील चर्चेत मणिशंकर अय्यर यांनी पाकिस्तानी नेत्यांकडे मोदी सरकारला हटविण्यासाठी मदत करण्याचे साकडे घातले होते. त्यावरून गदारोळ माजला होता आणि 'ही मागणी तुम्ही पाकिस्तानच्या आयएसआयकडे करत आहात का?' असा सवालही त्यांना विचारला गेला होता. त्यामुळे मोदी सरकार हटविणे हे काँग्रेसचे कायम उद्दिष्ट असले, तरी मतपेटीच्या माध्यमातून पुन्हा सत्तेवर येणे शक्य नाही, या निराशाजनक जाणिवेने काँग्रेसी नेत्यांनी आपल्या सत्तेच्या राजकारणासाठी देशाच्या प्रतिष्ठेला वेठीस धरण्याचे धोरण ठरविले असावे, या शंकेची पाळेमुळे तेव्हापासूनच भारतातील जनतेच्या मनात रुजली आहेत. राहुल गांधी यांनीदेखील परदेशात जाऊन भारतातील लोकशाहीच्या पुनर्स्थापनेसाठी मदतीचे साकडे घालणारे सूर आळविले होते. मोदी सरकारच्या सत्ताकाळात भारतातील लोकशाही धोक्यात असल्याचा कांगावा तर परदेशातील मुलाखतींदरम्यानच्या त्यांच्या सुरातून नेहमीच ओसंडत असल्याने, ते साकडे म्हणजे भारताच्या स्वाभिमानावर व प्रतिष्ठेवर परदेशात जाऊन शिंतोडे उडविण्याचाच प्रकार ठरला होता. सत्तेच्या राजकारणासाठी देशाला वेठीला धरणे, देशाच्या अस्मिताचिन्हांविषयी अनुदार उद्गार काढणे, अहोरात्र डोळ्यात तेल घालून सजगपणे देशाच्या सीमांचे संरक्षण करणाऱ्या शूर जवानांच्या शौर्यावर प्रश्नचिन्हे उमटविणे हा विरोधकांच्या राजनीतीचाच एक भाग झाला आहे. मोदी सरकारने स्वीकारलेल्या शून्य सहनशीलता धोरणाचा धागा म्हणून पाकिस्तानात घुसून तेथील दहशतवाद्यांचे हल्ले नेस्तनाबूत करण्याच्या सैन्याच्या शौर्याचे पुरावे मागण्यापर्यंत व त्या कारवाईविषयी जनतेच्या मनात संभ्रम पेरण्यापर्यंत या राजकारणाची मजल गेली होती. अशा राजनीतीने कळसाध्याय गाठला असून आता त्याच राजनीतीचा नवा अंक पुन्हा एकदा पटलावर येऊ पाहात आहे. सत्ताधारी पक्षाच्या नेत्याची प्रतिमा मलिन करण्याच्या धोरणाचा भाग म्हणून देशाच्या संरक्षणसिद्धतेसारख्या संवेदनशील मुद्यावरच वादळे उठविली जात असतील, तर अशी राजनीती देशाला कोणत्या दशेकडे घेऊन जाईल, याचा विचार समाजातील विवेकशील घटकांनी अवश्य करावयास हवा.

जम्मू-काश्मीरच्या पूंछ जिल्ह्यात शनिवारी भारतीय हवाई दलाच्या ताफ्यावर झालेल्या दहशतवादी हल्ल्यात हवाई दलाचे पाच जवान जखमी झाले. पैकी एकाचा लष्करी रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. त्या जवानाचे हौतात्म्य वाया गेलेले नाही. या घटनेनंतर लगेचच सुरक्षा दलांनी हल्ल्याची पाळेमुळे खणून काढण्यास सुरुवात केली आणि शोपियान जिल्ह्यातून दहशतवाद्यांच्या दोघा कथित साथीदारांना अटक केली. त्यांच्याकडील शस्त्रास्त्रे व दारूगोळाही जप्त केला. या कटाची उकल आता होऊ लागली असून लष्कर-ए-तोयबा या अतिरेकी संघटनेचा या हल्ल्यात हात असल्याच्या संशयास पुष्टी देणारे काही धागेदोरे हाती लागत आहेत. अशा कारवायांपासून देशाचे आणि देशाच्या जनतेचे संरक्षण करण्यासाठी सदैव सज्ज असलेल्या जवानांना नैतिक धैर्य देण्याकरिता उभा देश त्यांच्या पाठीशी असल्याची भावना सदैव व्यक्त करत असताना, काही नेत्यांना मात्र, पुन्हा एकदा निवडणुकीच्या राजकारणाचे भांडवल करण्याकरिता या हल्ल्याचा मुद्दा हाती सापडल्याचा आसुरी आनंद लपविता आलेला नाही, हे दुर्दैवी आहे. निवडणुकांचे निकाल लागल्यानंतर या हल्ल्याची सडेतोड परतफेड केली जाईल, असा इशाराही काँग्रेसच्या नेतृत्वाखालील इंडी आघाडीने दिल्याचे सांगण्यात येते. निवडणुकीच्या राजकारणात अलगदपणे या संवेदनशील आणि नाजूक मुद्याचे भांडवल करण्याचा हा नवा प्रयत्न असावा. तसेही, या हल्ल्यावरून काँग्रेसच्या पंजाबमधील एका नेत्याने पुन्हा एकदा मागच्याच इतिहासाची पुनरावृत्ती केली आहे. पुलवामा हल्ल्याच्या घटनेवरून संशयाचे भूत उभे करण्याचा प्रयत्न अधूनमधून उघड होतच असतो. अलिकडे मुंबईवरील पाकिस्तानी दहशतवादी हल्ल्यातील अतिरेकी कसाबच्या चकमक प्रकरणावरूनही विनातथ्य आरोपांचे शिंतोडे उडविण्याचा पोरकट प्रकारही उघडकीस आला आहे. त्यात भर घालण्यासाठी काँग्रेसी संस्कृतीचे पाईक असलेले पंजाबचे माजी मुख्यमंत्री चरणजितसिंग चन्नी यांनीही या हल्ल्याचे वर्णन 'भाजपाचा निवडणूकपूर्व स्टंट' असे केले आहे. राजकारणात परस्परांवर चिखलफेक होत असते. एकमेकांवर आरोप-प्रत्यारोपही होत असतात, पण ज्या घटनेत एका देशभक्त जवानास हौतात्म्य पत्करावे लागले, ज्या घटनेनंतर अतिरेकी कारवायांची पाळेमुळे खणून काढण्याच्या लष्करी मोहिमा तीव्र झाल्या आणि पुन्हा एकदा दहशतवादग्रस्त जनतेला निर्धास्त वाटण्याजोगे वातावरण प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नांतून ज्या लष्करावरील विश्वास दृढ झाला, त्या घटनेचे वर्णन 'निवडणूकपूर्व स्टंटबाजी' असे करून काँग्रेसी मानसिकतेच्या चन्नी यांनी या घटनेच्या संवेदनशीलतेलाच संशयाच्या भोवऱ्यात ढकलण्याचे राजकारण साधले आहे. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, काँग्रेसचे नेते राहुल गांधी आणि सोनिया गांधी यांनी चन्नी यांच्या या वक्तव्याबद्दल माफी मागावी, अशी मागणी भाजपाने केली आहे. मात्र, ज्या काँग्रेसने अशा घटनांचा राजकीय फायद्यासाठी स्वार्थी वापर करण्याचा प्रयत्न याआधीही केला होता, त्या पक्षाचे नेते अशा वक्तव्यांचा निषेध करणार नाहीत आणि माफीदेखील मागणार नाहीत, हे स्पष्ट आहे. निवडणुका जिंकण्यासाठी असे हल्ले घडविले जात असतील तर १९६२, १९६५ आणि १९७१ मधील लढायादेखील निवडणुका जिंकण्यासाठी झाल्या होत्या का, या प्रश्नावर काँग्रेसला स्पष्टीकरण द्यावे लागेल. मणिशंकर अय्यर यांच्या त्या वक्तव्यानंतरही असाच गदारोळ झाला, राहुल गांधी यांच्या विदेशातील मुलाखतींनंतरही अशीच वादळे उठली आणि चन्नी यांच्या बेताल वक्तव्यानंतरही तेच वादळ पुन्हा उफाळले असले, तरी निवडणुकीच्या राजकारणात सैन्याच्या शौर्यास वेठीला धरून देशाच्या संरक्षणासारखा संवेदनशील मुद्दा ऐरणीवर आणण्याच्या या प्रयत्नांची विवेकी चिकित्सा व्हावयास हवी. तसेही, बेताल बडबड करून गंभीर मुद्यांचे भरित करण्याच्या राजनीतीला सध्याच्या निवडणुकीच्या रणधुमाळीत भलतीच भरती आली आहे; त्यात आपण मागे पडू नये आणि दुर्लक्षितही राहू नये या भावनेने असे चन्नी जागोजागी उगवलेले दिसतात.

## आंतरराष्ट्रीय

# चीनची ही शस्त्रसिद्धता कुणासाठी?

वसंत गणेश काणे

जगातले बहुतेक देश, दुसरा देश काय करतो आहे, हे जाणून घेण्याच्या खटाटोपात असतात. याला क्वचितच कुणाचा अपवाद असेल. यातल्या मातब्बर मंडळीत अमेरिका, रशिया, चीन हे देश येतात. अमेरिकेने चीनमध्ये अशाच प्रकारे डोकावून पाहिले तेव्हा चीन आपल्या रणनीतीमध्ये बदल करण्याच्या खटाटोपात आहे, असे अमेरिकेला आढळून आले आहे. तसा अहवालच अमेरिकेच्या सैनिकी रणनीतीविषयक समितीने तयार करून देशासमोर ठेवला आहे. चीनने अतिविकसित आक्रमक शस्त्रांसोबत आक्रमण निवारक अतिविकसित शस्त्रेही तयार करण्याचा धडाकाच लावला आहे. यात निरनिराळ्या प्रकारांची शस्त्रे आहेत, ती भरपूर प्रमाणात तयार केली जात आहेत आणि त्यांची गुणवत्ताही अद्ययावत स्वरूपाची आहे, असे हा अहवाल सांगतो.

**शस्त्रे डागता आली पाहिजेत :** नुसती शस्त्रे असून उपयोगाचे नाही. ती डागण्यासाठीही यंत्रणा (डिलिव्हरी सिस्टिम) पाहिजे. जमिनीवरून प्रक्षेपित करायची आंतरराष्ट्रीय प्रक्षेपणास्त्रे (इंटरकॉन्टिनेंटल बॅलिस्टिक मिसाईल - आयसीबीएम) तयार करण्याचा जंगी कार्यक्रम चीनने हाती घेतला आहे. अशाप्रकारची क्षेपणास्त्रे (मिसाईल्स) आजच चीनजवळ अमेरिकेपेक्षा जास्त आहेत. हल्ला झाला तर त्याचा प्रतिबंध करण्याची क्षमता असलेली कवचवजा शस्त्रे चीन का बरे तयार करतो आहे, असा प्रश्न अमेरिकेला पडला आहे. आज जगातले कोणतेही राष्ट्र स्वतःहून पुढाकार घेऊन चीनवर हल्ला करण्याच्या विचारात असेल, असे संभवत नाही. मग चीनच तर असा हल्ला करण्याच्या विचारात नाही ना, अशी रास्त शंका अमेरिकेला आली आहे. असा हल्ला चीनने केला तर त्याला आक्रमित राष्ट्र चोख उत्तर देण्याचे बाबतीत मागेपुढे पाहणार नाही, हे उघड आहे. अशावेळी बचाव करता यावा म्हणून तर चीन अशी कवचकुंडले प्राप्त करण्याच्या खटाटोपात नाही ना, असा प्रश्न अमेरिकेला पडला आहे.

**चीनचे संभाव्य आक्रमण कुणावर? :** चीन आक्रमण करण्यासाठी दोनच राष्ट्रांचा विचार करीत असणार. पहिले राष्ट्र आहे अमेरिका आणि दुसरे असू शकते भारत. विद्यमान प्रतिस्पर्धी म्हणून चीन अमेरिकेकडे बघत असणार आणि संभाव्य प्रतिस्पर्धी म्हणून भारताकडे. भारताच्या सीमेवर चीनने जी सेना आणून उभी केली आहे, ती लगेचच आक्रमण करील, असे वाटत नाही. चीन भारताच्या अधूनमधून लहान-मोठ्या खोड्या काढीत राहील आणि ठिकठिकाणी चकमकीही होत राहतील. पण यामुळे भारताचे फार मोठे सैन्य सीमेवर सर्वत्र अडकून राहील. त्यासाठी भारताला कायमच फार मोठा खर्च करावा लागेल आणि विकासावर करायच्या खर्चात भारताला सतत कपात करत राहावी लागेल, हा चीनचा मर्यादित हेतू निदान सध्यातरी स्पष्ट दिसतो आहे. अण्वस्त्रांचे बाबतीत चीन अमेरिका आणि रशिया यांच्या बरोबरीला येऊन बसू इच्छितो आहे, ही भारतासाठी धोक्याची घंटाच मानली पाहिजे. म्हणूनच अण्वस्त्र निवारक यंत्रणा उभी करण्यासाठीचे भारताचे प्रयत्न महत्त्वाचे ठरतात.

**चीनचे मनसुबे आणि सावध भारत :** भारताने या दृष्टीने वेळीच दखल घेणे का आवश्यक होते, हे जाणून घेण्यासाठी चीनच्या क्षेपणास्त्रांचे तळ कुठे कुठे आहेत, हे पाहिल्यास लक्षात येते. कुनमिंग आदी बहुतेक तळ भारतापासून विमानाने १५०० किलोमीटर अंतरावर आहेत. याचा अर्थ असा की, भारतातील महत्त्वाची शहरे आणि सैन्यतळ चीनच्या क्षेपणास्त्रांच्या कक्षेत येतात. याशिवाय चीन अण्वस्त्रे, क्षेपणास्त्रविषयक कच्चा माल आणि तंत्रज्ञान पाकिस्तानलाही पुरवतो आहे, ही बाब तर आणखीनच गंभीर आहे. कारण एक जबाबदार राष्ट्र अशी पाकिस्तानची ख्याती नाही. चीनचे हे कृत्य माकडाच्या हाती कोलित ठरेल.

**शस्त्रसज्जतेसाठी स्वतंत्र विद्यापीठ :** शी जिनपिंग यांनी सत्तारूढ होताच सैन्य दलात 'रॉकेट फोर्स' या नावाची एक नवीन शाखा उभारली आहे आणि सर्व प्रकारांची क्षेपणास्त्रे या शाखेकडे सोपविली आहेत. 'स्ट्रॅटेजिक सपोर्ट फोर्स' या शाखेकडे अवकाशातून होऊ शकणारे हल्ले, सायबर हल्ले आणि इलेक्ट्रॉनिक हल्ले थोपवण्याची जबाबदारी सोपविली आहे. या विषयांशी संबंधित एक विद्यापीठच चीनमध्ये आहे. रूढ अभ्यासक्रमासोबत नवीन संशोधन हा विषयही या विद्यापीठात हाताळला जातो. या विद्यापीठातील संशोधकांनी अतिवेगवान आणि महत्तम पल्ला गाठणारी क्षेपणास्त्रे विकसित केली आहेत. चीनवर कोणत्याही दूरवरच्या राष्ट्राकडून हल्ला होण्याची शक्यता नसताना एकीकडे अवकाशातून होऊ शकणारे हल्ले, सायबर हल्ले आणि इलेक्ट्रॉनिक हल्ले थोपवण्याची कवचसदृश बचाव यंत्रणा उभारायची आणि दुसरीकडे प्रत्याघात करण्यासाठीची अत्याधुनिक शस्त्रास्त्रे आणि क्षेपणास्त्रे चीन तयार करीत आहे.

या नवीन क्षेपणास्त्रांवर जैविक, रासायनिक आणि आण्विक अशी कोणत्याही प्रकारची शस्त्रे असू शकतात. यांच्या जोडीला सुलभ हालचालीसाठी चीन ठिकठिकाणी परस्परांशी जोडलेले बोगदे तयार करतो आहे. सर्व शस्त्रसाठा यात साठवून सुरक्षित ठेवण्यासाठी आणि भूपृष्ठाखालूनच्या हालचालीसाठी ही व्यवस्था आहे. याशिवाय चीन काँक्रिटची शंभरापेक्षा जास्त भूमिगत आश्रयस्थाने (सिलो) बांधतो आहे. ही व्यक्तींसाठी सुरक्षा प्रदान करतील तसेच शस्त्रास्त्रे साठविण्याठीही उपयोगी पडू शकणारी आहेत. शस्त्रे आहेत पण ती डागायची कशी, हा प्रश्न हाताळण्यासाठी चीनने एक जंगी कार्यक्रम आखला आहे. हवेतूनच डागता येतील अशी बॅलिस्टिक मिसाईल्स आणि क्रूझ मिसाईल्स डागण्यासाठी नवीन मंच (प्लॅटफॉर्म्स) बांधले आहेत.

'स्टेल्थ बॉम्बर' नावाचे एक अमेरिकन बॉम्बर आहे. हे विमान ओळखणाऱ्या यंत्रणेला चकमा देऊन शत्रूच्या प्रदेशात शिरून बॉम्ब हल्ला करू शकते. अशी बॉम्बर विमाने तयार करण्याच्या खटाटोपात चीन आहे. ही विमाने अण्वस्त्रेही वाहून नेऊ शकतात. याशिवाय मानवविरहित हवाई विमाने तयार करण्याचा कार्यक्रम चीनने हाती घेतला आहे. अण्वस्त्रधारी क्षेपणास्त्रे वाहून नेणारी सबमरीन तर चीनने २०१४ सालीच विकसित केली होती. तिचे हिंदी महासागरातील अस्तित्व जाणवताच भारताने जागरूकतेने तोडीस तोड म्हणून तत्काळ अँटी-सबमरीन वॉरफेअर (एएसडब्ल्यू) केपेबिलिटी ही निवारण क्षमता प्राप्त करण्यासाठीचा एक जंगी कार्यक्रम हाती घेऊन तो तडीस नेला.

**अतिशुद्ध युरेनियम हवे कशाला? :** अतिशुद्ध युरेनियम आणि पुनर्प्राप्त (रिप्रोसेस्ड) प्लुटोनियम तयार करण्यासाठी चीनने पराकोटीचे प्रयत्न चालविले आहेत. यांची माहिती प्रत्येक देशाने स्वतःहून वेळोवेळी जाहीर केली पाहिजे, असा आंतरराष्ट्रीय सामंजस्य करार आहे. चीनने २०१७ पासून या मूलद्रव्यांचा आपल्याजवळ किती साठा आहे, हे जाहीर करणे थांबवले आहे. पण बित्तंबातमी काढणाऱ्या शोध पत्रकारांनी चीनचे बिंग फोडले आणि अतिशुद्ध युरेनियम वापरून तयार केलेली ५०० न्युक्लिअर वॉरहेड्स चीनजवळ तयार आहेत. आणखी तयार करणे सुरू आहे आणि अशी निदान १००० अस्त्रे चीन तयार करतो आहे, ही बाब उघड केली आहे. आम्ही केवळ किमान प्रतिबंधात्मक (मिनिमम डिटरन्स) कारवाईपुरतीच लष्करी क्षमता साध्य करीत आहोत, हा चीनचा दावा खोटा ठरला आहे. या तयारीला बचावापुरती शस्त्रसज्जता मानायला जग तयार होईल का?

आपल्यावर हल्ला होतो आहे, हे तत्काळ कळावे, त्याच्या निवारणाची सिद्धता असावी आणि लगेच प्रत्याघात करून शत्रूस नामोहरम करता यावे, यासाठीची क्षमता प्राप्त करण्याची योजना आखून ती अंमलात आणायला अमेरिका आणि भारत यांनीही तातडीने सुरुवात केली आहे. कारण, दोन राष्ट्रे समान शक्तीची असतील तर ती एकमेकांवर फार तर गुरगुरतात, पण हल्ले करण्याचे नाईलाज होईतो टाळतात. म्हणून तर समर्थ सांगून गेले आहेत की,

***अखंड सावधान असावे । दुश्चित कदापि नसावे ॥***
***तजविजा करीत बसावे । एकांत स्थळी ॥***

९४२२८०४४३०

## वेध

नितीन शिरसाट

# उष्णतेची लाट; पुन्हा अवकाळीचा इशारा!

प्रत्येक शहराचे एक भौगोलिक वैशिष्ट्य असते. हवामानाची माहिती देताना ती बाब विचारात घ्यावी लागते. त्याशिवाय शहराच्या आसपासच्या परिसरातील हवामान, वर्षातील ऋतू-वेळ या सगळ्यांचा अंदाज घेऊन हवामानाची माहिती सादर केली जाते. 'हवामान' हा शब्द वातावरणाच्या तात्पुरत्या स्थितीचा निदर्शक आहे. आपापल्या परिसरातील वातावरणाच्या अनुषंगाने आपण एकूण हवामानाचा विचार करतो. मात्र, हवामान हे पाण्यात गारगोटीसारखे कार्य करते. गारगोटी पाण्यात टाकल्यानंतर तिचे तरंग पाण्यात दूरपर्यंत उमटतात. जगभरातील हवामानाच्या बाबतीतही हेच घडते. मानवी जीवनावर हवामानाचा अनेक प्रकारे परिणाम होतो. दिवसागणिक बदलणारे हवामान वाढते. प्रचंड तापमान, वादळ, चक्रीवादळ आणि हिमवादळ यामुळे होणाऱ्या गंभीर नुकसानीमुळे मानवी जीवनाची वाताहत होते. राज्यात पुढील काही दिवस विदर्भ, मराठवाडा, मध्य महाराष्ट्रात वादळी वाऱ्यासह पाऊस आणि उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, राज्यात काही ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. विदर्भासह मराठवाड्यात काही ठिकाणी पावसाच्या सरी पाहायला मिळतील, असा हवामान विभागाचा अंदाज आहे. पुढील चार ते पाच दिवस विदर्भात आणि संलग्न मराठवाड्यातील जिल्ह्यांत काही ठिकाणी विजांचा कडकडाट आणि जोरदार वारे वाहण्याची शक्यता असून पावसाचाही अंदाज आहे. तसेच काही भागांत गारपीट होण्याचीही शक्यता आहे. दरम्यान, काही भागांत तापमान वाढण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. राज्यात विदर्भ आणि मराठवाड्याला उष्णतेच्या झळांचा सामना करावा लागला. राज्यात सर्वाधिक ४४.३ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद अकोला येथे झाली. त्याखालोखाल अमरावती ४३.८, चंद्रपूर ४३.८, गडचिरोली, वर्धा आणि वाशीम ४३.०, बीड ४३.१, सोलापूर ४३.४, जळगाव ४२.३, मराठवाड्यात परभणी येथे ४३.६ अंश सेल्सिअसची नोंद झाली आहे. उष्णतेची लाट निर्माण झाल्याने दुपारी रस्त्याने अनेक ठिकाणी शुकशुकाट असतो. लग्नसराई असल्याने त्याचा परिणाम बाहेरगावी जाणारे प्रवासी, वऱ्हाडी बसस्थानकावर कमी झाले आहेत. भौगोलिक आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून महत्त्वाचा 'शून्य सावली दिवस' महाराष्ट्रात ३ मे ते ३१ मे दरम्यान येणार आहे. विद्यार्थी आणि संशोधन करणाऱ्या नागरिकांनी या भौगोलिक घटनांचा अभ्यास आणि निरीक्षण करावे, असे आवाहन खगोल अभ्यासकांनी केले आहे. अवकाळी पाऊस आणि तापमानातील फरक यामुळे बागायती क्षेत्राला मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. ग्लोबल वॉर्मिंगशी संबंधित दुष्काळ, पूर, गारपीट इत्यादी फळबाग लागवडीत गुंतलेल्या शेतकऱ्यांसाठी घातक ठरू शकतात. हवामान बदलामुळे तापमान वाढल्याने पशुधन उत्पादन आणि आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता आहे. बदलत्या हवामानाचा सामना करताना देशांतर्गत अन्न उत्पादन टिकवून ठेवण्याच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी भारतीय कृषी संशोधन परिषद, कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालय भारत सरकार यांनी 'नॅशनल इनोव्हेशन्स इन क्लायमेट रेझिलिएंट ॲग्रिकल्चर' हा प्रमुख नेटवर्क प्रकल्प सुरू केला. योजनांद्वारे हवामान बदलाशी मुकाबला करण्यासाठी भारत सरकार कटिबद्ध आहे. शाश्वत शेती, आरोग्य, हिमालयीन परिसंस्था, शाश्वत अधिवास, हरित भारत आणि हवामान बदलासाठी धोरणात्मक ज्ञान. सर्व हवामान कृतींसाठी एक व्यापक उपक्रम प्रदान करते. गावातील ८० टक्के लोकांचा व्यवसाय शेती असताना त्यासाठी आवश्यक असणारे हवामान केंद्र मात्र दिसत नाही. ज्या ठिकाणी विशेषतः कृषी विज्ञान केंद्रांनी स्वयंचलित हवामान केंद्र बसवलेले आहे, तेथील शेतकऱ्यांना चांगल्या प्रकारे मार्गदर्शन मिळते. शेतकरी समृद्ध होण्याकडे वाटचाल करीत आहेत. बाजारात साधारण स्थानिक हवामान केंद्राची किंमत ३५ हजारांपासून एक ते दीड लाखापर्यंत आहे. या हवामान केंद्रामधील सर्व नोंदी दर १० मिनिटाला स्वयंचलित पद्धतीने घेतल्या जातात. पीक नुकसान मदतीसाठी स्वयंचलित हवामान केंद्र त्यामध्ये भ्रमणध्वनीचे सिमकार्ड टाकले तर लोकांना या नोंदी मोफत पोहोचू शकतात. या सर्व माहितीचा उपयोग योग्य कृषी सल्लागाराची मदत घेऊन केला तर याचा शेती आणि उत्पादनात भरपूर उपयोग होतो. हवामान केंद्र हा स्मार्ट शेतीचा पहिला पाया आहे. पावसाळा सुरू होण्यापूर्वीच प्रत्येक ग्रामपंचायतीने शासन योजना, अनुदानाची वाट न बघता आपल्या गावात हवामान केंद्र त्वरित बसवून स्मार्ट शेती करायला हवी. माणसाच्या वेगवेगळ्या कृत्यांमुळे पृथ्वीचे तापमान वाढतेय आणि मानवी आयुष्याला धोके निर्माण होत आहेत. याविषयी पावले उचलली नाहीत तर माणूस आणि निसर्ग या दोन्हींना धोका निर्माण होईल.

९८८१७१७८२८

## इतस्ततः

दत्तात्रेय आंबुलकर

# 'नमो' नेतृत्वाचे तीन विशेष : प्रदेश, भाषा आणि वेश

सध्या लोकसभा निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहोचला आहे. या सगळ्या सभा, रॅली, रोड शो दरम्यान प्रदेश, भाषा आणि वेशभूषा या तिन्ही कसोट्यांवर वेगळेपण उठून दिसते; ते केवळ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचेच. काही नेत्यांच्या पोशाखाचा परिचयच मुळी त्यांच्या नावासह होत असतो, हा इतिहास आहे. पंडित नेहरूंची गांधी टोपी व गुलाबाच्या फुलासह असणारी वेशभूषा, वगबंधू मुजीबचे विशेष काळे जॅकिट ही जागतिक स्तरावर कधीकाळी चर्चित असणारी नावे यासंदर्भात प्रामुख्याने सांगता येतील. मात्र, मोदी आणि त्यांच्या सहकाऱ्यांची पोशाखाच्या संदर्भात विशेष दर्जा आणि चोखंदळता प्राप्त करून दिली असल्याचे स्पष्ट मत सुप्रसिद्ध दिग्दर्शक सुधन्वा देशपांडे व्यक्त करतात. त्यांच्या मते, स्वतः नरेंद्र मोदी चर्चा-बैठकींपासून सभा-संमेलनांपर्यंतच्या विविध प्रसंगी आपल्या नेतृत्व, कर्तृत्व व वक्तृत्वाला प्रासंगिक, समर्पक व योग्य साथ देण्यासाठी प्रसंगानुरूप कपड्यांचा वापर करतात. यासंदर्भातील नवे व ताजे उदाहरण द्यायचे म्हणजे, त्यांच्या नुकत्याच झालेल्या दक्षिण भारतातील मंदिर यात्रांच्या दरम्यान केवळ दक्षिणेतीलच नव्हे, तर स्थानिक रीतिरिवाजांनुसार पोशाख करून सर्व परंपरांचे पालन केले. याउलट नव्या संसद भवनातील प्रथम प्रवेश असो अथवा अयोध्येतील श्रीराम प्रतिष्ठापना, अशावेळी नरेंद्र मोदी आवर्जून पारंपरिक पूजा पोशाखात उपस्थित असतात. तर, उद्योगपती व व्यापारी संस्थाप्रमुखांशी चर्चा करताना साजेसा कार्यालयीन पोशाख घालतात. मुख्य म्हणजे, या सर्व ठिकाणी व प्रसंगी त्यांचे संबंधित विशेष प्रसंगाशी निगडित असतात. सुमारे १० वर्षांपूर्वी नरेंद्र मोदींच्या कपड्यांचा रंग तुलनेने आजच्यापेक्षा भडक असायचा. पंतप्रधान झाल्यानंतर त्यांनी आपल्या कपड्यांच्या रंगछटा व रंगसंगती बदलली असल्याचे जाणकार मंडळी सांगतात. या विषयातील एक प्रमुख जाणकार व दिल्लीच्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नोलॉजीच्या टेक्सटाईल डिझाईन विभागातील वरिष्ठ प्राध्यापक आशिया तिवारी यांच्यानुसार, नरेंद्र मोदी यांना परंपरागत भारतीय कापड आणि कपड्यांची मूलभूत आणि चांगली जाण आहे. त्यानुसार, ते आपल्या पोशाखांसह त्यांच्या रंगसंगती आणि प्रकारांची निवड करतात.



राजस्थानच्या दौऱ्यावर जातील तर राजस्थान नव्हे, तर राज्यांतर्गत मारवाड, थार, शेखावटी पद्धतीच्या पारंपरिक व रंगीबेरंगी साफा ही त्यांची स्वाभाविक पसंत असते. उत्तराखंडसारख्या पहाडी राज्यात रंगीत टोपी परिधान करतात तर दक्षिणेत विशिष्ट पद्धतीची लुंगी. महाराष्ट्रातील संतनगरी देहूमध्ये वारकरी पोशाखासह सहभागी पंतप्रधानांची छबी तर चिरस्मरणीय ठरली. याशिवाय, स्वातंत्र्य दिन वा गणतंत्र दिनी लाल किल्ल्यावरून ध्वजारोहण संबोधन करताना भारतातील विविध प्रांतांचे प्रतिनिधित्व करणारे पोशाख जेव्हा सातत्याने पंतप्रधान करतात, तेव्हा त्यामागची त्यांची योजकता-कल्पकता स्पष्ट होते व ते लोकांच्याही लक्षात राहते. मोदीजींच्या पेहरावाची दखल त्यांच्या पंतप्रधानपदाच्या पहिल्या टप्प्यातच आंतरराष्ट्रीय स्तरावर घेण्यात आली आणि ती पण चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्यासह झालेली भेट. त्यावेळी चर्चेच्या दरम्यान शी जिनपिंग यांच्यासह मोदीजींनी परंपरागत कुर्ता-चुडीदारच्या जोडीलाच आकर्षक गॉगलसह काढलेली सेल्फी त्यावेळी भारत-चीन चर्चेप्रमाणेच जागतिक चर्चेचा विषय बनली होती. याचीच नोंद घेत 'न्यूयॉर्क टाईम्स'च्या फॅशन पुरवणीने मोदी व जिनपिंग यांच्या सेल्फीची दखल घेत टिप्पणी केली की, मोदींनी आपले वेगळेपण धोरणात्मक स्वरूपातच नव्हे, तर दिसण्यात पण सिद्ध केले, हे महत्त्वाचे आहे.

अमेरिकन काँग्रेसच्या सदस्या असणाऱ्या अलेक्झांड्रिया ओसियो कॉर्टेझ यांच्यासंदर्भात सांगण्यासारखी विशेष बाब म्हणजे, त्यांची राहणी, वेशभूषा, रंगसंगती ही नेहमीच लॅटिन शैलीची असते. पोशाखतज्ज्ञ आशिया तिवारी यांच्यानुसार, पंतप्रधान मोदींचे प्रस्तावित कार्यक्रम व त्यांची विशेष प्रासंगिकता यावर आधारित वेशभूषेचे अभ्यासपूर्वक व विशेष प्रयत्नांसह पूर्वनियोजन केले जाते. या नियोजनांमध्ये आणखी काय केल्याने प्रभाव वाढण्यास अथवा प्रासंगिकतेचे औचित्य साधण्यास मदत होऊ शकते, याचा विशेष अभ्यासपूर्वक अवलंब केला जातो. उत्तराखंडच्या निवडणूक प्रचारातील एका सभेत अत्यंत महागडा सूट घालून भाषण करतानाचे छायाचित्र प्रकाशित झाले. प्रत्यक्षात हा वेश त्यांना त्यांच्या मित्राने २०१५ मध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांच्या भेटीसाठी जाण्याच्या निमित्ताने दिला होता. या विशेष वेशावर मोदीजींचे नाव वेगवेगळ्या प्रकारे कोरले होते. यानिमित्ताने त्यावेळी मोदी विरोधकांना त्यांच्यावर टीका करण्याची संधी मिळाली. प्रत्यक्षात मोदींनी त्यांच्या कार्यशैलीनुसार दरवर्षी त्यांना मिळणाऱ्या विशेष भेटवस्तूंच्या जाहीर लिलाव पद्धतीनुसार, या भेट म्हणून मिळालेल्या सूटचा पण लिलाव करविला व त्याची रक्कम 'नमामी गंगे' प्रकल्पाला समर्पित केली. गिनीज इतिहास नोंदीनुसार एका लिलाव बोलीमध्ये सर्वाधिक रक्कम देणारी वस्तू म्हणून मोदींच्या त्या भेट पोशाखाची नोंद झाली.

सुरुवातीला नमूद केलेल्या व्यक्तिमत्त्व वैशिष्ट्यांपैकी त्यांच्या वेश-राहणीभूषेची चर्चा प्रामुख्याने होते. मात्र, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाशी निगडित असे प्रदेश आणि भाषा हे मुद्दे मोदीजींना नेहमीच पूरक व हजारोंना प्रसंगानुरूप ठरतात, याचा अनुभव येत असतो. तसेच आपल्या फर्ड्या वक्तृत्वाला मोदीजी प्रादेशिक भाषा वा स्थानिक बोलींची जी जोड देतात, त्यामुळे त्यांच्या प्रत्येक भाषणाची परिणामकारकता वाढते. भारतात बोलताना गुजराती, हिंदी व इंग्रजीचा प्रभावी वापर ते करतातच, दक्षिण गुजरातमध्ये प्रदीर्घ काळ संघटनात्मक काम केल्याने त्यांना मराठी चांगले येते. याशिवाय चंदीगड-हिमाचल क्षेत्रात बरीच वर्षे काम केल्याने त्यांना पहाडी परिसरातील डोगरी-गढवाली यांसारख्या बोलीभाषा येतात व त्यांचा ते प्रसंगानुरूप प्रभावीपणे वापर आपल्या भाषणांमध्ये करतात. मोदींच्या भाषण-संवादादरम्यानची अन्य प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजेच, त्यांच्या संवादशैली व समयसूचकतेचे संसदेत वा राजकीय भाषणात वारंवार प्रत्यंतर येतो. संवादाच्या संदर्भात वर नमूद केलेली प्रमुख उदाहरणे मर्यादित व निवडक स्वरूपात असल्याने नरेंद्र मोदींचे नेता-वक्ता असे दुहेरी महत्त्व नेहमीसाठी अधोरेखित होते.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)
९८२२८४७८८६

### मतदानाचा उत्सव... कर्मचारी त्रस्त

देशातील सर्वात मोठा उत्सव म्हणून मतदानाला महत्त्व देण्यात येत आहे. या मतदानाचे कार्य पार पाडणारा सर्वात मोठा कणा हा कर्मचारी वर्ग असतो. मतदानाच्या आदल्या दिवशीच सकाळीं ८ वाजतापासून जवळपास ४८ तास झाल्यावरच घरी येतो, मग ती महिला असो अथवा पुरुष. परंतु या कर्मचाऱ्यांकडे निवडणूक आयुक्त व जिल्हाधिकारी कार्यालय माणूस म्हणून बघणार काय? विशेष करून महिला वर्गाला या उत्सवात खूप त्रासातून जावे लागते. सामान घेताना गर्दी इतकी होते की त्यांना बसायची



सोयही नसते. जवळजवळ मतदान केंद्र म्हणून शाळेची निवड केली जाते. शाळा असल्यामुळे तिथे स्वच्छता असणे आवश्यक आहे. परंतु काही शाळा ५ वर्षांपासून बंद असूनही त्यांचा मतदान केंद्र म्हणून वापर केला जातो. तरीही तिथे ना स्वच्छता केली जात, ना प्रसाधनाची सोय असते. ती जबाबदारी कोणाची? साहजिकच आहे जिल्हाधिकारी कार्यालय व निवडणूक आयुक्त कार्यालय या अशा शाळा बुथ म्हणून का घेतात आणि घेतली तरी येथे सर्वप्रथम स्वच्छतेला प्राधान्य द्यावे. कमीत कमी एकतरी अनुभवी कर्मचारी ज्याला निवडणूक ड्युटीचा अनुभव आहे असा कर्मचारी बुथवर द्यायला पाहिजे.मतदानाच्या दिवशी पहाटे ५ वाजतापासून कर्मचारी तयारीत लागतो कारण सकाळी ७ वाजता पासूनच मतदानाला सुरुवात होते व या वेळेपासून कर्मचारी इतका व्यस्त होतो की त्याला पाणी सुद्धा पिण्यास वेळ मिळत नाही, जेवण तर दूर राहिले. कर्मचाऱ्यांसाठी पिण्याच्या पाण्याची, बसण्याची व्यवस्था व जेवणासाठी वेळ द्यायला पाहिजे. अतिरिक्त कर्मचाऱ्यांना त्याच बुथवर काही तासांसाठी कामाला लावून इतर व्यस्त असलेल्या कर्मचाऱ्यांना मध्यान्हासाठी वेळ द्यायला पाहिजे. काळानुसार निवडणूक आयोगाने सुधारणा करणे आवश्यक आहे.

**डॉ. शेखर दंताळे**/७८८७८८८०६८

## वाचक पत्रे

### माझे विचार...

भारतीय जनतेसमोर कितीही डोके फोडले तरी मतदानाचा टक्का फारसा वाढत नाही. त्याकरिता सर्वोत्तम पर्याय म्हणजे ज्यावेळेस आपण मतदान करतो तेव्हा जी व्यक्ती मतदान करेल त्याला मतदान केल्याचे व्हिजिटिंग कार्डसारखे एक छोटेसे प्रमाणपत्र द्यायचे. ते प्रमाणपत्र पुढील निवडणुकीपर्यंत सर्व शासकीय योजना, सर्व प्रकारांचे अनुदान, एसटी प्रवासाच्या सवलती, पाल्याची स्कॉलरशिप, दवाखाने, शेतीवर आधारित सवलती या सर्वांसाठी आधारकार्डप्रमाणे आवश्यक करायचे. अर्थात ज्यांच्याकडे मतदान केल्याचे प्रमाणपत्र असेल तोच पुढील पाच वर्षे शासकीय योजनांचा फायदा घेईल अन्यथा नाही. असे झाल्यास एकही मतदार मतदानापासून वंचित राहणार नाही. ऊन असो, वारा असो, पाऊस असो की स्वतःचे लग्न, एवढेच नव्हे, तर अंत्यसंस्कारालादेखील लोक मतदान केल्याशिवाय जाणार नाहीत. हे विचार निवडणूक आयोगापर्यंत गेल्यास यावर विचार झाल्याशिवाय राहणार नाही. याकरिता शक्य होईल तेवढे पुढे पाठवा म्हणजे कदाचित यावर विचार होऊ शकतो. अजून निवडणुकीचे टप्पे बाकी आहेत.

**बळवंत चिंतावार**/९८२३७७५३४९

### विद्यार्थ्यांची आत्महत्या

तेलंगणात इंटरमीडिएटचे निकाल जाहीर झाले. नापास झालेल्या सात विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली. त्यात एक मुलगी आहे. मागच्या वर्षी २२ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली होती. अत्यंत गंभीर व विचार करणारी गोष्ट आहे. आत्महत्या आपण नेहमी ऐकतो, परंतु प्रत्येकाची कारणे वेगळी आहे. येथे अपयश नापास होणे एकच कारण आहे त्याची चौकशी व्हायला हवी. विद्यार्थ्यांना अपयश न पचविता येणे, मनाचा भित्रेपणा, समाजातील, घरातील, मित्र-मैत्रिणी काय म्हणतील ही भीती. जीवनात यश-अपयश येणारच त्यासाठी लहानपणी शिवाजी महाराज, रामायण-महाभारतातील लोकांनासुद्धा अपयश आले होते, त्यांनी अपयशावर कशी मात केली, या गोष्टी सांगाव्या. अपयश पचविण्यासाठी शारीरिक मानसिकता बळकट हवी. अपयश पुढील यशाची पायरी आहे. घरातील, बाकीच्यांनी लगेच त्याला बोलू नये, शांत राहावे, त्याच्या वागण्याकडे लक्ष द्यावे. विद्यार्थ्यांनो, तुम्ही तुमची जीवनयात्रा संपविली, परंतु संपूर्ण कुटुंब आयुष्यभर तुमच्या आठवणीत होरपळून निघणार. बहीण किंवा भाऊ रक्षाबंधन, भाऊबीज आनंदाने साजरी करू शकणार नाही. खूपदा 'नयनी हसू हृदयी आसू' अशी त्यांची परिस्थिती राहील. कुटुंबाला दुःख देण्याचा अधिकार कोणी दिला आहे, विद्यार्थ्यांनो! कुटुंबाचे, समाजाचे, राष्ट्राचे तुम्ही आधारस्तंभ आहात. सर्वांना सुख, हिंमत देण्यासाठी तुमचा जन्म झालेला आहे. एका आजीची कळकळीची विनंती आहे, तुम्हाला फुलताना बघण्यासाठी माझी अंधुक नजर भिरभिरते आहे.

**निर्मला गांधी**/९११२२७५२८४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त

### मतदान करण्याचे जयहिंद फूड बँकेकडून आवाहन

**सोलापूर, दि. ६ मे -**

सोलापुरात मंगळवारी ७ मे रोजी मतदान होणार आहे. यामध्ये सर्वांनी सहभाग घ्यावा. जर मतदान पत्रिका आपल्याला पोच झाली नसेल तर आपण ९६६५८०८५७१ ह्या क्रमांकावर संपर्क करून मतदान पत्रिका मिळवावे, असे आवाहन जयहिंद फूड बँकेचे संस्थापक अध्यक्ष सतीश सुरेश तमशेट्टी यांनी केले आहे. श्री. तमशेट्टी, यांच्या विचारातून ही संकल्पना मांडण्यात आली. यासाठी, विनय गांगजी, सुधीर तमशेट्टी, मनाली तमशेट्टी, डिंपल जैन, प्रथमेश रापोल, अमोग रापेल्ली, व इतर सदस्य सहभागी असणार आहेत. याच विचारातून आज मतदानापासून कोणी वंचित राहू नये म्हणून हा उपक्रम राबवण्यात येत आहे.सर्व प्रकारच्या राज्यव्यवस्थेत लोकशाही राज्यव्यवस्था ही सर्वात चांगली गणली गेलेली आहे. लोकशाही सर्वात चांगली का? तर यामध्ये प्रत्येक सगळ्या व्यक्तीला आपला प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार मतदानाद्वारे प्राप्त होतो. भारत ही जगातली सर्वात मोठी लोकशाही व्यवस्था असलेला देश आहे. इथे लोकप्रतिनिधींचा कार्यकाळ हा पाच वर्षाचा आहे. याचा अर्थ प्रत्येक सामान्य व्यक्तीला दर पाच वर्षांनी मतदानाद्वारे आपला प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार मिळतो. सगळ्या व्यवस्थेत मतदार म्हणून आपल्याकडे अधिकार आहे. तो आपण बजावलाच पाहिजे. लोकशाही बळकट करण्यासाठी, राष्ट्रहितासाठी एक सक्षम नेतृत्व निवडण्यासाठी मतदान जरूर करा.



# वैभव इलेव्हन संघास विजेतेपद

## अंबर लीग अप्पा चषक क्रिकेट स्पर्धा : वैभव कदम सामनावीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मे -**

वैभव कदम इलेव्हन संघाने अंबर लीग अप्पा चषक क्रिकेट स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले.

संतोष सूर्यवंशी यांच्या वाढदिवसानिमित्त ही स्पर्धा आयोजित केली होती. यामध्ये कुमार आनंदानी, शंकर गुरव, वैभव कदम या संघनायकांच्या संघाने सहभाग घेतला होता. अंतिम सामन्यात प्रथम फलंदाजी करताना अंबर कुमार ११ संघाने १० षटकांत ९२ धावा केल्या. यात कुमार आनंदानी १४, तुषार म्हेत्रे ३९ धावा केल्या. वैभव कदम व महेंद्र ढवाण यांनी प्रत्येकी २ बळी टिपले. कृष्णा पवार, विनय दिंडोरे व मनोज पवार यांनी प्रत्येकी १ गडी बाद केला.

विजयी ९३ धावांचे लक्ष्य अंबर वैभव ११ संघाने ९.४ षटकांत गाठले. यामध्ये वैभव कदम ३६, महेंद्र ढवाण २४ धावा केल्या. अष्टपैलू खेळी करणारा वैभव कदम सामन्याचा मानकरी ठरला.



या स्पर्धेचे पारितोषिक वितरण कार्यक्रम मान्यवरांच्या हस्ते झाले सूत्रसंचलन कृष्णा पवार यांनी केले. महादेव वरळे यांनी आभार मानले. या स्पर्धेस पंच म्हणून नितीन गायकवाड आणि सहकारी तसेच गुणलेखक म्हणून किरण डिग्गेसर यांनी काम पाहिले. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी अंबर भंडारी क्रिकेट क्लब कमिटी, आप्पा सूर्यवंशी यांच्यासह अंबर भंडारी क्लबच्या सर्व खेळाडूंनी सहकार्य केले.

**सर्वोत्कृष्ठ खेळाडू** : फलंदाज : प्रशांत सुरवसे, गोलंदाज : महेंद्र ढवाण, सामनावीर : वैभव कदम, मालिकावीर : तुषार म्हेत्रे. क्षेत्ररक्षक : विकी रावलांनी, विनय दिंडोरे.

# नेताजी पवार यांना उत्कृष्ट तायक्कांदो प्रशिक्षक पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मे-**

नॅशनल कल्चरल अँड स्पोर्ट्स इव्हेंट्स अँडचा दुसरा आंतरराष्ट्रीय पुरस्कार येथील तायक्कांदो प्रशिक्षक पुरस्कार नेताजी पवार यांना जाहीर झाला.

मुंबई येथे महाराष्ट्र दिनानिमित्त हा पुरस्कार त्यांना ''स्पोर्ट्स मार्शल आर्ट्स आणि एंटरटेनमेंट''चे संपादक जयकुमार गोहिल, ''युवा से युवा''चे संस्थापक आदित्य माहीमकर, संयोजन समिती सदस्य वैशाली गावडे यांच्या हस्ते देण्यात आला. स्पोर्ट्स मार्शल आर्ट्स आणि एंटरटेनमेंट'' आणि ''युवा से युवा'' तर्फे राष्ट्रीय संस्कृती कार्यक्रम आणि क्रीडा व्यक्तिमत्व, मार्शल आर्टिस्ट आणि मनोरंजनासाठी हा पुरस्कार दिला जातो.

नेताजी हे सोलापूर तायक्कांदो असोसिएशन ऑफ सोलापूरचे सहसचिव व येथील एन. पी. तायक्कांदो अकॅडमीचे अध्यक्ष व राष्ट्रीय पंच आहेत. त्यांनी राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय तायक्कांदो खेळाडू घडविले.



त्यांचे महाराष्ट्र तायक्कांदो असोसिएशनचे अध्यक्ष आबासो झोडगे, महासचिव संदीप ओंबासे, जिल्हा असोसिएशनचे अध्यक्ष शहाजीबापू पाटील, उपाध्यक्ष शिवराज मुंगळे, सचिव प्रमोद दौंडे, खजिनदार गुरुलिंग गंगनहळ्ळी, मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष तानाजी माने, शिवराम भोसले, मुख्याध्यापिका रत्नश्री तळे, एन. पी. तायक्कांदो अकॅडमीचे उपाध्यक्ष महादेव होमकर, सचिवा अरुणा राठोड, विद्यापीठ मॅनेजमेंट कौन्सिल सदस्य प्रा. सचिन गायकवाड, प्रा. संतोष गवळी, सत्यम कांबळे, प्रतीक होमकर, महिला प्रशिक्षक लक्ष्मी पवार, वैष्णवी सुरवसे, मुस्कान शेख यांनी अभिनंदन केले.

# दिगंबर जैन सैतवाल सेवा मंडळाच्या छंद वर्गाचे आयोजन यशस्वी



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ६ मे -**

श्री. दिगंबर जैन सैतवाळ सेवा मंडळ व मॅड ॲकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने मातृदिनानिमित्त आनंदी व कृतियुक्त उन्हाळी छंद वर्गात ५० हून अधिक विद्यार्थी व त्यांच्या आई यांनी एकत्रित छंद वर्गात कृतियुक्त सहभाग नोंदविला.

हल्लीची मुले उन्हाळ्याच्या सुट्टीत मोबाईल, काम्प्युटर व टीव्ही या आभासी विश्वात रमलेले असतात. त्याऐवजी उन्हाळी सुट्टीचा छंद वर्गासारख्या आनंददायी उपक्रमातून नृत्य, विविध खेळ, टेरिकोटा ज्वेलरी तयार करणे, वस्तू निर्मिती करणे या माध्यमातून त्यांना नवनिर्मितीचा आनंदही मिळतो. या द्विदिवसीय कार्यशाळेचा शुभारंभ मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व णमोकार मंत्रोच्चाराने झाला.

सैतवाल सेवा मंडळाचे नूतन अध्यक्ष प्रकर्ष संगवे यांनी कार्यशाळेला व उपस्थित विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी मॅड अकॅडमीचे समन्वयक विकास गोसावी व आसावरी गांधी यांनी अकॅडमीने केलेल्या कार्याचा आढावा सादर केला. समारोपप्रसंगी ''सहभाग प्रमाणपत्र'' देऊन, उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या विद्यार्थ्याला बक्षीस देऊन सन्मानित करण्यात आले.

या छंद वर्ग कार्यशाळेचे आयोजन सैतवाल सेवा मंडळाचे अध्यक्ष श्री. संगवे, ॲड. साधना संगवे यांच्या मार्गदर्शनाखाली उपाध्यक्ष अमित कटके, सचिव राजेश मोहोळकर, सदस्य अनुप म्हेत्रे, संदीप पूर्वत, नितीन पलसे, चंद्रशेखर कस्तुरे, कोषाध्यक्ष भालेराव, अमोल क्षिरसागर, चेतन तुपकर, यांच्या सहकार्याने तसेच मॅड संस्थेचे समन्वयक विकास गोसावी, फाउंडर आसावरी गांधी, सोनाली वाघमोडे, डान्स कोरिओग्राफर भूमिषा शहा यांनी केले होते. याप्रसंगी अरुण धुमाळ, रवींद्र कटके, नंदकुमार कंगळे, माजी अध्यक्ष प्रदीप पांढरे, भूमकर यांनी कार्यशाळेला भेट दिली.

## धाराशिव दिवाणी न्यायालयाचा दंपत्याला दिलासा, परस्पर संमतीने घटस्फोट होऊन मिळणेचा अर्ज तातडीने मंजूर

सोनम (बदलेले नाव) व राहुल (बदलेले नाव) यांचा विवाह दि. २३/०८/२० रोजी झालेला होता. परंतु त्यांच्यात मतभेद झाल्याने व त्यांचे एकमेकांशी पटेनासे झाल्याने ते दोघेही दि. २४/०९/२०२१ रोजी पासून विभक्त राहत होते.

दरम्यान दोघांनीही परस्पर संमतीने घटस्फोट घेण्याचा निर्णय घेऊन ॲड. अभिषेक विलास घोडके व ॲड. विद्यासागर ढगारे यांचे मार्फत धाराशिव येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर सो यांचे न्यायालयात परस्पर संमतीने घटस्फोट होऊन मिळणेसाठी अर्ज दाखल केला. व सदरचे अर्जामध्ये ६ महिन्यांचा जरुरीचा कालावधी माफ करण्याची विनंती केली होती.

सोनम हिचे शिक्षणाचा विचार करुन व तिला लग्नासाठी येत असलेली स्थळे यांचा विचार करुन व ॲड. अभिषेक विलास घोडके यांचा युक्तीवाद ग्राह्य धरुन मे. न्यायालयाने ६ महिन्यांचा जरुरीचा कालावधी माफ करुन सोनम व राहुल यांचा परस्पर संमतीने घटस्फोटाचा अर्ज मंजुर केला. ते न्यायालयाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

ही प्रेस नोट दिली. ता. ०५/०५/२०२४

**सही/-**
**ॲड. अभिषेक विलास घोडके**
**ॲडव्होकेटस बी.ए., एलएल.बी.**
**रा. १४९/१५० धनगर गल्ली, अणदूर**
**ता. तुळजापूर, जि. धाराशिव**
**मो.९९६००६७८९०**

## निधन वृत्त...

### शोभा खंकाळ



**मंगळवेढा, दि. ६ मे-**

उचेठाण येथील शोभा साहेबराव खंकाळ (वय ६५) यांचे सोमवार दिनांक ६ मे २०२४ रोजी पहाटे ३.३० वाजणेच्या सुमारास हृदयविकाराच्या तिव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा,पाच मुली, सुन, नातवंडे असा परिवार आहे. दामाजी कारखाना चौकातील हाटेल जगदंबा चे मालक आबा साहेबराब खंकाळ यांच्या त्या मातोश्री होत.

### डी.एस. पवार



**सांगोला, दि. ६ मे-**

सांगोला शहरातील सदानंदनगर येथील सोलापूर डी.सी.सी.बँकेचे सेवानिवृत्त उपव्यवस्थापक दिपक ऊर्फ दगडू सावळाराम पवार (वय- ७७) यांचे अल्पशा आजाराने रविवार दि.५ मे रोजी निधन झाले.त्यांचे पश्चात पत्नी,एक मुलगा,सून,नातू असा परिवार आहे.

### बब्रुवान चव्हाण




**वैराग दि ६ मे-**

इर्लेवाडीचे पहिले सरपंच बब्रुवान धोंडीराम चव्हाण यांचे वयाच्या ८४ व्या वर्षी वृध्दापकाळाने दुख:त निधन झाले. त्यांच्या पाठीमागे दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने इर्लेवाडी गावावर शोककळा पसरली आहे.

### तानाजीराव गायकवाड

**सोलापूर, दि. ६ मे-**

तुळजापूर तालुक्यातील काटी येथील जेष्ठ नागरिक तानाजीराव गणपतराव गायकवाड वय (७८) यांचे रविवार दि. ५ मे रोजी रात्री ११.३० च्या सुमारास वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, जावाई, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर सोमवारी सकाळी काटी येथील हिंदू स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. ते सयाजी गायकवाड व मानाजी गायकवाड यांचे वडील तर पत्रकार उमाजी गायकवाड यांचे चुलते होते.



### श्रीराम देशपांडे

**सोलापूर, दि. ६ मे-**

जुळे सोलापूर दोंदेनगर येथील व सध्या पुण्यात स्थायिक असलेले निवृत्त मध्य रेल्वे सोलापूरचे निवृत्त अधीक्षक श्रीराम देशपांडे (वय ७४) यांचे रविवारी सकाळी पुण्यात हृदयविकाराने निधन झाले.



## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

सोलापूर जिल्हातील विशेषतः दक्षिण सोलापूर तसेच सोलापूर जिल्हा व संपुर्ण महाराष्ट्रा मधील गावे व तालुके मधील तमाम लोकांस या खरेदीपूर्व जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, जिल्हा व उप जिल्हा सोलापूर पैकी, तालुका दक्षिण सोलापूर, येथील मौजे तोगराळी येथील सोलापूर जिल्हा परिषदेच्या हद्दीतील दक्षिण सोलापूर पंचायत समितीपैकी, जिल्हा परिषद हद्दतील मौजे तोगराळी ग्रामपंचायत हददीतील १) गट नं. पुर्वेकडील दोन्ही डांबरी रोड टच ७६/१/ब/२ पैकी ०१ हे ०० आर आकार रु. १.७७ पैसे असून दुसरा गट नं. २) ७६/१/अ/१ पैकी पुर्वे कडील दोन्ही डांबरी रोडटच ० है ०.१० आर आकार रु. ०.१८ पैसे असे असून याची एकत्रीत चतुः सिमा येणेप्रमाणे असे पुर्वेसः ग्रामपंचायत तोगराळी गावाला जाणारा डांबरी रस्ता, पश्चिमेसः सुभेदार यांची उर्वरित शेतजमीन असे, दक्षिणेसः सोलापूर ते अक्कलकोट हायवे रोडटच, उत्तरेस : स्मशान भूमी व गावठाण लगत असून जूना कुंभारी रस्ता नमूद असे. अशा वर्णनाची वर नमूद शेतजमीन ही सौ. पुष्पा रणजीतसिंह पवार व श्रीमती. शोभा प्रमसिंग चव्हाण, राहणार सिव्हिल लाईन सोलापूर, यांच्या स्वतंत्र मालकी व कब्जे वहिवाटीची असून सदर शेतजमीन ही त्यांनी आमचे अशील यांना कायम खुषखरेदी देण्याचे ठरवून त्यांच्याकडून इसारा रक्कम स्विकारुन पब्लीक नोटरी इसारा पावती करारपत्राने लिहून देवून कायम खुशखरेदी देण्याचा व्यवहार ठरविलेला आहे. सदर शेतजमीन ही निर्वेध व निजोखमी असल्याची व ती त्यांनी यापूर्वी कोणासही विक्री, ट्रान्सफर, गहाण, दान, टाच, लिज अथवा अन्य मार्गाने गुंतविलेली नाही अशी हमी त्यांनी आमच्या अशिलांना दिलेली आहे. तरी सदरहू शेतजमीनीवर जर कोणाचा मालकी हक्क, हितसंबंध, कब्जा, गहाण, दान, लिज, लिन, इजमेंट राईट, कोर्टाची टाच, वित्त संस्थेचा बोजा अगर इतर बँकेचा बोजा वगैरे काही असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून १० (दहा) दिवसांचे आत नोंदवाव्यात. जर वरील मुदतीत कोणाची हिला हरकत व तक्रार नाही आल्यास आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. तदनंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार अगर हरकत आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाही याची नोंद तमाम नागरिकांनी घ्यावी. तरी कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही जाहीर नोटस दिली असे

ही जाहीर नोटीस दिली तारीख : ०६/०५/२०२४

**सही/-**
**ॲड. विद्या आर. कटकधोंड (कुरुलकर)**
**बी. कॉम. (ऑनर्स), एलएल.बी.**
**ॲडव्होकेट व नोटरी भारत सरकार,**
**निवासः फ्लॅट नं. १२, हेरीटेज सॅन्चुरी अपार्टमेंट,**
**गीता नगर, वालचंद कॉलेज जवळ, सोलापूर- ४१३००६.**
**मो. नं. ९०११४६०६४६**

## जाहिर समन्स

## सोलापूर येथील मा. श्री. यु.एम. कुलकर्णी, न्यायाधिश, सहकार न्यायालय,सोलापूर यांचे कोर्टात

**लोकमंगल को-ऑप बँक लि., सोलापूर** - **अर्जदार**
पत्ता : १९३, गोल्डफिंच पेठ, सावरकर मैदानसमोर सोलापूर
**विरुध्द**
**१) पद्माकर बाळासाहेब साळुंखे, (मयत)** - **सामनेवाला**
रा. ब्लॉक नं. १८ विश्राम नगर, होटगी नाका, सोलापूर
वगैरे-२

| अ. क्र. | सहकार केस नंबर | प्रतिवादीचे नाव नंबर व पत्ता | दावा रक्कम रु. | नेमलेली तारीख |
|---|---|---|---|---|
| ०१ | ११०/२००८ | १) पद्माकर बाळासाहेब साळुंखे (मयत)<br>वारसदार -<br>०१ ब) अर्चना प्रभाकर जाधव, रा. ब्लॉक नं. १८, विश्राम नगर, होटगी नाका, सोलापूर<br>०१ क) अनिता भालचंद्र जाधव, रा. ब्लॉक नं. १८, विश्राम नगर, होटगी नाका, सोलापूर<br>०१ ड) अपर्णा प्रविण भोगडे, रा. ब्लॉक नं. १८, विश्राम नगर, होटगी नाका, सोलापूर | २४,४८,१७८/- | १४/०६/२०२४ |

ज्याअर्थी वादी यांनी तुमच्या विरुध्द या न्यायालयामध्ये दावा दाखल केलेला आहे. त्यामुळे या जाहीर समन्स / नोटीसद्वारे आपणास असे सुचित करण्यात येते की, आपण व्यक्तिशः अथवा योग्य रितीने अधिकार प्रदान करण्यात आलेला अधिकृत प्रतिनिधी, जो या अर्जाच्या संदर्भातील सर्व महत्त्वाच्या प्रश्नांची उत्तर देऊ शकेल असा अधिकृत प्रतिनिधीमार्फत या न्यायालयामध्ये दि. १४/०६/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता सदरील दाव्यामधील आपल्या विरुध्द करण्यात आलेल्या मागणीच्या संदर्भात आपले म्हणणे व पुरावे दाखल करण्यासाठी हजर रहावे. वर उल्लेखिलेल्या तारखेस व वेळेवर आपण हजर न राहिल्यास सदरील दाव्याचा एकतर्फा निकाल आपले गैरहजरीमध्ये करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दि. २६/०४/२०२४ रोजीच्या मा. न्यायाधिश यांच्या हुकुमान्वये हे जाहीर समन्स दिले आहे.

**न्यायालयाचा पत्ता :**
सहकार न्यायालय, सोलापूर, सोलापूर जिल्हा महसूल कर्मचाऱ्यांची सहकारी पतसंस्थेची इमारत पहिला मजला, जिल्हाधिकारी कार्यालयाचे आवारात, सोलापूर

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**(एन.एस. देवराज)**
**न्यायालयीन लिपीक**
**सहकारी न्यायालय, सोलापूर**

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन :- डि. व सब डि. सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर पैकी सोलापूर शहर महानगर पालिका नविन हद्दवाढ मधील कसबे सोलापूर येथील जुना सव्र्हे नं. १२२/१/ब, यासी नविन सव्हें नं.१२०/१/ब पैकी नियोजित समता नगर पैकी गोकुळ नगर या नावाने ओळखले जाणारे मधील प्लॉट नं.९६ब याचे क्षेत्र ४६.४६ चौ. मीटर अथवा ५०० चौ. फुट इतके आहे. यासी हद्द २० X २५ अशी आहे. ही प्लॉट जागा खुली आहे.

यासी चतु:सीमा :- पुर्वेस :- प्लॉट नं. ९७अ, दक्षिणेस : प्लॉट नं. १०१ अ, पश्चिमेस : प्लॉट नं. ९६अ, उत्तरेस :- अंतर्गत रस्ता

येणेप्रमाणे चतु:सीमेतील खुली प्लॉट जागा त्यातील दगड, माती वगैरे तदंगभुत वस्तूंसह, मालकी व कब्जेवहिवाटीचे हक्कासह- ही प्लॉट जागा श्री. जयंत रविन्द्र चिलका, रा.एफ १२५२, जुना विडी घरकुल, हैद्राबाद रोड, सोलापूर यांचे मालकी व कब्जेवहिवाटीची असून त्यांनी ही मिळकत आमचे अशिलास मालकी व कब्जेवहिवाटीचे हक्काने कायम खरेदीने देण्याचे ठरवून इसारा पावती लिहून दिला आहे. त्यांनी ही मिळकत निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची असल्याचे खात्री व भरवसा दिला आहे. तरीही या मिळकतीच्या संदर्भात कोणाचाही, कसलाही गहाण, दान, बक्षिस, इसारा पावती, साठेखत, खरेदीखत, वारसा, पोटगी, टाच, बोजा, जप्ती, कोर्ट केसेस अथवा अन्य कोणत्याही स्वरुपाचा हक्क, हितसंबंध वा वाद असल्यास, त्यांनी खालील नमूद पत्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात दिवसांचे आत लेखी कळवावे. मुदतीत कोणाचेही हरकत न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही, कोणताही, कसल्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध नसल्याचे समजून अथवा त्यांनी तो जाणीवपुर्वक स्वेच्छेने सोडून दिला असे समजून आमचे अशिल लवकरच खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही, कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे. दि.०६/०५/२०२४

**अशिलातर्फे**
**सही/-**
**ॲड. राजरतन द.श्रीराम**
**ऑ. १६२१/१/१, कुचन नगर,**
**सोलापूर मो.नं. ९८८१२४०५१६,**

## जाहीर समन्स

**मे. उपनिबंधक सहकारी संस्था, (परसेवा),**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर**
११३(अ), सिध्देश्वर पेठ, स्टेट बँक ऑफ इंडिया, ट्रेझरी शाखेशेजारी, सोलापूर

**समर्थ सहकारी बँक लि., सोलापूर** - **अर्जदार**
अंत्रोळीकर शॉपिंग सेंटर, दत्त चौक, सोलापूर
**विरुद्ध**
(खालील तपशिलातील नमुद केलेले थकबाकीदार सभासद) - **जाब देणार**

| अ. क्र. | केस नंबर | दावा रक्कम | जाब देणार नं. | जाब देणार यांचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | १४०३/२३-२४ | १,४६,६८५.०० | १ अ<br>१ ब | **चौगुले पमा सुरेश** रा. ४०७५/९६अ, महावीर नगर, पंढरपूर, जि. सोलापूर<br>**चौगुले सुरेश दिगंबर** रा. ४०७५/९६ अ, महावीर नगर, पंढरपूर, जि. सोलापूर |
| २ | १२४३/२३-२४ | १,१७,०८६.०० | १ अ<br>१ ब | **स्वामी भौरम्मा गुरुलिंग** रा. होनसळ, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर<br>**स्वामी गुरुलिंग संगय्या** रा. होनसळ, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर |
| ३ | १२४७/२३-२४ | ३६,६३६,०० | १ ब | **म्हेत्रे सचिन श्रीशैल** रा. शिंगडगाव, वळसंग, ता. द. सोलापूर, जि. सोलापूर |
| ४ | १२६०/२३-२४ | १,१७,६५२.०० | १ ब | **खडके प्रविण मुरलीधर** रा. २१, एन.जी. मिळ चाळ, मुरारजी पेठ, सोलापूर |
| ५ | १२६१/२३-२४ | ३५,२०५.०० | १ ब | **सावंतगिरी प्रभु मलप्पा** रा. १०/३६, घोंगडे वस्ती, भवानी पेठ, उत्तर सोलापूर, सोलापूर |
| ६ | १२७९/२३-२४ | २,६८,९३०.०० | १ ब | **शेख तस्लीम तोहिद** रा. १२, होनसळ, मेन रोड, ता. उ. सोलापूर, जि. सोलापूर<br>**शेख तोहिद शानूर** रा. १२, होनसळ, मेन रोड, ता. उ. सोलापूर, जि. सोलापूर |

या कामी अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जातील जाब देणार यांना रजिस्टर पोस्टाने समन्स पाठविण्यात आलेले आहे. परंतु जाब देणार समन्स रुजू न झाल्याने / त्यांचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्यामुळे सदरचे जाहीर समन्स देत आहोत.

**उपनिर्दिष्ट अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वार - मंगळवार दि. २८/०५/२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता दाव्यासंबंधीच्या कागदपत्रासह आपण या कार्यालयात हजर व्हावे.**

या नोटीसीद्वारे जाब देणार यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी. त्याप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पुर्वी आपल्य संपूर्ण पत्ता कळविण्यास कसुर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

म्हणून दिनांक ०६/०५/२०२४ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले आहे.

शिक्का

**सही/-**
**उपनिबंधक**
**सहकारी संस्था (परसेवा)**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स्**
**को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर**

## बँक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra

**प्रधान कार्यालय/ Head Office**
लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5

आज़ादी का अमृत महोत्सव

**झोनल ऑफिस सोलापूर / Zonal office, Solapur**
झोनल ऑफिस, अग्रवाल पॅलेस, पहिला मजला, डी मार्ट - भारती विद्यापीठ रोड, जुळे सोलापूर, सोलापूर - ४१३००४
Zonal Office, Agarwal Palace, First Floor, D Mart-Bharati Vidyapith Road, Opp. Patanjali Mall, Jule Solapur, Solapur - 413004
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: staff_sol@mahabank.co.in

### नियम - ८ (१) ताबा सूचना

तर, अधोस्वाक्षरी केलेले हे सिक्युरिटायझेशन अँड रिकन्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल सेट्स अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट क्ट, २००२ अन्वये बँक ऑफ महाराष्ट्रचे प्राधिकृत अधिकारी आहेत आणि कलम १३ च्या उप-कलम (१२) अन्वये दिलेल्या अधिकारांचा वापर करत आहेत. सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ ने डिमांड नोटीस जारी केली आहे ज्यामध्ये खाली नमूद केलेल्या कर्जदारांना आणि जामीनदारांना ही नोटीस मिळाल्यापासून ६० दिवसांच्या आत संपूर्ण देय परतफेड करण्याचे आवाहन केले आहे.

कर्जदाराने रकमेची परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यास, याद्वारे कर्जदार, जामीनदार आणि सामान्य जनतेला नोटीस दिली जाते की कलमाच्या उपकलम (४) अंतर्गत त्याला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खाली स्वाक्षरीदाराने खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे. ०३/०५/२०२४ रोजी सुरक्षा हित अंमलबजावणी नियम, २००२ च्या नियम ८ सह अधिनियमाचे १३ वाचले विशेषत: कर्जदाराला आणि सर्वसाधारणपणे जनतेला याद्वारे सावध केले जाते की मालमत्तेचा व्यवहार करू नये आणि मालमत्तेचा कोणताही व्यवहार येथे नमूद केलेल्या रकमेसाठी बँक ऑफ महाराष्ट्रच्या शुल्काच्या अधीन असेल.

सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्यासाठी, उपलब्ध वेळेनुसार, कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे कर्जदाराचे लक्ष वेधले जाते.

| अ. क्र. | शाखा, कर्जदार आणि जामीनदार यांचे नाव | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील | डिमांड नोटिसची तारीख आणि एकूण थकबाकी |
|---|---|---|---|
| १ | **शाखा- वळसंग.**<br>**कर्जदार -**<br>१. मे/से. श्री स्वामी समर्थ दूध डेअरी अँड मिल्क एजन्सी.<br>प्रस्ताव : सौ.संगिता शिवाजी रायकम<br>पत्ता:- पोस्ट एच नं ४२३, भारतरत्न इंदिरा नगर, ७० फूट रोड, न्यू पाच्छा पेठ, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर-४१३००५. | M/s च्या साठा आणि यंत्रसामग्रीचे अनुमान. श्री स्वामी समर्थ दूध डेअरी अँड मिल्क एजन्सी.<br>प्रस्ताव : सौ.संगिता शिवाजी रायकम<br>पत्ता :- पोस्ट एच नं ४२३, भारतरत्न इंदिरा नगर, ७० फूट रोड, न्यू पाच्छा पेठ, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर-४१३००५ | **मागणी सूंचनाः**<br>दि. १२.०२.२०२४<br>रु.१४,००,५९३.००/- अधिक लागू न केलेले व्याज १२.२५% १२/०२/२०२४ पासून कर्जाची वसुली होईपर्यंत<br>**प्रतिकात्मक ताबा तारीखः**<br>०३/०५/२०२४ |
| २ | **शाखा - वळसंग**<br>**कर्जदार-**<br>१. मुस्तफा बागवान<br>पत्ता: पोस्ट १०७१, न्यू पाच्छा पेठ, उत्तर सोलापूर, दाजी पेठ, सोलापूर-४१३००५.<br>**सह-कर्जदार-**<br>१.श्री. महिबूब वजीरसाब बागवान<br>पत्ता : पोस्ट १०७१ वर, नवीन पाच्छा पेठ, उत्तर सोलापूर, दाजी पेठ, सोलापूर-४१३००५. | **मुस्तफा बागवान यांच्या नावावर मालमत्ता गहाण**<br>दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅट क्र. ९ वर ६१.४३ चौरस मीटर ७६.७८ चौरस मीटर आकाराचा प्लॉट क्रमांक/S.No./CTS क्रमांक/Gat No.Milkat No.10389 ,TP Z§.1 अंतिम भूखंड क्र.३५ चे साधे गहाण /सब प्लॉट ९७/२ नवीन पाच पेठ ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर. खालीलप्रमाणे सीमा:- पूर्व:- मार्ग, पश्चिम:- मार्जिन स्पेस, दक्षिण:- मार्जिन स्पेस, उत्तर :- जिना | **मागणी सूचना-**<br>**१२/०२/२०२४**<br>रु.२७,८१,०४६/- अधिक लागू न केलेले व्याज १२.२५% W.e.f. १२/०२/२०२४ पर्यंत कर्जाची वसुली होईपर्यंत<br>**प्रतिकात्मक ताबा तारीखः**<br>०३/०५/२०२४ |
| ३ | **शाखा - वळसंग.**<br>**कर्जदार-**<br>१. श्री.संभाजी दगडू निकम<br>पत्ता:- पोस्ट २४ मित्रनगर, शेळगी, मारुती मंदिर, उत्तर सोलापूर, एमआयडीसी सोलापूर, महाराष्ट्र-४१३००६.<br>**सह-कर्जदार-**<br>सौ.मीरा संभाजी निकम<br>पत्ता:- पोस्ट २४ मित्रनगर, शेळगी, मारुती मंदिर, उत्तर सोलापूर, एमआयडीसी सोलापूर, महाराष्ट्र-४१३००६. | **श्री.संभाजी दगडू निकम यांच्या नावे मालमत्ता गहाण**<br>जयलक्ष्मी रेसिडेन्सीमधील प्लॉट क्र./ एस. क्र./सीटीएस क्र./गॅट क्र. मिळकत क्र. सब प्लॉट क्र. २४७/१ अंतिम प्लॉट क्र. ३५ सीटीएस क्र. १०३८९/ए, फ्लॅट नं. ६, तिसरा मजला, गहाण ठेवा II, नवीन पाच्छा पेठ ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर.<br>**खालीलप्रमाणे सीमा:-** पूर्व :- त्याच अपार्टमेंटचा उर्वरित भाग आणि अंतिम भूखंड क्रमांक ३४//१० आणि ३४/११, पश्चिम:- या अपार्टमेंटचा उर्वरित भाग, दक्षिण:- अंतिम भूखंड क्रमांक ३५/२४७/२, उत्तर :- अंतिम भूखंड क्रमांक ३५/२४८ | **मागणी सूचना-**<br>**१२/०२/२०२४**<br>१२.०२.२०२४ पासून कर्जाची वसुली होईपर्यंत रु.३८,६४,७८३.००/- अधिक अलागू व्याज १२.२५%<br>**प्रतिकात्मक ताबा तारीख :**<br>०३/०५/२०२४ |
| ४ | **शाखा - वलसंग.**<br>**कर्जदार-**<br>१.M/s जय महाराष्ट्र मिर्ची मसाला आणि किराणा झ्री.ची. मुस्तफा बागवान पत्ता : पोस्ट शॉप क्रमांक ७, गुंटुक कॉम्प्लेक्स, न्यू पाच पेठ, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर-४१३००५.<br>**हमीदार**<br>२.श्री. महिबूब वजीरसाब बागवान<br>पत्ता: पोस्ट १०७१, न्यू पाच्छा पेठ, तालुका उत्तर सोलापूर, जिल्हा सोलापूर-४१३००५ | १. M/s च्या साठा आणि यंत्रसामग्रीचे हायपोथेकेशन. जय महाराष्ट्र मिर्ची मसाला आणि किराणा Prop.Mr. मुस्तफा बागवान<br>**२.श्री. मुस्तफा बागवान यांच्या नावावर मालमत्ता गहाण**<br>पत्ता:- प्लॉट क्र./S.No.CTS No./Gat No.Milkat No.CTS No.10389 TP No.1, Final Plot No.35 Sub Plot No.97/2, फ्लॅट/घर क्र. ९, दुसरा मजला, भूदेवी टॉवर्स, नवीन पाच पेठ ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर.<br>खालीलप्रमाणे सीमा:- पूर्व:- मार्ग, पश्चिम:- मार्जिन स्पेस, दक्षिण:- मार्जिन स्पेस, उत्तर :- जिना | **मागणी सूचना-१२ /०२/२०२४**<br>रु.१५,१४,४४५.००/- अधिक लागू न केलेले व्याज १२.२५% W.e.f. १२/०२/२०२४ कर्जाची वसुली होईपर्यंत<br>**प्रतिकात्मक ताबा तारीखः**<br>०३/०५/२०२४ |

**ठिकाण - सोलापूर**
**दिनांक - ०६/०५/२०२४**

**सही/- मुख्य व्यवस्थापक व प्राधिकृत अधिकारी, सोलापूर झोन.**

## महत्त्वाचे

### भारताचा बांगलादेशवर सलग चौथा विजय

**सिलहट** : कर्णधार हरमनप्रीत कौरच्या शानदार खेळीनंतर, दीप्ती शर्माच्या नेतृत्वाखालील गोलंदाजांच्या प्रभावी कामगिरीमुळे, भारताने



बांगलादेशचा डकवर्थ-लुईस पद्धतीने १४ षटकांच्या चौथ्या महिला टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात पराभव केला. हरमनप्रीत (३९) आणि ऋचा घोष (२४) यांच्यातील चौथ्या गड्यासाठी ४४ धावांच्या भागीदारीच्या जोरावर भारताने सहा गडी गमावून १२२ धावा केल्या. सलामीवीर स्मृती मानधना (२२) आणि डी. हेमलता (२२) यांनीही उपयुक्त खेळी खेळल्या. डकवर्थ लुईस पद्धतीनुसार बांगलादेशला १२५ धावांचे लक्ष्य मिळाले पण दीप्ती शर्मा (१३ धावांत दोन गडी), आशा शोभना (१८ धावांत दोन गडी) आणि राधा यादव (एक गडी) यांच्या फिरकीच्या जादूने यजमानांचा पराभव झाला. बांगलादेशकडून दिलारा अख्तर (२१), रुबिया हैदर (१३) आणि शोरिफा खातून (नाबाद ११) या सलामीवीरांनाच दुहेरी धावसंख्या गाठता आली. लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या बांगलादेशची सुरुवात अतिशय संथ झाली आणि पॉवर प्लेच्या चार षटकांत संघाला एका गड्याच्या मोबदल्यात केवळ २१ धावा करता आल्या. ■

### पाच भारतीय युवा मुष्टियोद्ध्यांची आशियाई स्पर्धेत चमकदार कामगिरी

**अस्ताना (कझाकिस्तान)** : पाच युवा भारतीय मुष्टियोद्धा ब्रिजेश टमटा, आर्यन हुडा, यशवर्धन सिंग, लक्ष्मी आणि निशा यांनी सोमवारी येथे एएसबीसी आशियाई २२ वर्षांखालील आणि युवा बॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये चमकदार कामगिरी करत सुवर्णपदक जिंकले.ब्रिजेशने पुरुषांच्या ४८ किलो वजनी गटाच्या अंतिम फेरीत ताजिकिस्तानच्या मुमिनोव मुइनखोदझाचा ५-० असा पराभव करून भारताला स्पर्धेतील पहिले सुवर्णपदक मिळवून दिले. आर्यनने किर्गिस्तानच्या कामिलोव्ह जाफरबेकविरुद्ध विजय मिळवत भारताचे वर्चस्व कायम ठेवले. यशवर्धन सिंगला ताजिकिस्तानच्या गफुरोव रुस्लानविरुद्ध विजय मिळवताना खूप घाम गाळावा लागला. महिला गटात सध्याच्या ज्युनियर वर्ल्ड चॅम्पियन निशाने ५२ किलो वजनी गटात कझाकिस्तानच्या ओटिनबे बागजानचा ५-० असा पराभव करून सुवर्णपदक जिंकले.

लक्ष्मी (५० किलो) ने मंगोलियाच्या एन्ख नोमुंडरी विरुद्ध भारताचे पाचवे सुवर्णपदक जिंकले. दरम्यान, सागर जाखर, प्रियांशु, राहुल कुंडू, आर्यन, तमन्ना, निकिता चंद, सृष्टी साठे यांना अंतिम फेरीत पराभव पत्करावा लागल्याने रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. युवा गटात २२ पदके आणि २२ वर्षांखालील गटात २१ पदकांसह भारतीय संघाने या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत ४३ पदके निश्चित केली आहेत.

### राष्ट्रीय महिला हॉकी लीगमध्ये बंगाल, ओडिशा विजयी

**रांची** : बंगाल आणि ओडिशा यांनी सोमवारी येथे राष्ट्रीय महिला हॉकी लीग २०२४ च्या सहाव्या दिवशी अनुक्रमे मिझोराम आणि महाराष्ट्र विरुद्ध विजय नोंदवले. दिवसाच्या पहिल्या सामन्यात बंगालने निकराच्या सामन्यात मिझोरामचा १-० असा पराभव केला. मिझोरामने सुरुवातीला वर्चस्व राखले, मात्र १८व्या मिनिटाला शिवानी कुमारीच्या गोलच्या जोरावर बंगालचा संघ विजयाची नोंद करण्यात यशस्वी ठरला. दिवसाच्या दुसऱ्या सामन्यात ओडिशाने महाराष्ट्राचा २-१ असा पराभव केला. ओडिशाकडून दीपी मोनिका टोप्पो आणि करुणा मिंजा यांनी गोल केले, तर महाराष्ट्रासाठी एकमेव गोल सुनीता कुमारीने केला. ■

# दिल्लीसाठी आजचा सामना महत्त्वाचा

### ऋषभ पंत, फ्रेझर मॅकगर्कवर सर्वांची नजर

### राजस्थान रॉयल्स विजयी घोडदौड कायम राखणार

◆ **नवी दिल्ली, ६ मे**

आयपीएलच्या प्लेऑफच्या शर्यतीत कायम राहण्यासाठी दिल्ली कॅपिटल्सला मंगळवारी राजस्थान रॉयल्ससारख्या सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या संघाला कोणत्याही परिस्थितीत पराभूत करावे लागेल आणि सर्वांच्या नजरा कर्णधार ऋषभ पंतच्या फलंदाजीकडे राहणार आहे.

दिल्लीने आतापर्यंत ११ पैकी ५ सामने जिंकले आहेत तर ६ सामने गमावले आहेत. दिल्लीला उर्वरित तीन सामने कोणत्याही किमतीत जिंकावे लागतील, तरीही त्यांच्याकडे केवळ १६ गुण असतील, जे प्लेऑफमध्ये पोहोचण्यासाठी पुरेसे नसतील.

कोलकाता नाईट रायडर्स (११ सामन्यांत १६ गुण), राजस्थान रॉयल्स (१० सामन्यांत १६ गुण), चेन्नई सुपर किंग्ज (११ सामन्यांत १२ गुण), सनरायझर्स हैदराबाद (१० सामन्यांत १२ गुण) आणि लखनौ सुपर जायंट्स (११ सामन्यांत १२ गुण) याशिवाय १६ गुणांच्या पुढे जाऊ शकतात.



ऋषभ पंत



संजू सॅमसन

अशा स्थितीत दिल्लीला सर्वोत्तम कामगिरी करूनही पात्रता मिळवता येणार नाही, पण ज्यावर नियंत्रण ठेवता येईल तेच नियंत्रित करण्याच्या महेंद्रसिंग धोनीच्या धोरणावर पंतचा विश्वास आहे.

अरुण जेटली स्टेडियमच्या सपाट खेळपट्टीवर पंतसाठी दुहेरी आव्हान असेल. खलील अहमद, ईशांत शर्मा आणि कुलदीप यादव या त्याच्या गोलंदाजांनी यशस्वी जैस्वाल, संजू सॅमसन आणि रियान पराग यांना स्वस्तात बाद करावे अशी त्याची इच्छा आहे.

तीन अर्धशतकांसह आतापर्यंत ३८० धावा करणाऱ्या ऋषभ पंतवर पुन्हा एकदा चांगल्या कामगिरीची जबाबदारी असेल. त्यांच्याकडे ऑस्ट्रेलियाचा युवा फ्रेझर मॅकगर्कसारखा आक्रमक फलंदाज आहे. हे दोघे मिळून सामन्याचा निकाल बदलू शकतात. मात्र, दिल्लीसमोर राजस्थान रॉयल्सच्या गोलंदाजीचे कडवे आव्हान असेल.

युझवेंद्र चहल आणि रविचंद्रन अश्विन यांना खेळणे सोपे नसेल. त्याच्याशिवाय रॉयल्सकडे संदीप शर्माच्या रूपाने आणखी एक उपयुक्त गोलंदाज आहे. राजस्थानच्या गोलंदाजांचा इकॉनॉमी रेटही चांगला आहे, पण दिल्लीकडे अक्षर पटेल आणि कुलदीप यादव हे एकमेव गोलंदाज आहेत ज्यांचा इकॉनॉमी रेट नऊच्या खाली आहे. खलील अहमद, मुकेश कुमार, लिझाद विल्यम्स आणि नरिक नोर्किया हे खूप महागडे ठरले आहेत. गेल्या वेळी मार्चमध्ये दोन्ही संघ जयपूरमध्ये आमनेसामने आले होते. त्यामध्ये दिल्लीला पराभवाचा सामना करावा लागला होता. ◂(वृत्तसंस्था)

**आजचा आयपीएल सामना**

**दिल्ली कॅपिटल्स वि. राजस्थान रॉयल्स**
**स्थान** : अरुण जेटली क्रिकेट स्टेडियम, दिल्ली
**वेळ** : सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

### मनिकाकडून वांग मन्युचा पराभव

◆ **सौदी अरब, ६ मे**

भारतीय टेबल टेनिस स्टार मनिका बत्रा हिने सोमवारी येथे सौदी स्मॅश स्पर्धेत जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकाच्या चीनच्या वांग मन्युचा पराभव करून पूर्व उपांत्य फेरीत प्रवेश केला. जागतिक क्रमवारीत ३९व्या क्रमांकावर असलेल्या मनिकाने दुसऱ्या मानांकित चीनच्या खेळाडूवर ३७ मिनिटांचा सामना ६-११, ११-५, ११-७, १२-१० असा जिंकला. टोकियो ऑलिम्पिक संघाच्या सुवर्णपदक विजेत्या आणि २०२१ च्या विश्व विजेत्या विरुद्ध मनिकाने सुरुवातीचा गेम गमावला, परंतु तिने पुढचे दोन गेम जिंकले. गैरमानांकित मनिकाने रविवारी रोमानियाच्या अँड्रिया ड्रॅगोमनचा पराभव केला होता. ◂(वृत्तसंस्था)

# मलेशियन फुटबॉलपटूवर जीवघेणा ॲसिड हल्ला

### संशयिताला अटक

◆ **क्वालालम्पूर, ६ मे**

मलेशियन फुटबॉलपटूवर रविवारी जीवघेणा हल्ला झाला. फैसल हलीम नावाच्या या फुटबॉलपटूवर एका शॉपिंग मॉलमध्ये ॲसिड फेकण्यात आले, त्यामुळे तो भाजला. सेलंगोरचे राज्य क्रीडा अधिकारी नजवान हलीमी यांनी सांगितले की, मलेशियाच्या राष्ट्रीय संघाचा खेळाडू फैसल याच्यावर क्वालालम्पूरच्या बाहेरील पेटलिंग जया जिल्ह्यात हल्ला झाला. त्यामुळे फैसल जखमी झाला. त्याच्या मानेवर, खांद्यावर, हातावर आणि छातीवर जखमेच्या खुणा आहेत. नजवान म्हणाले मी या हिंसाचाराचा तीव्र



निषेध करतो आणि पोलिसांना लवकरात लवकर दोषीला अटक करण्याची विनंती करतो. सेलंगोरचे पोलिस प्रमुख हुसेन उमर खान यांनी दिलेल्या माहितीनुसार, याप्रकरणी एका संशयिताला अटक करण्यात आली आहे. मात्र, यामागचा हेतू त्यांनी अद्याप उघड केलेला नाही. ऑनलाइन व्हायरल झालेल्या एका फोटोमध्ये फैसल बेंचवर बसलेला असून त्याच्या शरीरावर जळण्याच्या खुणा आहेत.

तीन दिवसांपूर्वी एका हल्ल्यात सहकारी खेळाडू जखमी झाला होता. पूर्वेकडील तेरेंगानू राज्यात घराबाहेर पडलेल्या दरोड्यात आणखी एक राष्ट्रीय खेळाडू अख्यर रशीद जखमी झाल्यानंतर तीन दिवसांनी हा हल्ला झाला. स्थानिक माध्यमांनुसार, दोन अज्ञात संशयितांनी २५ वर्षीय अख्यारवर लोखंडी रॉडने हल्ला केला आणि त्याच्या डोक्याला आणि पायाला दुखापत झाली, ज्यासाठी टाके घालावे लागले. ◂(वृत्तसंस्था)

# विश्वचषक स्पर्धेची सुरक्षा वाढविणार

### स्पर्धा नियोजित कार्यक्रमानुसारच होणार

◆ **पोर्ट ऑफ स्पेन, ६ मे**

वेस्ट इंडीज आणि अमेरिकेत होणाऱ्या टी-२० विश्वचषकाला दहशतवादी धमकी मिळाली आहे. त्रिनिदादचे पंतप्रधान कीथ रॉली यांनी हा खुलासा केला आहे, तर आयसीसीने १ जूनपासून सुरू होणाऱ्या स्पर्धेच्या सुरक्षेसाठी सर्वसमावेशक आणि मजबूत योजना तयार करण्यात आल्याचे सांगितले आहे. १ जूनपासून होणाऱ्या टी-२० विश्वचषकात भारतासह २० संघ सहभागी होत आहेत.

वेस्ट इंडीजला धमकी मिळाली आहे. काही प्राथमिक फेरीच्या सामन्यांव्यतिरिक्त उपांत्य फेरी आणि अंतिम सामना वेस्ट इंडीजमध्ये खेळवला जाईल. रॉली यांनी सांगितले की, हे दुर्दैवी आहे की २१व्या शतकातही दहशतवादाचा धोका वेगवेगळ्या स्वरूपात जगात कायम आहे.

त्यांनी कोणत्याही संघटनेचे नाव घेतले नाही पण इस्लामिक स्टेटने आपल्या चॅनलद्वारे ही धमकी दिल्याचे वृत्त आहे. आयसीसीच्या प्रवक्त्याने एका निवेदनात म्हटले आहे की,



स्पर्धेमधील प्रत्येकाची सुरक्षा ही आमची प्राथमिकता आहे आणि एक व्यापक आणि मजबूत सुरक्षा योजना तयार करण्यात आली आहे. त्यात म्हटले आहे की, आम्ही यजमान देशाच्या अधिकाऱ्यांच्या संपर्कात आहोत आणि सतत परिस्थितीवर लक्ष ठेवून आहोत. कोणत्याही प्रकारच्या जोखमीचा सामना करण्यासाठी विस्तृत सुरक्षा उपाय योजले जात आहेत.वेस्ट इंडीजमधील विश्वचषकाचे सामने अँटिग्वा, बार्बुडा, बार्बाडोस, गयाना, सेंट लुसिया, सेंट व्हिन्सेंट, ग्रेनाडा, त्रिनिदाद आणि टोबॅगो येथे खेळवले जातील. अमेरिकेत फ्लोरिडा, न्यू यॉर्क आणि टेक्सासमध्ये सामने होणार आहेत. क्रिकेट वेस्ट इंडीजने सांगितले की, विश्वचषकाच्या सुरक्षिततेसाठी पूर्ण उपाययोजना केल्या जात आहेत. क्रिकेट वेस्ट इंडीजचे सीईओ जॉनी ग्रेव्ह्स म्हणाले, आम्ही अधिकाऱ्यांच्या सहकार्याने परिस्थितीवर सतत लक्ष ठेवून आहोत आणि स्पर्धेच्या सुरक्षेसाठी कडक उपाययोजना केल्या जात आहेत. ◂(वृत्तसंस्था)

# भारतीय पुरुष, महिला रिले संघ पॅरिस ऑलिम्पिकसाठी पात्र





ऑलिम्पिकसाठी पात्र ठरलेले पुरुष संघातील मोहम्मद अनस याहिया, मुहम्मद अजमल, अरोकिया राजीव आणि अमोज जेकब





महिला संघातील सदस्य रूपल चौधरी, एम. आर. पूवम्मा, ज्योतिका श्री दांडी आणि सुभा वेंकटेशन

◆ **नवी दिल्ली, ६ मे**

भारताचे पुरुष आणि महिला रिले संघ पॅरिस ऑलिम्पिकसाठी पात्र ठरले आहेत. ४ बाय ४०० मीटर रिले संघ (पुरुष आणि महिला दोन्ही) सोमवारी बहामासच्या नासाऊ येथील जागतिक ॲथ्लेटिक्स रिलेमध्ये आपापल्या दुसऱ्या फेरीच्या हीटमध्ये दुसरे स्थान मिळवून पॅरिस ऑलिम्पिकसाठी पात्र ठरले.

महिलांच्या स्पर्धेतील हीट क्रमांक एकमध्ये, जमैकाने प्रथम स्थान मिळविले (३:२८.५४), तर रूपल चौधरी, एम. आर. पूवम्मा, ज्योतिका श्री दांडी आणि सुभा वेंकटेशन यांनी दुसरे स्थान मिळवले आणि पुरुष संघाचा समावेश असलेल्या पॅरिस गेम्सचे तिकीट मिळवले. मोहम्मद अनस याहिया, मुहम्मद अजमल, अरोकिया राजीव आणि अमोज जेकब यांनी ३ मिनिटे आणि ३.२३ सेकंद अशी एकत्रित वेळ नोंदवून दुसरे स्थान पटकावले. यूएसए संघ (२:५९.९५) प्रथम क्रमांकावर राहिला.

दुसऱ्या फेरीत तीन हीटमध्ये सर्वोच्च स्थान मिळवणारे दोन संघ २६ जुलै ते ११ ऑगस्टपर्यंत चालणाऱ्या ऑलिम्पिकमध्ये प्रवेश करतील. रविवारी पहिल्या फेरीच्या पात्रता फेरीत भारतीय महिला संघ ३ मिनिटांच्या वेळेसह सातव्या स्थानावर राहिला. आणि २९.७४ सेकंदात पुरुष संघ पहिल्या फेरीतील पात्रता पूर्ण करू शकला नाही. सध्याचा भालाफेक विजेता नीरजसह भारताचे १९ ट्रॅक आणि फील्ड स्पर्धक पॅरिसला जात आहेत. पॅरिस ऑलिम्पिकच्या ॲथ्लेटिक्स स्पर्धा १ ऑगस्टपासून सुरू होणार आहेत. ◂(वृत्तसंस्था)

### आंद्रेई रुबलेव्ह माद्रिद ओपन टेनिस विजेता

◆ **माद्रिद, ६ मे**

तापामुळे रात्रभर झोप येत नसतानाही रशियाच्या आंद्रेई रुबलेव्हने चमकदार



कामगिरी करत प्रथमच माद्रिद ओपन टेनिस स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. रुबलेव्हने आगर लिअसिमचा ४-६, ७-५, ७-५ असा पराभव केला. विजयानंतर तो म्हणाला, माझ्याकडे शब्द नाहीत. शेवटचे नऊ दिवस कसे गेले हे तुम्हाला माहीत असेल. मी हे विजेतेपद कसे जिंकू शकलो यावर तुमचा विश्वास बसणार नाही.'' नोव्हाक जोकोविचने दुखापतीमुळे स्पर्धेतून माघार घेतली होती, तर डॅनिल मेदवेदेव उपांत्यपूर्व फेरीत निवृत्त झाला होता. कार्लोस अल्काराझ उजव्या हाताला सूज आल्याने झगडत होता आणि राफेल नदाल लवकर पराभूत झाल्याने बाद झाला. इंगा स्विटेकने महिला गटात प्रथमच हे विजेतेपद पटकावले. ◂(वृत्तसंस्था)

# भारतीय ज्युनियर महिला हॉकी संघाची घोषणा

### २१ ते २९ मे दरम्यान युरोप दौरा

### ज्योती सिंग कर्णधार, साक्षी राणा उपकर्णधार

◆ **नवी दिल्ली, ६ मे**

भारतीय हॉकी महासंघाने २२ सदस्यीय ज्युनियर महिला संघ जाहीर केला आहे. हा संघ २१ ते २९ मे दरम्यान युरोप दौऱ्यावर जाणार आहे. संघाचे नेतृत्व बचावपटू ज्योती सिंग करणार आहे तर, मिडफिल्डर साक्षी राणाला उपकर्णधारपद देण्यात आले आहे.

भारत आपला खेळ मजबूत करण्यासाठी आणि जागतिक स्तरावर प्रतिस्पर्धा संघांवर वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी बेल्जियम, जर्मनी आणि नेदरलँड्समध्ये सामने खेळणार आहे.

भारत २१ मे रोजी ब्रेड्झ हॉकी व्हेरीनिगिंग पुष्प विरुद्ध ब्रेडा येथे पहिला सामना खेळेल आणि त्यानंतर दुसऱ्या दिवशी येथे बेल्जियम विरुद्ध खेळेल. यानंतर भारताचा पुन्हा एकदा सामना बेल्जियमशी होणार आहे.

त्यानंतर २६ मे रोजी ब्रेडा येथे जर्मनी आणि २७ मे रोजी जर्मनीविरुद्ध सलग सामने होतील. त्यानंतर संघ २९ मे रोजी ओरांजे रुड विरुद्ध दौऱ्यातील अंतिम सामना खेळण्यासाठी ब्रेड्झ येथे परतेल. ◂(वृत्तसंस्था)



**भारतीय ज्युनियर महिला संघ**

**गोलरक्षक** : अदिती माहेश्वरी, निधी.

**बचावपटू** : ज्योती सिंग (कर्णधार), लालथंटलुआंगी, अंजली बर्वा, पूजा साहू, ममिता ओरम, निरुकुल्लू.

**मिडफिल्डर** : क्षेत्रीमायुम सोनिया देवी, रजनी केरकेट्टा, प्रियांका यादव, खैदेम शिलेमा चानू, साक्षी राणा (उपकर्णधार), अनिशा साहू, सुप्रिया कुजूर.

**फॉरवर्ड** : बिनिमा धन, हिना बानो, लालरिनपुई, इशिका, संजना होरो, सोनम, कनिका सिवाच. ■

# राहुल गांधींच्या नादाला लागून वडेट्टीवारांचे डोकं फिरले

**शिंदेंची सडकून टीका**

◆ **मुंबई, ६ मे**

विजय वडेट्टीवार यांनी हुतात्म्यांचा अपमान केला. राहुल गांधींच्या नादाला लागून वडेट्टीवारांचे डोकं फिरले आहे, अशी सडकून टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. शिवसेनेत होते, तेव्हा बाळासाहेब ठाकरे यांच्या विचाराने चांगले काम करायचे, असा खोचक टोला त्यांनी लगावला.

विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केलेल्या विधानामुळे सध्या राज्याचे वातावरण तापले आहे. हेमंत करकरे यांना लागलेली गोळी कसाबच्या बंदुकीतील नव्हती, तर संघ समर्थक पोलिस अधिकाऱ्याने झाडली होती. हे सत्य वकिल उज्वल निकम यांनी लपवून ठेवले, असा गंभीर आरोप वडेट्टीवार यांनी केला होता. त्यावर मुख्यमंत्री शिंदे आक्रमक झाले. त्यांनी थेट वडेट्टीवारांचे डोकं फिरले म्हणून ते अशी विधान करीत आहेत, असा हल्लाबोल शिंदेंनी केला. मुंबईत ते पत्रकारांशी संवाद साधत होते. वडेट्टीवार यांनी हुतात्म्यांचा अपमान केला आहे. काँग्रेसमध्ये गेल्यामुळे ते बिघडले आहेत, असे म्हणत, राज्याचा मुख्यमंत्री म्हणून मी अशा वक्तव्याचा निषेध करतो, असे शिंदे म्हणाले. पाकिस्तानधार्जिणे काँग्रेससोबत मांडीला मांडी लावून बसताना नकली हिंदू असलेल्यांना लाज वाटत नाही, असे म्हणत त्यांनी उद्धव ठाकरे यांच्यावरही शरसंधान साधले. ◂(तभा वृत्तसेवा)

# राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत विनीत आखाडेला रौप्य

◆ **देवळी, ६ मे**

दिल्ली येथे झालेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत येथील विनीत आखाडे याने दौड स्पर्धेत भारतातून दुसरा क्रमांक प्राप्त करून रौप्य



पदकावर नाव कोरले. राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत शहराचे नाव उंचावल्याबद्दल त्याचे अभिनंदन होत आहे.

स्टेअर फाऊंडेशनतर्फे दिल्ली येथे राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या. या क्रीडा स्पर्धेत भारतातील विविध राज्यांतील संघ सहभागी होते. यात स्थानिक जनता ज्युनिअर कॉलेजचा अकरावीचा विद्यार्थी विनीत आखाडे याने २०० मीटर धाव स्पर्धेत भारतातून दुसरा क्रमांक प्राप्त करून रौप्य पदक प्राप्त केले. स्टेअर फाऊंडेशनचे अधिकारी राजू बाणमारे, भगत व महाविद्यालयाचे प्राचार्य धर्मेश झाडे यांनी विनीतचे अभिनंदन केले. ◂(तभा वृत्तसेवा)

# नसीम खान यांचा राजीनामा मागे

**मुंबई** : लोकसभेच्या उमेदवारीवरून नाराज झालेले काँग्रेसचे नेते नसीम खान यांची नाराजी दूर करण्यात पक्षश्रेष्ठींना अखेर यश आले. काँग्रेस नेते राहुल गांधी तसेच महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी मध्यस्थी केल्यानंतर नसीम खान यांनी पक्षाच्या प्रचार समितीचा राजीनामा मागे घेत प्रचारात सक्रिय होणार असल्याचे सोमवारी जाहीर केले. वर्षा गायकवाड यांना लोकसभेची उमेदवारी दिल्यानंतर त्यांनी जाहीरपणे नाराजी व्यक्त करीत नसीम यांनी प्रचार समिती पदाचा राजीनामा दिला होता. निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर पक्षातील नाराजीचा फटका बसू नये, यासाठी पक्षश्रेष्ठींकडून त्यांच्या मनधरणीचे प्रयत्न सुरू केले होते. ■

# रिअल माद्रिदचे विक्रमी ३६ वे ला लीगा विजेतेपद





### कॅडिझचा ३-० ने पराभव

◆ **माद्रिद, ६ मे**

चार सामने शिल्लक असताना रिअल माद्रिदने स्पॅनिश फुटबॉल लीग ला लीगाचे विजेतेपद पटकावले. माद्रिदने त्यांची बेंच स्ट्रेंथ वापरूनही कॅडिझचा ३-० असा पराभव केला. त्यानंतर बार्सिलोना वेरोनाविरुद्ध २-४ ने पराभूत होऊन माद्रिदचे विजेतेपद सुनिश्चित केले. माद्रिदने आपली कामगिरी सुधारली आणि ३६व्यांदा ला लीगा जेतेपद पटकावले. या विजयासह वेरोनाच्या संघाने बार्सिलोनाला मागे टाकले आणि ३४ सामन्यांत ७४ गुणांसह दुसरे स्थान गाठले. बार्सिलोना ७३ गुणांसह तिसऱ्या स्थानावर आहे. माद्रिदचे ३४ सामन्यांत ८७ गुण आहेत, जे वेरोनापेक्षा १३ गुण अधिक आहेत. आता वेरोना जास्तीत जास्त १२ गुण मिळवू शकते, ज्यामुळे माद्रिदच्या विजेतेपदावर शिक्कामोर्तब झाले आहे. ◂(वृत्तसंस्था)

### इलेक्शन ड्युटीवर पोलिसांचा जुगाराचा डाव

◆ **बिलासपूर, ६ मे**

निवडणूक ड्युटीवर तैनात असलेले पोलिस आणि इतर कर्मचारी जुगार खेळत बसले होते. जिंकणे किंवा हरणे यावर हजारो रुपयांची पैज लावली जात होती. यावेळी कॅमेरा सुरू होताच पोलिसांची पळापळ सुरू झाली. या दरम्यान त्यांनी पत्रकारांवर दगडफेकही केली.

वास्तविक, कोनी येथील अभियांत्रिकी महाविद्यालयात निवडणूक आयोगाने स्ट्राँग रूम तयार केली आहे. येथे तिसऱ्या टप्प्यातील मतदानासाठी साहित्य पोहोचवण्यासाठी कर्मचाऱ्यांना पाचारण करण्यात आले होते. यात पोलिसांचाही समावेश आहे. या वेळी काही पत्रकार निवडणुकीच्या वृत्तांकनासाठी पोहोचले होते. महाविद्यालयातील मतदान केंद्रांकडे रवाना होण्यापूर्वी पोलिसांनी मैफल बसवली. यात निवडणूक कर्तव्यात सहभागी मतदान अधिकारी, कर्मचारी आणि वाहनचालकांचा समावेश होता. ◂(वृत्तसंस्था)

# युवांमध्ये क्रीडा संस्कृती रुजविण्याची गरज

**आज जागतिक ॲथ्लेटिक्स दिन**



**२०० हून अधिक देशांचा सहभाग**

### क्रीडा संस्कृती पुढे नेण्याची गरज

जागरूकता वाढवणे, युवकांचा उत्साहवर्धक सहभाग, एकता आणि आपलेपणा, भविष्यातील पिढ्यांना प्रेरणा देणे यासाठी जागतिक ॲथ्लेटिक्स दिन साजरा करण्यात येतो. याद्वारे क्रीडा संस्कृती एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे सोपविली जाते. ■

◆ **नागपूर, ६ मे**

ॲथ्लेटिक्सला प्राथमिक खेळ म्हणून प्रोत्साहन देण्यासाठी, जागतिक ॲथ्लेटिक्स दिन दरवर्षी ७ मे रोजी देशभरातील शाळा, महाविद्यालये आणि इतर मंचांवर साजरा केला जातो. हा दिवस आंतरराष्ट्रीय हौशी ॲथ्लेटिक्स फेडरेशनद्वारे जगभरातील विविध व्यासपीठांवर साजरा केला जातो. लोकांना निरोगी आणि गतिमान जीवन जगण्यासाठी प्रेरणा देणे आणि ॲथ्लेटिक्सच्या क्षेत्रात नवीन प्रतिभा आणि तरुणांना जागतिक स्तरावर आणणे हा त्याचा मुख्य उद्देश आहे. या निमित्ताने जगभरात क्रीडा कार्यक्रम, उपक्रम आणि जनजागृती मोहीम आयोजित केली जाते.

### वैदिक काळापासून भारतात परंपरा

भारतातील ॲथ्लेटिक्सचा इतिहास वैदिक काळापासून सुरू आहे. कारण रामायण आणि महाभारताच्या काळापासून रथ शर्यत, तिरंदाजी, घोडेस्वारी, रणनीती, कुस्ती, भारोत्तोलन, पोहणे, शिकार यासारखे लष्करी खेळ वैदिक काळापासून चालत आले आहेत. तिरंदाजी, घोडेस्वारी, हातोडा फेकणे आणि रथ शर्यती यासारख्या स्पर्धा प्रचलित असताना, बौद्ध काळात भारतीय ॲथ्लेटिक्सने उल्लेखनीय परिमाण प्राप्त केले. त्या काळात, भारतीय साम्राज्यांच्या लष्करी प्रशिक्षण सत्रांमध्ये सर्व खेळ अनिवार्य होते. चालणे, गिल्ली-दंडा, भालाफेक इत्यादी खेळांनी मध्ययुगीन काळात प्राचीन भारतात आपले अस्तित्व जाणवले. ■

आंतरराष्ट्रीय हौशी ॲथ्लेटिक्स फेडरेशन (आयएएएफ)चे तत्कालीन अध्यक्ष प्रायमो नेबियोलो यांच्या संकल्पनेतून १९९६ मध्ये जागतिक ॲथ्लेटिक्स दिनाची सुरुवात झाली. ॲथ्लेटिक्सच्या मूल्यांना प्रोत्साहन देणे आणि तरुणांमध्ये सहभागास प्रोत्साहन देणे हे नेबियोलो यांचे उद्दिष्ट होते. सुरुवातीच्या प्रयत्नांनी युवा भागीदारी प्रकल्पाला लक्ष्य केले, ज्याचा उद्देश पुढील पिढीच्या खेळाडू, प्रशिक्षक आणि अधिकारी यांना प्रेरणा देण्याचे आहे. शाळा आणि ॲथ्लेटिक्स क्लबने स्थानिक कार्यक्रम आणि उपक्रम आयोजित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. आज, जागतिक ॲथ्लेटिक्स दिन २०० हून अधिक देशांमध्ये विविध कार्यक्रम, स्पर्धा, शिबिरे आणि जागरूकता मोहिमांद्वारे साजरा केला जातो. ◂(वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### रेल्वे अपघातातील मुक्या प्राण्यांवर सांगोल्यात वेळीच उपचार केल्याने मिळाले जीवदान!

**सांगोला, दि. ६ मे-**

सांगोल्यात रेल्वेच्या धडकेत जखमी झालेले गाढव आणि त्याच्या पिल्लाला प्राणीप्रेमींनी तत्काळ उपचार केल्याने त्या दोघांना जीवदान मिळाले. या कार्याचे सर्वस्तरातून कौतुक करण्यात येत आहे. रविवारी दु.१२.२० वा. कुर्डूवाडी-मिरज पॅसेंजर रेल्वे सांगोला स्टेशनवरून निघाली होती. त्याचदरम्यान शिवसुंदर हॉटेलच्या मागे रुळावरच लहान शिंगरूसोबत गाढव थांबलेले होते. रेल्वेचालकाने हॉर्न देऊनही पिलाला काही कळाले नाही. त्याला न हालता आल्यामुळे आईचे प्रेम पिलाभोवतीच घुटमळत राहिले. त्यामुळे गाढवही तिथून हलले नाही. रेल्वेचालकाने ब्रेक दाबून दोघांना वाचवण्याचा प्रयत्न केला. रेल्वेही थांबवली. तरीही गाढव आणि पिल्लू रेल्वेच्या डब्याखाली सापडले. कर्मचाऱ्यांनी जखमी गाढव आणि त्याच्या पिलाला बाहेर काढल्यानंतर रेल्वे मार्गस्थ झाली.त्यानंतर तिथे जवळच उपस्थित असलेले पक्षीप्रेमी ग्रुपचे प्रा. डॉ.विधिन कांबळे, आपुलकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र यादव, सचिव संतोष महिमकर, सुरेश चौगुले तसेच शिवसुंदर हॉटेलमधील सर्व कामगारांनी गाढवाला व त्याच्या पिल्लाला पाणी पाजले. राजेंद्र यादव यांनी पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीकांत सुर्वे यांना फोन करून बोलावून घेतले. डॉ.सुर्वे व सोहम पाटील यांनी तात्काळ घटनास्थळी येऊन जखमी दोघांना इतरांच्या मदतीने सावलीत नेऊन उपचार केले. तसेच पिलाच्या पायाला फ्रॅक्चर झाल्याने त्यास प्लास्टर केले. त्यामुळे दोघांचेही प्राण वाचण्यास मदत झाली. मुक्या प्राण्यांना वेळीच उपचार केल्यामुळे जीवदान मिळाले.

### प्रा. राहुल पालके यांची करिअर कट्टा उपक्रमांतर्गत तालुका समन्वयकपदी निवड

**बार्शी, दि. ६ मे-**

येथील श्री शिवाजी महाविद्यालयात इंग्रजी विभागात सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत असणारे राहुल भगवान पालके यांची म



हाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यरत असलेल्या करिअर कट्टा या उपक्रमांतर्गत सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी सोलापूर (तालुका-बार्शी ) या विभागासाठी तालुका समन्वयक म्हणून निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे बार्शी कार्यक्षेत्रामध्ये येणाऱ्या महाविद्यालयामध्ये करिअर कट्टा हा उपक्रम यशस्वीरित्या राबवला जाणार आहे. यासाठी त्यांचे योगदान महत्वाचे ठरणार आहे. त्यांच्या या निवडीबद्दल श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष नंदनजी जगदाळे, सचिव पी. टी. पाटील, ए. पी. देबडवार, जयकुमार शितोळे, प्राचार्य डॉ. ए. बी. शेख, नॅक समन्वयक डॉ. एस. डी. पवार यांनी अभिनंदन केले.




### सोनारी येथील श्री काळभैरवनाथ यात्रेत ओन्ली समाजसेवा संस्थेच्या वतीने पाणी वाटप

**बार्शी, दि. ६ मे-**

बार्शीतील ओन्ली समाजसेवा बहुउद्देशीय संस्थेच्यावतीने अध्यक्ष राहुल वाणी यांच्या विचारातून सोनारी येथील काळभैरवनाथ यात्रेनिमित्त येणाऱ्या भाविकांना २०० जार मोफत पाणी वाटप करण्यात आले. यासाठी पोलीस निरीक्षक खराडे, नितीन गाढवे, ईश्वर सोनवणे, वैभव हांगे, घनशामराव खंडे, दत्ता जाधव यांचे मोलाचे सहकार्य लाभले. यावेळी ओन्ली समाजसेवा बहुउद्देशीय संस्थेचे नागनाथ सोनवणे, माणकोजी ताकभाते, अतुल वाणी, रेखा विधाते, त्रिशाला मिसाळ, सुनील नवले, श्रीमंत चव्हाण, राजेंद्र मस्के, अण्णा जाधव, अमोल रावळ, गणेश कदम, ाहुल नागटिळक, बीभिषण अवताडे उपस्थित होते. आर्थिक मदत केलेल्यांचे संस्थाध्यक्ष राहुल वाणी यांनी आभार मानले.



### सांगोला नगरपरिषद कर्मचाऱ्यांच्या आरोग्य तपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**सांगोला, दि. ६ मे-**

सांगोला नगरपरिषद व इंडियन मेडिकल असोसिएशनतर्फे कर्मचाऱ्यांसाठी मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य शिबीर घेण्यात आले. उद्घाटन मुख्याधिकारी डॉ. गवळी यांनी केले. यावेळी इंडियन मेडिकल असोसिएशनच्या अध्यक्षा डॉ. संध्या गावडे, उपाध्यक्षा डॉ. नेहा पाटील, सचिव डॉ. संगीता पिसे, कोषाध्यक्ष डॉ. शीतल येलपले उपस्थित होत्या. या शिबिरामध्ये डॉ. गावडे, डॉ. पिसे, डॉ. केळकर, स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. पाटील, डॉ.गावडे, डॉ. केळकर, डॉ. भोसले, डॉ. देवकते, डॉ. बंडगर, डॉ.गवळी, डॉ. लवटे, डॉ. भोसले, डॉ. शिंदे, डॉ. डोंबे, डॉ. माळी, डॉ. गायकवाड, डॉ. नष्टे यांनी कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांची आरोग्य तपासणी केली. यावेळी मोफत औषधे, रक्त तपासणी व ईसीजी करण्यात आली. शिबिरासाठी कार्यालय अधीक्षक स्वप्निल हाके, आरोग्य निरीक्षक विनोद सर्वगोड, शहर समन्वयक प्रसाद जिरगे यांनी परिश्रम घेतले.

# बार्शी तालुक्यात ३२९ मतदान केंद्रे

## ३ लाख २१ हजार मतदार करणार मतदान; १,४४९ कर्मचारी अन् ५०६ पोलीस तैनात

### १६५ केंद्रांवर ऑनलाइन वेबकास्टिंग

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ६ मे-**

आज ७ तारखेला होणाऱ्या लोकसभा निवडणुकीच्या मतदानासाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली आहे. उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघात असलेल्या बार्शी विधानसभा मतदारसंघांमध्ये ३२९ मतदान केंद्रामध्ये ३ लाख २१ हजार २७० म तदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. यासाठी १४४९ कर्मचारी ५०६ पोलीस तैनात करण्यात आले आहेत.

याबाबत अधिक माहिती देताना तहसीलदार एफ. आर. शेख म्हणाले की, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी प्रमोद गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली निवडणुकीसाठीची सर्व तयारी पूर्ण झाली आहे. बार्शी तालुक्यात एकूण ३२९ मतदान केंद्र आहेत. यामध्ये २२३ केंद्र हे ग्रामीण भागातील आहेत. तर बार्शी शहरात ९१ आणि वैराग शहरात १५ अशी १०६ केंद्र ही शहरी भागातील आहेत. मतदानाची प्रक्रिया शांततेत पार पाडावी यासाठी ३२ झोनल ऑफिसर नियुक्त केले असून पाच राखीव ठेवण्यात आले आहेत. एकूण १३१६ कर्मचारी हे मतदान केंद्रावर असणार आहेत तर १३३ कर्मचारी ही राखीव ठेवले आहेत. प्रत्येक मतदान केंद्रावर केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी तीन, एक शिपाई आणि एक पोलीस कॉन्स्टेबल असा लवाजामा असणार आहे. मतदानाचे हे सर्व साहित्य मतदान केंद्रावर शासकीय गोदामातून पोहोच करण्यासाठी ५४ रुटवर ४७ एसटी बसेस व ७ जीपही तयार आहेत.



निवडणुकीचे हे मतदान साहित्य वाटप करण्यासाठी ३३ टीम नियुक्त केले असल्याचे निवडणूक शाखेचे नायब तहसीलदार संजीवन मुंडे यांनी सांगितले.

एकूण ३ लाख २१ हजार २७० मतदारांमध्ये १ लाख ५४ हजार ७३४ महिला तर १ लाख ६६ हजार ४९७ पुरुष मतदार आहेत. यामध्ये २०८४ मतदार हे दिव्यांग आहेत तर तृतीयपंथी ३९ मतदाराचा यात समावेश आहे. कर्मचाऱ्यांना मतदान केंद्रावरच भोजनाची तसेच पिण्याचे पाणी ही उपलब्ध करून दिलेले आहे. ज्या मतदान केंद्रात आवारात व्हरांडे किंवा सावलीची सोय नाही अशा ठिकाणी मतदारांना उन्हाचा त्रास होऊ नये यासाठी मंडप उभारण्याचे कामही अंतिम टप्प्यात आले असल्याचे असून ग्रामीण भागात आठ तर शहरात २५ ठिकाणी असे मंडप उभारले जात असल्याचे अपर तहसीलदार वृषाली केसकर यांनी सांगितले. यासोबतच १६५ मतदान केंद्रावर ऑनलाईन वेब कास्टिंग म्हणजेच सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे नियंत्रण असल्याचेही केसकर यांनी सांगितले.

#### पोलिसांचा तगडा बंदोबस्त

शांततेत आणि निर्विघ्नपणे मतदानाची प्रक्रिया पार पडावी यासाठी पोलीस प्रशासनदेखील सज्ज झाले असून बार्शी विधानसभा मतदारसंघात एक डीवायएसपी, दोन पोलीस निरीक्षक,सहा. पोलीस निरीक्षक, फौजदार व सहाय्यक फौजदार असे २९ अधिकारी तैनात केले असून त्यांच्या सोबतीला ५०६ पोलीस कर्मचारी ३०० होमगार्ड एस आर पी चे पाच सेक्शन ही दिमतीला असणार आहेत. पोलिसांचे २२ सेक्टर केले असून एक अधिकारी दोन पोलीस कर्मचारी या सेक्टरमध्ये असणार आहेत अशी माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुल यांनी दिली.

# पोलिंग पार्टींना मतदान साहित्याचे वितरण

## मतदान पथके मतदानस्थळी रवाना; पंढरपुरात ३ लाख ५७ हजार मतदार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ६ मे-**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ अंतर्गत सोलापूर-४२ (अ.जा.) व माढा-४३ लोकसभा मतदारसंघासाठी शुक्रवारी (ता. ७) मतदान होणार आहे. सकाळी ७ ते सायंकाळी ६ या वेळेत मतदारांना आपल्या मतदानाचा हक्क बजावता येईल. पोलिसंग पार्टींना मतदान साहित्याचे वितरण करण्यात आले असून, ते मतदानस्थळी रवाना झाले आहेत.

सोलापूर लोकसभा म तदारसंघातील पंढरपूर विधानसभा मतदारसंघात एकूण तीन लाख ५७ हजार ८३८ मतदार मतदानाचा हक्क बजावणार असून त्यासाठी ३३७ मतदान केंद्र असणार आहेत. पंढरपूर मतदासंघातील या मतदान केंद्रासाठी ईव्हीएम



मशीन व मतदानासाठी लागणारे आवश्यक साहित्य, साधनसाम ग्रीचे वितरण मतदान चमूंना आज वितरित करण्यात आले असून, मतदान पथके मतदानस्थळी रवाना झाली आहेत. पंढरपूर विधानसभा मतदारसंघातील म तदान केंद्रांकरिता ईव्हीएम मशीन व साधनसामुग्रींचे शासकीय धान्य गोदाम पंढरपूर या ठिकाणाहून वितरण करण्यात आले. लोकसभा निवडणुकीसाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज असून, मतदारसंघात कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. पंढरपूर विधानसभा मतदारसंघातील १७३ मतदान केंद्रावर वेबकास्टिंग करण्यात येणार आहे. सर्व मतदान केंद्रावर वाढती उन्हाची तीव्रता लक्षात घेता मतदारांना सावली मंडप व्यवस्था, बैठक व्यवस्था, शुद्ध पिण्याचे पाणी, दिव्यांग म तदारांना व्हील चेअर, ओआरएस पाकिटे, मेडीकल किटसह वैद्यकीय पथक, हिरकणी कक्ष, स्वयंसेवकांची मदत, मतदार मदत कक्ष, प्रसाधनगृह, दिव्यांग व ज्येष्ठ मतदारांसाठी मतदान केंद्रावर व्हिल चेअरसह इतर आवश्यक सर्व सुविधा पुरविण्यात आल्या आहेत.

#### मतदानाचा हक्क बजवा

लोकसभा निवडणूक प्रक्रिया निर्भय, नि:ष्पक्ष आणि शांततापूर्ण वातावरणात पार पाडण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली आहे. सर्व नागरिकांनी लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी मतदान प्रक्रियेमध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन आपला मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन प्रांताधिकारी तथा सहाय्यक निवडणूक अधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.



# अक्कलकोटमध्ये ४१ क्षेत्रिय अधिकारी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ६ मे-**

अक्कलकोट विधानसभा म तदारसंघातील सोलापूर लोकसभा मतदारसंघासाठी नवीन तहसील कार्यालय येथून केंद्राध्यक्ष व म तदान अधिकारी मतदान केंद्राकडे रवाना झाले आहेत.

पाच सहाय्यक मतदान केंद्र आहेत. निवडणूक कामासाठी ४१ क्षेत्रीय अधिकारी आहेत. उन्हामुळे मतदान केंद्रावर प्रतीक्षा कक्ष, दिव्यांग मतदारासाठी रॅम्प सुविधा करण्यात आली. ८५ वयापेक्षा जास्त व दिव्यांग अशा एकूण २६२ मतदारांनी घरबसल्या मतदानाचा हक्क बजावला. सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी सोपान टोंपे, अतिरिक सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी विनायक मगर, अप्पर तहसीलदार श्रीकांत कांबळे, नायब तहसीलदार संजय भंडारे, निवासी तहसीलदार विकास पवार, निवडणूक तहसीलदार विजयकुमार गायकवाड, गटविकास अधिकारी शंकर कवितके, मुख्याधिकारी आतिश वाळुंज, गटशिक्षणाधिकारी प्रशांत अरबाळे, पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे, मंडल अधिकारी, परमेश्वर व्हसुरे, सिद्धेश्वर पारगोंडे, निवडणूक कर्मचाऱ्यांनी काम पाहिले.

# मतदान प्रक्रियेसाठी कर्मचारी, अधिकारी रवाना



**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि. ६ मे-**

४३ माढा लोकसभा मतदारसंघांतर्गत २५४ माळशिरस विधानसभा म तदारसंघातील तिसऱ्या टप्प्यातील मतदान मंगळवारी दि. ७ मे रोजी होत आहे. विधानसभा मतदारसंघातील ३३८ मतदान केंद्रांवर सोमवारी मतदान प्रक्रिया राबवणारे सर्व अधिकारी, कर्मचारी मतदान साहित्य घेऊन रवाना झाले. यासाठी प्रशासनाने ५२ बस व १३ खासगी वाहनांची सोय करण्यात आली आहे.

मतदान म्हणजे लोकशाहीला बळकट करणारा पाया आहे. यावर्षी लोकसभा मतदानाची जय्यत तयारी प्रशासनाने केली असून मतदान जनजागृतीसाठी तसेच मतदान प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेतले आहे. सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रांताधिकारी विजया पांगारकर यांच्या मार्गदर्शनाखाली माळशिरस विधानसभा मतदारसंघांमध्ये नातेपुते येथे केवळ दिव्यांग व्यवस्थापित मतदान केंद्र तयार केले आहे. त्या ठिकाणी दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी मतदान केंद्राची संरचना करण्यात आली आहे.

# सांगोल्यात २९९ मतदान पथके

## कर्मचारी केंद्रांवर दाखल

## अतिरिक्त सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी संतोष कणसे यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ६ मे-**

४३ माढा लोकसभा मतदारसंघांतर्गत २५३ सांगोला विधानसभा मतदारसंघात सोमवार, दि. ६ मे रोजी २९९ पथके मतदानाचे सर्व साहित्य घेऊन एसटी व मिनी बसने दु. १२ वाजेपर्यंत रवाना झाल्याची माहिती सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी अमित माळी व अतिरिक्त सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी संतोष कणसे यांनी दिली.

उष्माघातामुळे नागरिक व कर्मचाऱ्यांना कोणताही त्रास होऊ नये म्हणून मुबलक प्रमाणात ओआरएसचे द्रावण व पिण्याचे पाणी प्रत्येक बुथवर पिण्यास मिळणार आहे. किरकोळ आजारावर उपचार, वैद्यकीय पथकाचे



#### मतदारांची संख्या

**एकूण मतदार- ३,१२,४९८**
**पुरुष मतदार- १,६३,७१३**
**महिला मतदार- १,४८,७८३**
**इतर- २**

नियोजन तसेच बुथवरील अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी अंघोळीचे पाणी, जेवण व्यवस्था, नाष्टा व मतदान पथके व म तदारांसाठी स्वच्छतागृह पुरुष व स्त्रियांना, अपंगासाठी व्हीलचेअर रॅम्प, बुथवर स्तनदा मातांसाठी हिरकणी कक्षाची स्थापना केली असून, उन्हात बसण्यासाठी स्वतंत्र रुम, सावलीसाठी मंडप व्यवस्था केली आहे. प्रत्येक बुथवर आशा कार्यकर्ती प्रथमोपचार पेटी घेऊन उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे नागरिकांनी न घाबरता मतदानासाठी घराच्या बाहेर पडून जास्तीत जास्त संख्येने मतदान करुन आपला मतदानाचा हक्क बजावण्याबाबत प्रशासनाने सर्व मतदार बंधू व भगिनींना आवाहन केल्याचे मीडिया नोडल अधिकारी तथा सांगोला पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी मिलिंद सावंत यांनी सांगितले.

# खरडछाटणीच्या द्राक्षबागा फुटेना

## दुष्काळाची दाहकता; कमी पर्जन्यमान अन् पोषक वातावरण नसल्याने उत्पादकांमधून चिंता

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. ६ मे-**

वाढलेले तापमान, पडलेला उन्हाचा चटका, पाणी पातळीत झालेली घट याचा परिणाम शेती पिकांवर झालेला पहावयास मिळत आहे. उष्णतेच्या लाटेचा फार मोठा परिणाम भाजीपाल्यासह द्राक्ष बागांवर झालेला दिसत आहे. एप्रिल व म महिन्यात द्राक्ष बागांच्या खरड छाटणीची कामे चालू असतात. एप्रिल महिन्याच्या सुरूवातीला छाटणी करण्यात आलेल्या खरडछाटणीच्या बागा बऱ्यापैकी फुटलेल्या आहेत. परंतु चालू महिन्यात खरडछाटणी करण्यात आलेल्या बागा उष्णतेच्या तीव्रतेमुळे फुटेना झाल्या आहेत. त्यामुळे द्राक्ष बागायतदारासमोर हा नवीन प्रश्न आवासून उभे ठाकला आहे.

उशिरा छाटणी केलेल्या बागा कमी प्रम ाणात फुटल्या असून काडीचे प्रमाण कमी असून त्याचा द्राक्ष उत्पादनावर परिणाम



होणार आहे. सध्या सहा सात दिवसांपासून तर उन्हाचे चटके जास्त प्रमाणात वाढलेले असून बाग फुटण्यासाठी पोषक वातावरण तयार नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना चिंता सतावू लागली आहे. ज्या शेतकऱ्यांनी एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात बागांच्या छाटण्या केलेल्या आहेत. त्या चांगल्या फुटलेल्या आहेत तर २० एप्रिलच्या पुढे छाटणी केलेल्या बागा उष्णतेच्या लाटेमुळे कमी प्रमाणात फुटलेल्या पहावयास मिळत असून झाडावर काड्यांची संख्यादेखील कमी आहे. शेतकऱ्यांची कही खुशी कही गम अशी अवस्था झालेली आहे.

#### पाणी पातळीत कमालीची घट

वाढत्या उष्णतेच्या लाटेमुळे काही शेतकऱ्यांनी खरडछाटणी केलेले ओलांडे पाण्याने फवारणी करून भिजवत आहेत. उष्णतेच्या लाटेमुळे वरची पाणी पातळी घटत चालली आहे. बागांना भरपूर पाणी देणे गरजेचे आहे. पण गेल्या वर्षी पाऊस न पडल्याने पाणी पातळीत वाढ झालेली नाही. बागा फुटेना झाल्या असून उष्णतेचा ऐवढा परिणाम बागावर झाला आहे.

# माळशिरस तालुक्यात कार्यकर्त्यांची धरपकड

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ६ मे-**

स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाने माळशिरस तालुक्यातील गावांगावातील कार्यकर्त्यांना रात्री-अपरात्री घरोघरी जाऊन बळजबरीने धरपकड करत उचलून पोलीस ठाण्यामध्ये डांबून ठेवले.

ना कोर्टाची नोटीस, ना तहसीलदारांची आचारसंहिता भंगाची नोटीस, ना पोलीस प्रशासनाची नोटीस. कोणत्याही प्रकारची कायदेशीर नोटिसा नसताना माळशिरस तालुक्यातील ज्यांच्यावर कोणताही गुन्हा दाखल झालेला नाही, त्यांना रात्री उशिरा घरी जाऊन पोलीस प्रशासनाने अट्टल गुन्हेगार असल्याप्रमाणे घरातून उचलून घेऊन गेले. भाजपचे कार्यकर्ते म्हणून घेणारे अट्टल गुन्हेगार असलेले बाहेर मोकाट फिरत असल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

# कोर्टाची केस मागे न घेतल्याच्या कारणावरून सलगरमध्ये खून

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि.०६ मे**

तालुक्यातील सलगर येथे कोर्टात चालु असलेली केस मागे न घेतल्याची राग मनात धरुन भिमाशंकर श्रीकांत पोलासे, वय २७ वर्षे यास दगडाने डोक्यावर व लोखंडी पाईपाने पायावर मारून गंभीर जखमी करून जीवे ठार मारले आहे. या बाबत आरोपी उमेश मलप्पा पोलासे, सुरेश मलप्पा पोलासे, मलप्पा गणपती पोलासे तिघे रा.सलगर यांच्या विरुद्ध अक्कलकोट उत्तर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल झाला आहे.



या बाबत पोलीस कडून मिळालेली माहिती अशी, या पूर्वी फिर्यादिस आमच्या विरूध्द तुम्ही केलेली केस काढून घ्या आम्हाला त्रास होत आहे. तुम्ही केस काढून घेतली नाही तर तुझे मुलाला जीव मारतो'' अशी कोर्टात तारखेला गेल्यावर फिर्यादिस धमकी दिली होती. त्यानुसार सोमवार दि.६ मे रोजी सकाळी आठ साडेआठ चे दरम्यान श्रीमंत पाटील यांचे शेताजवळून जाणारे पाणंद रस्त्यावर, सलगर शिवार, ता. अक्कलकोट येथे आरोपी उमेश मलप्पा पोलासे, सुरेश मलप्पा पोलासे, मलप्पा गणपती पोलासे सर्व रा.सलगर, यांनी संगनमत करुन फिर्यादीचा मुलगा भिमाशंकर श्रीकांत पोलासे. यास दगडाने डोक्यावर व लोखंडी पाईपाने पायावर मारून गंभीर जखमी करून जीवे ठार मारले आहे. या




बाबत उत्तर पोलीस ठणेत गु.र.नं. व कलम-२९१/२०२४, भादविसं कलम ३०२, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे या बाबत श्रीकांत गणपती पोलासे, वय ५८ वर्षे, व्यवसाय-शेती, रा. सलगर फिर्यादी दिली आहे . पोनि टाकणे, सपोनि बागाव हे घटनास्थळी भेटी दिली आहे. पोसई स्नेहल चव्हाण गुन्हा दाखल करून घेतली असून सपोनि बागाव हे अधिक तपास करीत आहेत




सोलापूर : लोकसभा निवडणूकीमुळे विपुल मिरजगावकर (चित्रकार) कलेचा उपयोग करून लोकांना संदेश देण्यासाठी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर पेंटिंग केले आहे. पेंटिंग मध्ये असा संदेश दाखवण्याच प्रयत्न केला की, देशाचा विकास कोण करू शकतो त्यांना तुमचे मत द्या. यंदा १०० टक्के मतदान व्हावे म्हणून, तुमचा एक मत देश बदलू शकतो. त्यासाठी सर्वजण मतदान करावे.
(छायाचित्र : केवल तिवारी)

# वाहतुकीस अडथळा आणणाऱ्यांना पोलीस आयुक्तांनी चोपले

**सरस्वती चौकात सोमवारी सायंकाळी घडलेली घटना**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ६ मे**

सोमवारी सायंकाळी सरस्वती चौकामध्ये वाहतुकीस अडथळा निर्माण करून विनापरवाना फलक घेऊन फिरणाऱ्या काही तरुणांना पोलीस आयुक्त एम राजकुमार यांनी चांगलाच चोप दिला.

त्याचे झाले असे की, सोमवारी सायंकाळी सरस्वती चौकामध्ये काही लोक हे हातामध्ये मतदान करण्याबाबत डिजिटल बोर्ड घेऊन रस्त्यावर उभारून वाहतुकीस अडथळा निर्माण करीत मतदान करण्याचे आवाहन करीत होते. याबाबत माहिती मिळताच फौजदार चवळी पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक दिलीप शिंदे यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन त्या तरुणांना जमाबंदी आदेश लागू असून विनापरवाना फलक तयार करून अशा प्रकारे वाहतुकीस अडथळा निर्माण करून मतदान करण्याचे आवाहन करण्यात येत नसल्याचे सांगितले. त्यांनी त्या तरुणांकडील डिजिटल फलक जप्त करून घेतला.

दरम्यान, या रस्त्यावरून जात असलेले पोलीस आयुक्त एम राजकुमार हे सरस्वती चौकात आले. त्यांनी पोलीस अधिकाऱ्यांना काय झाले, याबाबत विचारपूस केल्यानंतर घटना समजली. त्यावेळी आयुक्तांनी काही तरुणांना वाहतुकीस अडथळा निर्माण करून अशा प्रकारची कृत्य केल्याबाबत चांगलाच चोप दिला. त्यामुळे या चौकात काही काळ गर्दी जमली होती. परंतु पोलिसांनी ती तात्काळ पागवली. यापूर्वीही पोलीस आयुक्त राजकुमार यांनी कायदा मोडणाऱ्यांना तिथल्या तिथे जागेवरच चोप दिल्याच्या घटना घडलेल्या आहेत. पोलीस आयुक्तांच्या या कृतीबद्दल नागरिकांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

# जगाच्या कल्याणासाठी आदी शंकराचार्यांचे जीवनकार्य महान : ज्ञानराज माणिकप्रभू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मे-**

मानवी जीवन कल्याणासाठी आदी शंकराचार्यांचे जीवन कार्य महान आहे, असे प्रतिपादन माणिकप्रभू पिठाचे श्री सदगुरू ज्ञानराज माणिकप्रभू महाराज यांनी केले. डॉ. राजीव दबडे आणि डॉ. माधुरी दबडे यांच्या कृष्णामाई हॉस्पिटलच्या वतीने आयोजित आदी शंकराचार्य यांच्या जयंती निमित्त हिने वाचनालयाच्या किर्लोस्कर सभागृहात आयोजित व्याख्यान कार्यक्रमात ते बोलत होते.

आदी शंकराचार्यांनी भारत देशासह जगाच्या कल्याणासाठी मोलाचे योगदान दिले आहे. त्यांचे कार्य आणि जीवनशैली अवघ्या काही तासात सांगता येत नाही एवढे महान कार्य त्यांचे आहे. माणिक प्रभू संस्थान माणिकनगर पिठाचा आणि सोलापूरचा



संबध गेल्या २०० वर्षापासूनचा आहे. माणिकप्रभु महाराज यांचे वास्तव्य सोलापूरमध्ये काही वर्षे राहिलेले आहे. असेही महाराजांनी सांगितले. श्रीराम भुजंगप्रयात स्तोत्राचे वाचन करणारा स्वतःच श्रीराम होवून जातो. वेदाचा सार म्हणजेच श्रीराम भुजंगप्रयात स्तोत्र आहे. असेही सदगुरू ज्ञानराज माणिकप्रभु महाराज यांनी सांगितले. आदि शंकराचार्यांच्या सखोल योगदानावर प्रकाश टाकून श्रीराम भुजंग प्रयात स्तोत्र आणि एक श्लोकी या रचनावर त्यांनी प्रकाश टाकला. श्रीराम भुजंग प्रयात स्तोत्रातील शेवटच्या ओळीवर ज्ञानराज माणिकप्रभुंनी विशेष भर दिला ज्यामध्ये आदि शंकराचार्य आपल्या शिष्यांना प्रभु रामचंद्रासारखे होण्याची आकांक्षा बाळगण्यास प्रोत्साहित करतात. आत्म साक्षात्काराचे अंतिम उद्दिष्टावर प्रकाश टाकतात.

उपस्थितांना आत्म शोध आणि अनुभुतीच्या प्रवासाला सुरूवात करण्यास उद्युक्त करणारे ठरले. प्रारंभी महाराजांवर पुष्पवृष्टी करण्यात आली. डॉ. माधुरी दबडे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. मेघा कमलापूरकर यांनी महाराज यांचा परिचय करून दिला. वरद श्रीराम आणि वेदांग नाईक या दोन चिमुकल्या मुलांनी श्रीराम भुजंगप्रयात स्तोत्र म्हणून दाखवले.

# सप्तशती श्री गुरुचरित्र ग्रंथाचे भक्तीमय वातावरणात प्रकाशन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ६**

परमहंस परिव्राजकाचार्य वासुदेवानंद सरस्वती टेंबे स्वामी रचित सप्तशती श्री गुरुचरित्र या ग्रंथाचे प्रकाशन सोलापुरातील अनेक सिद्ध संत सद्गपुरुषांच्या उपस्थितीत भक्तिमय वातावरणात पार पडले. रविवारी सायंकाळी झालेल्या या सोहळ्यामध्ये सोलापुरातील दत्त संप्रदायातील आणि ज्ञान माऊली या अध्यात्मिक परिवारातील सदस्यांनी आपली हजेरी लावली.

प्रमुख पाहुणे म्हणून वारकरी संप्रदायातील ज्येष्ठ कीर्तनकार प्रवचनकार ह.भ.प.लक्ष्मण महाराज चव्हाण ज्येष्ठ दत्तभक्त परमपूज्य रमेश काका जोशी, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या शंकरभक्त शुभांगीताई बुवा, ज्येष्ठ स्वामीभक्त डॉक्टर प्रदीप कार्यकर्ते आणि



संगीत विशारद सुरश्री कार्यकर्ते त्याचबरोबर ज्योतिष शास्त्री ज्योतिष गुरु डॉक्टर रेणुका गुर्रम यांची प्रमुख उपस्थिती होती.

ज्ञानमाऊली परिवाराचे प्रमुख दत्तगवई ज्ञानेश्वर माऊली वाघमारे यांनी प्रास्ताविक केले. वारकरी संप्रदायातील जेष्ठ कीर्तनकार प्रवचनकार परमपूज्य ह भ प. लक्ष्मण महाराज चव्हाण यांनी केलेल्या निरूपणाने साधकांची मने वेधून घेतली. संत सत्पुरुष जेव्हा एखाद्या स्त्रोताची किंवा ग्रंथाची निर्मिती करतात तेव्हा त्यामध्ये आपली दैवी शक्ती त्या शब्दाच्या रूपाने प्रसारित करीत असतात. त्या रचलेला ग्रंथातील प्रत्येक शब्द बीज मंत्राप्रमाणे काम करतो आणि पारायण करणाऱ्या साधकास अडीअडचणीतून मुक्त करतो पण पारायण करताना तेवढ्या तळमळीने आणि दृढ श्रद्धेने केले पाहिजे असे त्यांनी सांगितले.

हा कार्यक्रम दत्त चौकातील शुभराय मठातील शुभराय कलादालन येथे पार पडला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संगीता सातवेकर यांनी केले.

# गोयेगाव आदर्श मतदान केंद्रावर अनोखा उपक्रम

**मतदारांना पाय दाबून देण्यासाठी फूट मसाजर मशिनची सुविधा**

**सोलापूर, दि. ६ मे-**

जिल्ह्यातील सोलापूर व माढा लोकसभा मतदारसंघासाठी दिनांक ७ मे रोजी सकाळी सात ते सायंकाळी सहा या कालावधीत मतदान होणार आहे. या अंतर्गत प्रत्येक विधानसभा मतदारसंघात दोन आदर्श मतदान केंद्र निर्माण करण्यात आलेली आहेत. या मतदान केंद्रावर मतदारांसाठी विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. त्याच अनुषंगाने करमाळा तालुक्यातील गोयेगाव येथे निवडणूक विभागाच्या वतीने आदर्श मतदान केंद्र केलेले आहे. या मतदान केंद्रावर मतदान करण्यासाठी येणाऱ्या मतदारांना फूट मसाजरची सुविधा गोयेगाव ग्रामपंचायतने दिलेली आहे, अशी माहिती करमाळ्याचे गटविकास अधिकारी मनोज राऊत यांनी दिली आहे.

गोयेगाव ग्रामपंचायत ने आदर्श मतदान केंद्राच्या बाहेर हे फूट मसाजर मतदारासाठी ठेवलेले आहे. त्यामुळे येथे मतदान करण्यासाठी पायी चालून येणाऱ्या मतदारांना तसेच उष्णतेची तीव्रता लक्षात घेऊन डीहायड्रेशन झाल्यानंतर मतदारांना पायांचा त्रास झाल्यास तात्काळ पाय दाबून देण्यासाठी फूट मसाजर हे अद्यावत यंत्र येथे ठेवण्यात आलेले आहे मतदारांसाठी केलेला हा एक अनोखा उपक्रम असल्याने या भागातील जास्तीत जास्त मतदारांनी मतदान केल्यानंतर खूप मसाजर मशिन च्या माध्यमातून पाय दाबून घेण्याचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात येत आहे.

जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद, माढा लोकसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी मोनिका सिंह ठाकुर, मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे, एएमएफ चे नोडल अधिकारी संदीप कोहिनकर यांच्या मार्गदर्शनाखाली पंचायत समिती करमाळा व ग्राम पंचायत गोयेगाव यांनी मतदारांसाठी फूट मसाजर हा अनोखा उपक्रम केलेला आहे.

**अमृत रसोईमध्ये फ्रीज, सेल्फी पॉईंटही**

वस्तीवरून गावातून चालत येणाऱ्या मतदारांना डीहायड्रेशन चा होऊ नये यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांच्या सूचनेनुसार आरोग्य विभागामार्फत आणि मेडिकल किट ठेवण्यात आले आहे. तसेच या मतदान केंद्रावर स्तनदा मातांसाठी हिरकणी कक्ष तयार करण्यात आलेला आहे. मतदारांना उन्हापासून संरक्षण म्हणून मंडप टाकण्यात आला आहे. शाळेतील अमृत रसोई मध्ये फ्रीज उपलब्ध आहे तेथे थंड पाण्याची सोय करण्यात आलेली आहे. सेल्फी पॉईंट तयार करण्यात आलेले आहे. मतदारांना मतदानाच्या शिक्षणासाठी व्हरांड्यात टीव्ही लावण्यात आलेला आहे. या मतदान केंद्रावर १००% मतदान होण्यासाठी ग्रामपंचायत प्रयत्न करत आहे, अशी माहिती श्री. राऊत यांनी दिली.

# 'सन मराठी'च्या 'आदिशक्ती' नव्या मालिकेस सुरुवात

**सोलापूर, दि. ६ मे-**

''सज्जनांसाठी देवी आणि दुर्जनांसाठी काळ, सहज नाही लागणार ह्या आदिशक्तीचा ठाव'', असं म्हणत 'सन मराठी'ने नुकताच 'आदिशक्ती मालिकेचा नवा प्रोमो रिलीज केला आहे. कोण कोणाच्या विरोधात उभं राहिल, कोण कोणाचा शत्रु बनेल हे कधीच कोणी सांगू शकत नाही आणि वडीलांची शत्रु स्वतः त्यांची मुलगी असेल तर काय... भितीने थरकाप उडेल अशी घटना चिमुकल्या जीवाशी घडणार असेल तर आईचं काळीज घाबरणारच... पण आई लेकीच्या संरक्षणासाठी आदिशक्तीकडे प्रार्थना करणार आणि तिच्या पाठीशी उभी राहणार दैवी शक्ती, हे या प्रोमोमधून दाखवण्यात आले आहे. सुयश टिळक, पल्लवी पाटील, सावी केळकर, अंबरिश देशपांडे, सुश्रुत आदी कलाकारांचा अभिनय अनुभवण्याची संधी प्रेक्षकांना मिळतेय. एकंदरीत ही नवी मालिका देखील प्रेक्षकांच्या घराघरांत आणि मनात हक्काचं स्थान निर्माण करणार हे नक्की. 'आदिशक्ती' ६ मे पासून सोमवार ते शनिवार रात्री ८:३० वाजता फक्त सन मराठीवर नक्की पाहा.

# जिल्ह्यात १९५१ कलम ३६ अन्वये आदेश लागू

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ६ मे**

लोकसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४ ही विनाअडथळा व भयमुक्त वातावरणात आणि निःपक्षपातीपणे पार पाडण्यासाठी सोलापूर ग्रामीण जिल्हयात (पोलीस आयुक्त सोलापूर शहर यांची हदद वगळून) महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३६ च्या अधिकारान्वये पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, यांनी आदेश जारी केला आहे.

सोलापूर ग्रामीण जिल्हयातील सर्व पोलीस ठाणेस स्वाधिन असलेले पोलीस अंमलदार व त्यांचे वरिष्ठ अधिका-यांना महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३६ मधील पोटकलम क ते च प्रमाणे दि. १६ मार्च २०२४ रोजीचे ००.०० वा. पासुन ते दि. ०६ जून २०२४ रोजीचे २४.०० वा. पर्यंत रस्त्याावरील जाणा-या मिरवणुकीतील किंवा जमावातील लोकांनी कशा रितीने चालावे, त्याची वर्तणूक कशी ठेवावी याविषयी निर्देश देणे. मिरवणूकीचा मार्ग व वेळ विहित करणे. मिरवणूकीच्या व जमावाच्या प्रसंगी व उपासनेच्या सर्व जागांच्या आसपास उपासनेचे वेळी व कोणत्याही रस्त्याावरुन किंवा सार्वजनिक जागी किंवा सार्वजनिक निवा-याच्या ठिकाणी गर्दी होणार असेल किंवा अडथळा होण्याचा संभव असेल अशा सर्व ठिकाणी अडथळा होवू न देणे, सर्व रस्त्याावर, घाटात किंवा घाटावर, सार्वजनिक स्नानांच्या, कपडे धुण्याच्या व उतरण्याच्या जागांच्या ठिकाणी व जागामध्ये, जत्रा, मंदिरे व इतर सार्वजनिक ठिकाणी सुव्यस्था राखणे. सार्वजनिक ठिकाणी वादय वाजविणे गाणी गाणे, ढोल, ताशे व इतर वादय वाजविण्याचे आणि शंख व इतर कर्कश वाद्य वाजविण्याचे विनियमन करणे. सार्वजनिक जागेत किंवा जागेजवळ करमणुकीच्या ठिकाणी ध्वनिक्षेपकाच्या उपयोग करण्याचे विनियमन करणे व त्याावर नियंत्रण ठेवणे, सक्षम प्राधिका-याने हया अधिनियमाची कलमे ३३,३५,३७ ते ४०,४२,४३ व ४५ या अन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशास अधीन असलेले व त्याास पुष्टी देणारे योग्य आदेश देणे आदी अधिकार प्रधान केले आहेत.सदर आदेश प्रेत यात्रेस लागू नाही, सदचा आदेश संपूर्ण सोलापूर ग्रामीण जिल्ह्यासाठी (मा.पोलीस आयुक्तालय सोलापूर शहर हद्द वगळून ) दि. १६ मार्च २०२४ चे ००.०० वा. पासून ते दि. ६ जून २०२४ रोजीचे २४.०० वा. पर्यंत लागू राहिल .कोणीही सदर आदेशाचा भंग केल्यास तो महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम १३४ प्रमाणे कारवाईस प्राप्त राहील. असा आदेश पोलीस अधिक्षक शिरीष सरदेशपांडे यांनी दिला आहे.

# निवडणूक ड्राय डे कालावधीत १८ गुन्हे दाखल

**दोन लाख रुपयांचा दारु साठा जप्त**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापर, दि. ६ मे**

सोलापूर जिल्ह्यात लोकसभा निवडणुकीचे मतदान मंगळवारी होत असून रविवारी सायंकाळी सहा वाजेपासून जिल्ह्यात कोरडा दिवस घोषित करण्यात आलेला आहे. त्याा अनुषंगाने राज्य उत्पादन शुल्क विभागाने सोमवारी दुपारी अचानकपणे जिल्हाभरात टाकलेल्या धाडीत १८ गुन्ह्यात १९१८ लिटर दारू सह दोन लाखांचा मुद्देमाल हस्तगत केला. आचारसंहिता कालावधीत राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून ४२३ गुन्ह्यात एक कोटी ३९ लाख ५८ हजार किमतीचा एक लाख ९१ हजार ३४५ लिटर दारू साठा जप्त करण्यात आलेला आहे.

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या आदेशाने



लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने मतदान संपण्याच्या ४८ तास पूर्वीपासून जिल्ह्यात कोरडा दिवस घोषित करण्यात आला असून सर्व दारू दुकाने बंद ठेवण्यात आलेली आहेत. ड्रायडे कालावधीत अवैध दारूची निर्मिती, विक्री होऊ नये याकरिता राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून सोमवारी जिल्हाभरात टाकलेल्या धाडीत १८ गुन्हे नोंदविण्यात आले.या कारवाईत १९१८ लिटर दारूसह एक वाहन असा एकूण अडीच लाखाचा मुद्देमाल राज्य उत्पादन शुल्क विभागाने जप्त केला.

सोमवारी दुपारी अचानकपणे राज्य उत्पादन शुल्क विभागाने सोलापूर शहरातील विविध ठिकाणी छापे टाकून कारवाई केली. सूर्यकांत मल्लिकार्जुन मादगुंडी याच्या ताब्यातून ३० लिटर हातभट्टी दारू, आशाबाई किसन शिंदे या महिलेच्या ताब्यातून १३८० लिटर हातभट्टी दारू व लक्ष्मी कृष्णा कोत्ता या महिलेच्या ताब्यातून ७५ लिटर ताडी जप्त करण्यात आली. न्यू पाच्छापेठ येथील महादेव गुरुपादप्पा बुरकुले याच्या पत्र्याच्या शेडमध्ये छापा टाकला असता १६ प्लास्टिक कॅरेट मध्ये साठवून ठेवलेल्या फ्रुट बिअरच्या ६५० मिली क्षमतेच्या ३८४ बाटल्या जप्त करण्यात आल्या. हब्बू वस्ती देगाव नाका येथील गौतमी कोल्ड्रिंक्स हाऊस मध्ये छापा टाकून विश्वास विठ्ठल नागमोडे याच्या ताब्यातून विदेशी दारूच्या दहा बाटल्या व देशी दारूचे चाळीस बाटल्या जप्त केल्या. न्यू पाच्छा पेठ येथे अशोक भालचंद्रसा हबीब याच्या ताब्यातून २५ लिटर व हणमंतू नारायण बोद्दुल यांच्या ताब्यातून सुनील नगर परिसरातून १४६ लिटर हातभट्टी दारू जप्त केली. विडी घरकुल कुंभारी परिसरात दुचाकीवरून घेऊन जाणाऱ्या विदेशी दारूच्या ५५ बाटल्या वाहतूक करताना पाठलाग केला असता आरोपी वाहन जागेवर सोडून फरार झाला. या कारवाईत वाहनाच्या किमतीसह ६६,१५० रुपयेचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. विडी घरकुल कुंभारी परिसरात वीरास्वामी नागेश क्यामा याच्या ताब्यातून ३० लिटर व नरसव्वा लक्ष्मण बोडा याच्या ताब्यातून ८० लिटर ताडी जप्त केली.

तसेच विडी घरकुल कुंभारी परिसरात छापा टाकून ४०० लिटर ताडी जप्त केली. जुना विडी घरकुल परिसरात राकेश शिवाजी पवार यांच्या ताब्यातून ४०० लिटर व गांधीनगर येथील आकाश अप्पू जाधव याच्या ताब्यातून दीडशे लिटर हातभट्टी दारू जप्त केली. बापूजी नगर परिसरातील अंबादास शंकर चिल्लाळ याच्या राहत्या घरात छापा टाकला असता ड्रायडे कालावधीत विक्री करण्याच्या उद्देशाने साठवून ठेवलेल्या विदेशी दारूच्या विविध ब्रँडच्या १९२ बाटल्या व दोन लिटर क्षमतेच्या दोन बाटल्या असा एकूण ३३ हजार ९२० रुपये किमतीचा दारु साठा जप्त केला. मंगळवेढा तालुक्यातील हुलजंती गावामध्ये पद्माबाई बाळप्पा येड्डे हीच्या ताब्यातून देशी दारूच्या ३९, दिलीप मारुती लोहार याच्या ताब्यातून ४४ व सुनील बाळू भोसले त्याच्या ताब्यातून ५२ बाटल्या जप्त केल्या. आष्टी (ता. मोहोळ) या ठिकाणी स्वप्निल लक्ष्मण व्यवहारे यांच्या ताब्यातून साडेसात लिटर विदेशी दारू साठा जप्त केला.

ही कारवाई अधिक्षक नितीन धार्मिक यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी केली.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, तांबरी विभाग पोलीस स्टेशन शेजारी धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१ कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● निवासी संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत RNI No. MAHMAR/2023/86468.
**E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.MA. 7 **Publised at** TARUN BHARAT OFFICE NEAR POLICE STATION, TAMBRI VIBHAG OSMANABAD, Dist. OSMANABAD-413501, RNI No. MAHMAR/2023/86468
● **CHIEF EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **RESIDENT EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सध्या लोकसभेच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. एकीकडे रखरखते ऊन आहे. जसा प्रचाराचा पार चढला आहे. तसा उष्णतेचा पारा ४२ अंशावर गेला आहे. अशा रखरखत्या उन्हात ना एसी... ना कुलर... ना हवा... यापैकी काहीच नसलेल्या पाला मधल्या राहणाऱ्या लोकांच्या झोपडीचे जळकोट-मानमोडी रस्त्यालगत उन्हाची काहिली सहन करत राहत असलेल्या नागरिकांचे भर दुपारी दीडच्या सुमारास टिकलेले छायाचित्र.(छाया : मेघराज किलजे, जळकोट)



# उस्मानाबाद लोकसभा मतदानासाठी प्रशासन सज्ज; मतदान पथके मतदान केंद्राकडे रवाना

**२१३९ मतदान केंद्र... २० लक्ष मतदार बजावणार मतदानाचा हक्क... २१३९ मतदान केंद्राध्यक्ष तर २१७५ मतदान अधिकारी... मतदानासाठी २१३९ बॅलेट युनिट...**







**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ मे -**

सात मे रोजी ४०-उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघासाठी मतदान होणार आहे. या लोकसभा मतदारसंघातील सहा विधानसभा क्षेत्राच्या मुख्यालयातून मतदान केंद्रस्तरीय पथके आज ६ मे रोजी मतदानाचे साहित्य घेऊन मतदान केंद्राकडे रवाना झाली.

७ मे रोजी होणाऱ्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी औसा, उमरगा, तुळजापूर, उस्मानाबाद, परंडा आणि बार्शी विधानसभा क्षेत्रात एकूण २१३९ मतदान केंद्रावर २० लक्ष ४ हजार २८२ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहे. यामध्ये औसा- ३०७, उमरगा- ३१५, तुळजापूर- ४०६, उस्मानाबाद- ४१०, परंडा- ३७२ आणि बार्शी विधानसभा क्षेत्रातील ३२९ मतदान केंद्राचा यामध्ये समावेश आहे. २१३९ मतदान केंद्रासाठी २१३९ मतदान केंद्राध्यक्ष नियुक्त केले असून २५ टक्के केंद्राध्यक्ष म्हणजेच ५३६ राखीव आहेत. एकूण २६७५ मतदान केंद्राध्यक्ष असतील. या निवडणुकीसाठी ६४१७ मतदान अधिकारी नियुक्त केले आहे. १६०८ हे राखीव आहे. एकूण मतदान केंद्राध्यक्षाची संख्या ८०२५ आहे. मतदान केंद्राध्यक्ष आणि मतदान अधिकारी असे एकूण ७९२० जणांची नियुक्ती करण्यात आली असून १९८५ राखीव आहेत, असे एकूण ९९०५ मतदान केंद्राध्यक्ष आणि मतदान अधिकारी मतदान प्रक्रियेसाठी नियुक्त केले आहे.

उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघासाठी २१३९ मतदान केंद्र राहणार असून मतदान मतदानासाठी २१३९ बॅलेट युनिट, २१३९ कंट्रोल युनीट आणि २१३९ व्हीव्हीपॅट मशीन राहणार आहे. ६४० बॅलेट युनिट, ६४० कंट्रोल युनिट, ८५५ व्हीव्ही पॅट ह्या अतिरिक्त मशीन असतील. एकूण २७७९ बॅलेट युनिट, २७७९ कंट्रोल युनिट आणि २९९४ व्हीव्ही पॅट मशीन या निवडणुकीसाठी उपलब्ध आहेत.

एकूण २१३९ मतदान केंद्रापैकी २०१ केंद्र पडदानशीन, प्रत्येक विधानसभा मतदारसंघात महिला कर्मचारी संचालित प्रत्येकी एक मतदान केंद्र, दिव्यांग कर्मचारी संचालित प्रत्येकी एक मतदान केंद्र, युवा कर्मचाऱ्यांचे औसा विधानसभा क्षेत्रात ५ केंद्र तर उर्वरित मतदारसंघात प्रत्येकी एक मतदान केंद्र, मॉडेल मतदान केंद्र औसा-१, उमरगा-६, तुळजापूर-९, उस्मानाबाद -१३, परंडा-२३ आणि बार्शी विधानसभा मतदारसंघात दोन मतदान केंद्र आहे.

संवेदनशील मतदान केंद्र औसा-एक, उमरगा-एक, तुळजापूर-दोन, उस्मानाबाद-२, परंडा-१ आणि बार्शी विधानसभा क्षेत्रात आठ आहेत.

## ▶▶संक्षिप्त वृत्त...



### छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृतिदिनानिमित्त धाराशिवात अभिवादन

**धाराशिव, दि.६ मे -**

आरक्षणाचे जनक लोक कल्याणकारी न्यायप्रिय शासनकर्ते राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृतिदिनानिमित्त आज ६ मे रोजी वतीने छत्रपती शाहू महाराज चौक येथे अभिवादन करण्यात आले. यावेळी राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मारक समितीचे अध्यक्ष बलराज रणदिवे, मध्यवर्ती सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष अमरसिंह देशमुख, शिवराज्याभिषेक सोहळा समितीचे अध्यक्ष गौरव बागल, संभाजी ब्रिगेडचे आकाश मुंडे, बालाजी पाटील, कुणाल निंबाळकर, अभिजीत सूर्यवंशी, शुभम मुंडे, दादा पांढरे, अमर घोडके, अजय पाटील, नाना लष्करे इत्यादी यावेळी उपस्थित होते. सर्वांच्या उपस्थितीमध्ये विनम्र अभिवादन करण्यात आले.



### कळंबमध्ये महायुतीच्या अर्चनाताई पाटील यांच्या प्रचारार्थ पदयात्रा

**कळंब, दि.६ मे -**

महायुतीच्या उमेदवार अर्चना राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रचारार्थ आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी शनिवारी सायंकाळी पदयात्रा काढली. या पदयात्रेत भाजपा, राष्ट्रवादी, शिवसेना शिंदे गट, रिपाइं, लहुजी शक्तीसेना व इतर घटक पक्ष, संघटनांच्या पदाधिकार्यांना सोबत घेवून शहरात पदयात्रा काढली. या पदयात्रेत त्यांनी सामान्य नागरिकांसह विविध व्यावसायिकांशी संवाद साधला. महायुतीतील सर्वच पक्ष, संघटनांच्या पदाधिकार्यांसमवेत आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी काढलेल्या पदयात्रेला जनतेकडून मिळालेला. चहाची टपरी, किराणा दुकान, मेडिकल, कपड्याचे व्यापारी, फळ विक्रेते, भाजीपाला विक्रेते, दूध विक्रेते आदी व्यावसायिकांशी आमदार पाटील यांनी संवाद साधला. यावेळी त्यांच्या पदयात्रेस मोठा प्रतिसाद मिळाला. यावेळी महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### आर.पी. कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न

**खामसवाडी, दि.६ मे -**

आर.पी. कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांचा निरोप समारंभाचा कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. सदरील कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे अध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील हे उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे डॉ. आदिनाथ राजगुरू (संचालक, आयव्हीएफ कन्सल्टंट अक्षय हॉस्पिटल, धाराशिव), डॉ. फारूक तांबोळी (अयाजुल डेंटल क्लिनिक, बार्शी) डॉ.सुरज नन्नवरे (प्राचार्य, एसबीएनएम कॉलेज ऑफ फार्मसी,धाराशिव) यांची उपस्थिती होती. तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. शेख गाझी (प्राचार्य,आर.पी.कॉलेज ऑफ फार्मसी, धाराशिव) यांनी केले.

# आयएमए महिला डॉक्टर शाखेचा पदग्रहण सोहळा संपन्न

**अध्यक्षपदी कौशाली राजगूरू, उपाध्यक्षपदी डॉ. स्मिता गवळी तर सचिवपदी श्रध्दा मूळे...**



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ मे -**

इंडियन मेडिकल असोसिएशन महिला डॉक्टर धाराशिव शाखेच्या नूतन कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा नुकताच पार पडला. यात अध्यक्षपदाची सूत्रे डॉ. कौशाली राजगुरू तर सचिवपदाची सुत्रे डॉ. श्रध्दा मुळे यांनी स्वीकारली.

इंडियन मेडिकल असोसिएशनची महिला डॉक्टर शाखा ही राज्य पातळीवर काम करणारी संघटना असून, या माध्यमातून डॉक्टरांसोबतच समाजासाठीही आरोग्य विषयक विविध उपक्रम राबविले जातात. विशेषत: कोविड काळात आरोग्य विषयक सेवेसोबतच नागरिकांमध्ये जनजागृती करण्यातही संघटनेचा मोठा वाटा होता. येथील कार्यकारिणीची मुदत संपल्यामुळे पुढील दोन वर्षांसाठी नवीन कार्यकारिणी निवडण्यात आली. जिल्हा शासकीय रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. शिल्पा डोमकुंडवार यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पदग्राहण सोहळा पार पडला.

जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. इस्माईल मुल्ला, आयएमए संघटनेचे अध्यक्ष डॉ. सचिन देशमुख, जिल्हा आरोग्याधिकारी डॉ. सतीश हरिदास, आयुर्वेदिक महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. नागनाथ गंगासागरे आदींची शुभेच्छापर भाषणे झाली.

यावेळी डॉ. डोमकुंडवार यांनी 'वैद्यकीय व्यवसाय आणि वैद्यकीय शिक्षणातील बदलते ट्रेंड' या विषयावर मार्गदर्शन केले. डॉक्टरांनी वैद्यकीय क्षेत्रात होणाऱ्या नवनवीन बदलांची माहिती करून घेऊन स्वत:ला अपग्रेड ठेवावे, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमास डॉ. कुलदीप मिटकरी, डॉ. अभय शहापूरकर, डॉ. स्मीता शहापूरकर, डॉ. आदिनाथ राजगुरू, डॉ. गणेश पोलावार, डॉ. कठारे, डॉ. घोगरे, डॉ. सुधीर मुळे, डॉ. सुशील चव्हाण, डॉ. पल्लवी कोथळकर यांच्यासह शहरातील अनेक डॉक्टर्स, तसेच रोटरी क्लबच्या अध्यक्ष डॉ. अनार साळुंके, रेखा ढगे, नीता कठारे, किरण देशमाने, सुरेखा जगदाळे आदी उपसत्रथित होते. प्रास्ताविक डॉ. कौशाली राजगुरू यांनी केले. आभार डॉ. श्रध्दा मुळे यांनी मानले.

**कार्यकारिणीत या डॉक्टरांचा समावेश...**

आयएमए महिला कार्यकारिणीत उपाध्यक्ष डॉ. रजनी पाटील, डॉ. स्मीता गवळी, सहसचिव डॉ. नीता चौगुले-पौळ, खजिनदार डॉ. अश्विनी सरडे, राज्य प्रतिनिधी डॉ. मीना जिंतूरकर, डॉ. ज्योती कानडे, कार्यकारिणी सदस्य डॉ. वसुधा दापके-देशमुख, डॉ. रेखा टिके, डॉ. मंजुश्री राठोड-चव्हाण, डॉ. अश्विनी देशमुख.

# २ ते ५ मे दरम्यान ३९९८ दिव्यांग आणि ८५ वर्षावरील वयस्क नागरिकांनी घरीच बजावला मतदानाचा हक्क

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ मे -**



उस्मानाबाद लोकसभा मतदार संघाच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार दिव्यांग आणि ८५ वर्षावरील वयस्क मतदारांचे त्यांच्या घरी जाऊन पोस्टल मतपत्रिकेच्या माध्यमातून मतदान घेण्यात आले.

भारत निवडणूक आयोगाने प्रथमच दिव्यांग आणि ८५ वर्षावरील वयस्क नागरिकांचे मतदान त्यांच्या घरी जाऊन पोस्टल मतपत्रिकेच्या माध्यमातून करून घेतले. त्यामुळे या दिव्यांग व वयस्क मतदारांना दिलासा मिळाला. ज्या दिव्यांग आणि ८५ वर्षावरील वयस्क व्यक्तींना घरीच पोस्टल मतपत्रिकेच्या माध्यमातून मतदान करावयाचे होते, अशा ४४३२ व्यक्तींनी नमुना १२ ड निवडणूक विभागाकडे भरून दिला होता.



२ मे ते ५ मे २०२४ दरम्यान घरी जाऊन पोस्टल मतपत्रिकेच्या माध्यमातून मतदान घेण्याची मोहीम राबविली. यादरम्यान ४४३२ व्यक्तींपैकी ३९९८ व्यक्तींनी घरीच पोस्टल मतपत्रिकेच्या माध्यमातून मतदान केले.

यामध्ये ८५ वर्षावरील वयस्क असलेल्या ३१९२ व्यक्तींनी आणि ७८७ दिव्यांग व्यक्तीने मतदान केले. तसेच अत्यावश्यक सेवेतील १९ व्यक्तीनी देखील याच मोहिम दरम्यान मतदान केले.

पोस्टल मतपत्रिकेच्या माध्यमातून घरीच मतदान करून घेण्यात तिसऱ्या टप्प्यात उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघ राज्यात अव्वल ठरला आहे.

# भर उन्हात महायुतीच्या प्रचार सभेची सांगता

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.६ मे -**

नळदुर्ग शहरातील भर उन्हात महायुतीच्या प्रचार सभेची सांगता करण्यात आली. सर्व जाती-धर्मातील लोकांसाठी विकासाचे काम करणार्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पुन्हा तिसर्यांदा प्रधानमंत्री करण्यासाठी नागरिकांनी महायुतीच्या उमेदवार अर्चना पाटील यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करावे, असे आवाहन आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी नळदुर्ग येथे प्रचारसभेत बोलत होते.

नळदुर्ग येथे प्रचाराच्या शेवटच्या दिवशी रविवार, ५ मे रोजी उन्हात धाराशिव लोकसभा मतदारसंघातील महायुतीच्या उमेदवार अर्चना पाटील यांच्या प्रचारार्थ जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते.

जाहीर सभेपूर्वी शहरातील बाळकृष्ण मंदिर ते भवानी चौकापर्यंत रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये माजी नगराध्यक्ष उदय जगदाळे, नय्यर जहागीरदार, दत्तात्रय दासकर, माजी नगरसेवक संजय बताले, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अल्पसंख्यांक सेलचे प्रदेश उपाध्यक्ष शफीभाई शेख, शहराध्यक्ष अजीज जुनैदी, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख ज्ञानेश्वर घोडके, माजी नगरसेविका छमाबाई राठोड, सुशांत भूमकर, संजय विठ्ठल जाधव, पद्माकर घोडके, श्रमिक पोतदार, धीमाजी घुगे, सुनिल बनसोडे, सागर हजारे, अनिता रणे, मनसेचे प्रमोद कुलकर्णी, रिपाइंचे बाबासाहेब बनसोडे यांच्यासह शेकडो नागरीक सहभागी झाले होते. यामध्ये महिलांची संख्या मोठी होती. रॅली बाळकृष्ण मंदिर येथून निघाल्यानंतर शहरातील प्रमुख रस्त्यांसह मिरवणूक मार्गे निघून भवानी चौकात आल्यानंतर रॅलीचे विसर्जन करून याठिकाणी जाहीर सभा घेण्यात आली.

या सभेला आमदार राणाजगजितसिंह पाटील, माजी मंत्री बसवराज पाटील व युवा नेते सुनिल चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती.

# मोदींच्या नेतृत्वामुळे अर्थव्यवस्थेत आपला देश पाचव्या नंबरवर : कृषी मंत्री धनंजय मुंडे



**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.६ मे -**

गेली दहा वर्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्व देश प्रगती करीत असून जगातील पाच नंबरची अर्थव्यवस्था असलेला देश म्हणून पुढे येत आहे. याचा आपणास अभिमान वाटायला हवा यासाठी नरेंद्र मोदी यांना खंबीर साथ देण्यासाठी व जिल्ह्याच्या विकासासाठी महायुतीच्या उमेदवार अर्चनाताई पाटील यांना विजयी करावे, असे आवाहन राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी धाराशिव मतदार संघातील महायुतीच्या उमेदवार अर्चनाताई राणाजगजीतसिंह पाटील यांच्या प्रचारार्थ होळकर चौक कळंब येथील प्रचार सभेत ४ मे रोजी बोलत असताना केले.

मुंडे यांनी आपल्या भाषणात गेल्या पाच वर्षात आपल्या मतदारसंघातील खासदाराने कोणती विकासाची कामे केली? कोणते उद्योग जिल्ह्यात आणले.

पंधरा हजार सुशिक्षित बेरोजगार तरुणाना रोजगार दिले का? असा प्रश्न विचारला मोदी सरकारने आयुष्यमान भारत योजना, गॅस कनेक्शन, लखपती दीदी योजना तसेच कोव्हीड काळात व्हॅक्सीन उपलब्ध करून एकदा नव्हे दोनदा लस देऊन जीवनदान दिले आहे. केंद्र सरकार शेतकऱ्यासाठी किसान सन्मान योजनेतून वर्षाला सहा हजार देत आहे. आता यात राज्य सरकार देखील सहा हजार रुपये प्रति वर्ष देणार असून यामुळे शेतकऱ्यांच्या खात्यावर बारा हजार रुपये मिळणार आहेत. तर सोयाबीनसाठी आचारसंहिता संपल्यानंतर प्रति हेक्टरी पाच हजार रुपये, दोन हेक्टर पर्यंत साडेचार हजार कोटीचे पॅकेज देण्याविषयी सरकारने निर्णय झाला असून कापूस या पिकाविषयी निर्णय घेतला जाणार असल्याचे सांगितले ३० एप्रिल ला धाराशिव येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची प्रचंड जाहीर सभा झाली. या सभेने अर्चनाताई पाटील यांच्या विजयावर शिक्कामोर्तब झाले आहे. देशाच्या विकासासाठी मोदींना साथ देण्यासाठी अर्चनाताई पाटील यांना आपण निवडून द्यावे असे आवाहन केले.

याप्रसंगी आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांनी आपल्या भाषणात गेली १९ वर्ष माझे व दहा वर्ष उमेदवार अर्चना पाटील यांचे काम पाहत आहात. शेतकऱ्यांसाठी न्यायालयीन संघर्ष करू पिक विमा मिळवून दिला. कृष्णा भीमा स्थिरीकरण योजनेतून मराठवाड्याच्या वाट्यातील २३.६६% पाण्यापैकी हक्काचे ७% पाणी पुढील वर्षापासून आपल्याला जिल्ह्याला मिळणार असल्याचे सांगितले. तसेच कोल्हापूर, सांगली येथील अतिरिक्त पाणी बंद बोगद्यातून जिल्ह्याला उपलब्ध होणार आहे. तसेच एमआयडीसीच्या माध्यमातून रोजगार व आई तुळजाभवानी मंदिराचा कायापालट करणार असून वैश्विक दर्जाचे पर्यटन स्थळ बनणार आहे. राज्य सरकारच्या मान्यते बरोबर केंद्र सरकारची मदत घ्यावी लागणार आहे. यामुळे जिल्ह्याच्या कायापालट होणार आहे असे सांगितले.

मंचावर राष्ट्रवादी काँग्रेसचे सुरेश पाटील, शिवसेनेचे अनिल खोचरे, सागर मुंडे, बिपिन हौसलमल, आशा भवर, सरला खोसे, ॲड. शकुंतला फाटक, दत्ता तनपुरे, बंडू बनसोडे महायुतीच्या कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती होती.

# प्रथमस्तरीय संगणकीकृत पुरवणी सरमिसळ प्रक्रिया संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ एप्रिल**

प्रथमस्तरीय संगणकीकृत पुरवणी सरमिसळ प्रक्रिया आज जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आली.यावेळी अपर जिल्हाधिकारी डॉ. त्रिगुण कुलकर्णी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्रकुमार कांबळे उपस्थित होते. यासह विविध राजकीय पक्षातील प्रतिनिधी यांच्यासमोर ही प्रक्रिया पार पाडण्यात आली.

बीड लोकसभा मतदारसंघात ४१ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. त्यामुळे दोन बॅलेट युनिट अधिक लागणार आहेत. हे अधिकचे बॅलेट युनिट अकोला वरून २००० तर नांदेडहून ८०० आलेले आहेत. या बॅलेट युनिट मशीनची प्रथमस्तरीय तपासणी (FLC) आयोगाच्या अभियंतामार्फत २ मे पासून सुरू आहे. १० एप्रिल रोजी प्रथम सरमिसळ प्रक्रिया पूर्ण करण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे विधानसभा निहाय मतदान मशीन पोहोचविण्यात आलेले आहेत. त्यातील उरलेले कंट्रोल युनिट, बॅलेट युनिट, आणि व्हीव्हीपॅट तसेच आता नांदेड व अकोला वरून आलेले बॅलेट युनिटचे आज सरमिसळ करण्यात आले. ५८५७ बॅलेट युनिट, ४९३ कंट्रोल युनिट, आणि ५१० व्हीव्हीपॅट येवढा मतदान यंत्राची आज सरमिसळ करण्यात आली. उद्या सकाळी साडेसहा वाजता वखार महामंडळातील गोदामात सरमिसळ झालेल्या मतदान यंत्र विधानसभा निहाय ठेवण्यात येतील. यानंतर दुसरी सरमिसळ प्रक्रिया राजकीय प्रतिनिधीच्या समोर ६ तारखेला सकाळी १० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे निवडणूक निरीक्षक अजीमुल हक यांच्या उपस्थित करण्यात येईल. या प्रक्रियेनंतर विधानसभेतील मतदान केंद्रात मतदान यंत्र नेण्यासाठी उपलब्ध असतील. १३ मे रोजी मतदान झाल्यानंतर विधानसभा निहाय मतदान केंद्रातील मतदान मशीन शासकीय तंत्रनिकेतन येथे विधानसभा निहाय ठेवण्यात येतील. यावेळी किती मशीन नादुरुस्त आहेत आणि त्या ऐवजी मतदान प्रक्रियेत वापरलेल्या मशीनीची माहिती राजकीय प्रतिनिधींना देण्यात येईल.

# घरफोडीचा गुन्हा स्थानिक गुन्हे शाखेने आणला उघडकीस

## तीन आरोपीस केले जेरबंद

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.६ एप्रिल**

अंबाजोगाई शहर हद्दीतील शेपवाडी येथे प्रकाश विष्णुपंत शेप, व्यवसाय-व्यापार, रा.शेपवाडी ता.अंबाजोगाई यांचे राहते घरी अज्ञात दोन अनोळखी इसमांनी दिनांक २०/०४/२०२४ रोजी रात्री १९.३० ते २२.४५ वा. दरम्यान घराचे कुलूप तोडून आत प्रवेश करुन घरातील चार बेडरुम मधील नगदी ३३,२०,०००/- व सोन्याचे दागिने ३३.१ तोळे किं.१४,८९,५००/- रु असा सोने व नगदी एकुण ४८,०९,५००/- रु चा मुद्देमाल चोरुन नेला होता. त्यावरुन पो.ठा.अंबाजोगाई शहर गुरनं १७३/२०२४ कलम ४५७,३८० भादंवि प्रमाणे दिनांक २१/०४/२०२४ रोजी गुन्हयाची नोंद झाली होती.

पोलीस अधीक्षक बीड साहेब यांनी सदर गुन्हा उघडकीस आणण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखा,बीड यांना आदेशीत केले होते. तेव्हा श्री. संतोष साबळे यांनी सदर गुन्हयाचे अनुषंगाने अभिलेखावरील गुन्हेगारांच्या पध्दतीनुरुप माहिती व विश्लेषण केले व याकामासाठी पोउपनि सुशांत सुतळे व त्यांचे पथकास पाचारण केले.दिनांक ०५/०५/२०२४ रोजी पथक समांतर गुन्हयातील आरोपीचा शोध घेत असतांन गोपनिय सुत्रधाद्वारे माहती मिळाली की, सदरची चोरी ही मोहन मुंडे व त्याचा साथीदार सोहेल शेख दोन्ही रा.अंबाजोगाई यांनी केली आहे. अभिलेखाची पडताळणी करता मोहन दौलतराव मुंडे हा सराईत घरफोडी करण्याचे सवाईचा असल्याने यानेच गुन्हा केल्याची खात्री पटली . दोन्ही आरोपींचा कसोशिने शोध घेवून अंबाजोगाई शहरातील क्रांतीनगर येथे दोन्ही आरोपी मिळुन आले. आरोपी



मोहन दौलतराव मुंडे वय ३० वर्षे रा.क्रांतीनगर अंबाजोगाई व सोहेल जलील शेख वय २० रा.दमगाणपुरा करबलावेस अंबाजोगाई यांना गुन्हयाबाबत बारकाईने विचारपुस केली असता दोघांनी गुन्हा केल्याचे कबुल केले. गुन्हयातील चोरी गेलेल्या मालाबाबत मुख्य आरोपी मोहन मुंडे यास विचारपुस केली असता त्याने रोख रक्कम ५,००,०००/- रु त्याचे क्रांतीनगर येथे ठेवले असल्याचे सांगितले वरुन सदर ठिकाणावरुन नमुद रोख रक्कम जप्त करण्यात आली असून इतर मुद्देमाल हा त्याचा मेव्हणा बालासाहेब नामदेव घुगे रा.होळ ता.केज जि.बीड याचा शोध घेवुन त्याचे ताब्यातुन १२७.७ ग्राम वजनाचे एकुण ५,७१,००५/- रु चे सोन्याचे दागिने व रोख रक्कम ३,००,०००/- असा ८,७१,००५/- जप्त करण्यात आला. बालासाहेब नामदेव घुगे यास चोरीचा माल घेतल्याने ताब्यात घेण्यात आले.एकंदरीत मुख्य आरोपी मोहन दौलतराव मुंडे व त्याचे इतर दोन साथीदार यांना ताब्यात घेवुन गुन्हयातील गेलापैकी एकुण १३,७१,००५/- रोख व सोन्याचे दागिने असा मुद्येमाल जप्त करण्यात आलेला असुन आरोपींना पो.ठा.अंबाजोगाई शहर यांचे ताब्यात देण्यात आलेले आहे. सदर आरोपींकडुन इतरही काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे. पुढील तपास पो.ठा.अंबाजोगाई शहर व स्था.गु.शा.बीड करीत आहेत.

स्था.गु.शा.पथकास गुन्हयाचे तपासात आरोपी मोहन दौलतराव मुंडे व सोहेल जलील शेख रा.अंबाजोगाई यांनी पुणे शहर व तेलंगना राज्यात सांगारेड्डी जिल्हयात खालील नमुद घरफोडीचे दाखल गुन्हयात निष्पन्न झालेले आहेत.

अ.क्र. पो.स्टे. जिल्हा राज्य गुरनं व कलम

१. पो.स्टे. आमीनपुर जि. सांगारेडडी राज्य-तेलंगना १५१/२०२४ क.४५४,३८० भादंवि

२. पो.स्टे.अंलकार जि.पुणे शहर राज्य-महाराष्ट्र ५१/२०२४ क.४५४,३८० भादंवि

आरोपी मोहन दौलतराव मुंडे रा.क्रांतीनगर अंबाजोगाई हा बीड जिल्हयातील हिस्ट्रीशिटर असुन तो घरफोडी व चोरी करण्याचे सवईचा सक्रिय आरोपी आहे. त्यांचेवर बीड सह सोलापुर, रायगड, पुणे, लातुर, तेलगंना राज्य, परभणी येथे घरफोडी, दरोडयाची तयारी, बलात्कार अशा प्रकारचे गुन्हे दाखल असल्याचा अभिलेख आहे. तसेच सोहेल जलील शेख हा देखील मालाविरुध्दचे गुन्हे करण्याचा सवईचा आहे.सदरची कामगिरी मा.श्री. नंदकुमार ठाकुर, पोलीस अधीक्षक बीड, मा.श्री.सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक, बीड यांचे मार्गदर्शनाखाली स्था.गु.शा येथील पोनि श्री. पो.नि. संतोष साबळे, पोउपनि सुशांत सुतळे, पोउपनि श्रीराम खटावकर, पोह/मारुती कांबळे, बाळकृष्ण जायभाये, राजु पठाण, मनोज वाघ, प्रसाद कदम, सोमनाथ गायकवाड, विकास वाघमारे, अर्जुन यादव, सचिन आंधळे, सुशिला हजारे, स्वाती मुंडे,विकी सुरवसे, चालक/अतुल हराळे व सुनिल राठोड यांनी केली आहे.

# खासदार झाल्यास तुम्ही ज्यांचे पैसे बुडविले त्यासाठी तुमच्या दारात बसणार

## ३०७ चे आरोपी भाजपच्या स्टेजवर अन मराठा आंदोलकांवर गुन्हे व तडीपारीची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.६ एप्रिल**



पालकमंत्री आणि भाजप उमेदवार यांनी कारखान्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे पैसे बुडविले त्यावर बजरंग बप्पा सोनवणे यांनी शेलक्या शब्दात सडकून टिका केली. तसेच भा दं वि ३०७ सारख्या गंभीर गुन्ह्यातील आरोपी भाजपच्या स्टेजवर आहेत. मात्र मराठा तरुणांना मराठा आरक्षणासाठी आंदोलन केले. त्यांच्यावर जिल्हा प्रशासन तडीपारीची कारवाई करीत आहे. जिल्हा प्रशासन आणि पोलीस प्रशासन काय भाजपचे सालगडी आहेत का? असाही सवाल त्यांनी प्रशासन आणि गृह खात्याला करीत प्रशासनाच्या साप्तनिक वागणुकीचा समाचार घेत सरकारच्या अब्रूची लक्तरे वेशिला टांगली.

अंबाजोगाई तालुक्यातील मगरवाडी, धायगुडा पिंपळा, गिरवली, घाटनांदुर, जोडवाडी, उजनी, नागझरी, निरपणा सोमनवाडी, बाभळगाव, वाकडी, पट्टीवडगाव, तळेगाव घाट, लिंबागाव, या ठिकाणी मतदारांच्या गाठीभेटी घेतल्या. यावेळी गावकऱ्यांनी बजरंग बप्पा सोनवणे आणि त्यांच्या सोबत असलेले बबन भाऊ गीते, राजेसाहेब देशमुख, रत्नाकर आप्पा शिंदे, अमर देशमुख, सुदामती गुट्टे, गोरे, ड. माधव जाधव आणि कालिदास आपेट हे परळी विधानसभा मतदार संघात प्रचार करीत आहेत. महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे आणि त्यांच्या सोबतच्या मान्यवर नेत्यांचे गावकऱ्यांनी ढोल, ताशा, तुताऱ्या वाजवीत गावातून मिरवणूक काढली . तर अनेक गावात रस्त्यात थांबून महिलांनी त्यांचे औक्षण करून स्वागत केले.

# वंचित बहुजन आघाडीच्या आयडियल प्रचारने महायुती, महाविकास आघाडीच्या उमेदवारांनी घेतली धास्ती

## अशोक हिंगे यांना गावागावातून मिळतोय मोठा प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ एप्रिल**



बीड लोकसभे च्या प्रचाराचा दुसरा टप्पा संपत आला असून बीड जिल्ह्यात महायुती, महाविकास आघाडी आणि वंचित बहुजन आघाडी अशी तिरंगी लढत दिसून येत आहे मात्र उमेदवार अशोकराव हिंगे पाटील यांच्या आयडियल प्रचाराने विजयाकडे वाटचाल चालू केली आहे गावोगावी,तांडा वस्तीवर वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोकराव हिंगे पाटील यांचे जोरदार स्वागत करून वंचित बहुजन आघाडीलाच निवडून देणार असल्या ची हमी मतदार देत आहेत यामुळे महायुती, महाविकास आघाडी च्या उमेदवारानी धास्ती घेतली आहे तर त्यांचा प्रचार फीका पडला आहे

सध्या बीड लोकसभेच्या प्रचाराची रणधुमाळी जोरात चालू असून सर्वच पक्षांची प्रचारासाठी धावाधाव चालू आहे महायुती महाविकास आघाडी च्या दोन्ही उमेदवारांनी निवडणुकीला जातीचा रंग दिला आहे मात्र पुरोगामी महाराष्ट्रात जातिवादाला थारा मिळणार नाही इथे विकासावर निवडणुका होतात ही बाब लक्षात घेऊन वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांनी आयडियल प्रचार चालू केला आहे प्रत्येक गावात जाऊन तेथील मूलभूत सुविधा सोडवण्याची हमी देत आहेत, तरुणांच्या हाताला काम, शेतकऱ्याच्या मालाला मुबलक दाम मिळवून देण्यासाठी मला संसदेत पाठवा असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील करत आहेत त्यांच्या या आव्हानाला बीड जिल्ह्यातील सुज्ञ मतदाराकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे यामुळे महायुती महाविकास आघाडी च्या उमेदवारच्या पायाखालील वाळू सरकू लागली आहे महायुती, महाविकास आघाडीचा प्रचार अडगळीला पडत असल्याने वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांचा विजय निश्चित आहे

# यावेळेस बीडमध्ये खासदार आणि दिल्लीत सरकार दोन्ही सेक्युलर विचारांचे असेल-आ.संदीप क्षीरसागर



## बीड शहरात लोकसभा प्रचारार्थ कॉर्नर सभा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ एप्रिल**

यावेळेस बीड लोकसभा मतदारसंघाचा खासदार आणि दिल्लीचे केंद्र सरकार या दोन्ही ठिकाणी सेक्युलर विचारांचे असतील. जे सर्व जाती धर्मांना, समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन चालतील. त्यासाठी आपल्याला महाविकास आघाडीच्या उमेदवाराला म्हणजेच बजरंग सोनवणे यांना मतदानरूपी आशिर्वाद द्यावा लागेल आणि आपण तो निश्चितच द्याल असा विश्वास आ.संदीप क्षीरसागर यांनी व्यक्त केला.

शनिवार (दि.४) रोजी बीड शहरात नीलकमल हॉटेल येथे बुध्दीजीवी सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी व सामाजिक संघटनेचे पदाधिकारी यांची आ.संदीप क्षीरसागर यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक पार पडली. तसेच शहरातील शहेनशाह नगर भागात कॉर्नर सभा झाली. दरम्यान हिंदू-मुस्लीम वाद भडकवून आपल्या राजकीय पोळ्या भाजून घेतात घेणार्या विचारसरणीचा आता शेवट असणार आहे. जाती-जातींमध्ये भांडण लावून घाणेरडे राजकारण करण्याची संधी आता जनशक्ती देणार नाही . यावेळेस बीडमध्ये खासदार आणि दिल्लीमध्ये सरकार दोन्ही सेक्युलर विचारांचेच असेल असा आशावाद आणि विश्वास यावेळी आ.क्षीरसागर यांनी व्यक्त केला. याप्रसंगी माजी आ.सय्यद सलीम, माजी आ.सुनील धांडे, प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच स्थानिक नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# ध्यान हे मनाला निरोगी बनविण्यासाठीचे प्रभावी माध्यम - प्रा.विनय सोनुळे

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.६ एप्रिल**

सुन्यती इंटरनॅशनल फाउंडेशन व आई सेंटर प्रो तर्फे आयोजित दोन दिवसीय शिबिरास अंबाजोगाईकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. आजच्या या धकाधकीच्या व ताणतणावपूर्ण जीवनात, दैनंदिन कामकाजात सर्वच जण इतके मग्न झाले आहेत. की, त्यांना स्वतःच्या शारीरिक व मानसिक आरोग्याकडे लक्ष देण्यासाठी वेळच नाही. काही जण शरीर निरोगी राहण्यासाठी व्यायाम करतात पण, आपले मन निरोगी राखण्यासाठी काय करावे हे बहुतांशी जणांना माहिती नसल्यामुळे किंवा कळतय पण वळत नाही या उक्तीप्रमाणे मानव हा दैनंदिन जीवनात नैराश्य, उदासीनता, अपयश, उद्विग्नता, व्यसनाधीनता व ताण-तणावास सामोरे जावे लागत आहे. यावर उपाय म्हणजेच नियमित ध्यान करणे आवश्यक असून केवळ ध्यान हे मनाला निरोगी बनवण्यासाठी चे प्रभावी माध्यम असल्याचे प्रतिपादन सुन्यती इंटरनॅशनल फाउंडेशनचे केंद्रीय समन्वयक तथा मानसशास्त्रज्ञ प्रा. विनय सोनुळे यांनी केले.

येथील प्रशिक्षण क्षेत्रात अग्रगण्य असलेले विद्यार्थी-पालक, तसेच नोकरदार व व्यावसायिकांसाठी स्पोकन इंग्लिश व व्यक्तिमत्व विकासाबरोबरच, करिअर गाईडन्स, नोकरी विषयक मेळावे तथा व्यवसाय मार्गदर्शन शिबिरांचे सुनियोजन करणारे व समाजभानातून सर्वांना यशस्वी जीवनाची गुरुकिल्ली देणारे विश्वविक्रमवीर प्रशिक्षक तथा सुप्रसिद्ध लेखक नागेश जोंधळे संचालक, आई सेंटर प्रो, आई बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व इंग्लिश विंग्ज प्रि-प्रायमरी स्कूल यांच्या पुढाकाराने सुन्यती रिट्रीट म्हणजेच सुन्याती समता विपष्यना शिबिर - मराठवाडा चाप्टर-१ मनोहर अंबानगरीत आयोजित करण्यात आले होते. पुढे बोलताना प्रा.विनय सोनुळे यांनी या दोन दिवसीय शिबिरात सुन्य मेडिटेशन काय आहे व ते कसे करायचे त्याचबरोबर त्याचे फायदे दैनंदिन जीवनात कसे अनुभवता येता येतील यासाठीचे सखोल मार्गदर्शन विविध प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून या शिबिरात सहभागी झालेल्या लहानांपासून मोठ्यापर्यंत जगातील सर्वांत कठीण काम व ते ही अगदी सोप्या पद्धतीने कसे करायचे याचे प्रशिक्षण प्रा.सोनुळे यांनी अतिशय प्रभावीपणे दिले. या शिबिरात मनाचे डॉक्टर म्हणून सुपरिचित असलेले सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनीही सर्वांसोबत पूर्ण वेळ सहभागी होत सुन्य ध्यानाचे नवीन कौशल्य हस्तगत केले. आपल्या मनोगतात उपस्थितांना संबोधित करताना डॉ.इंगोले यांनी शरीर जसे आजारी पडते तसेच मनही आजारी पडत असते. त्यामुळे मनाच्या आरोग्याची ही काळजी घेणे आजच्या जीवनशैलीत अत्यावश्यक आहे.

# नगरपालिकेच्या कचराडेपो भोवती मोकाट कुत्र्यांचा कळप

## हल्ल्यात वन्य प्राण्यांचा मृत्यू,दोषींवर कारवाईची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.६ एप्रिल**

परळी नगरपालिकेने कचरा डेपो वनविभागाच्या डोंगरमाथ्याजवळ हलविल्याने कचर्याभोवती जमलेल्या शहरातील मोकाट कुत्र्यांचा कळप वनविभागाच्या जंगलामध्ये असलेल्या हरिण,मोर व इतर प्राण्यांचा फडशा पाडत आहेत वनविभागाकडुन पाण्याची उपलब्धता होत नसल्याने वन्यप्राण्यांना पाण्यासाठी जंगलाबाहेर यावे लागत आहे.नगरपालिका व वनविभागाच्या दुर्लक्षामुळे वन्य प्राण्याचा बळी जात असल्याने यातील दोषींवर कारवाई करण्याची मागणी वन्यजीव संरक्षक सामाजिक कार्यकर्त्यांनी केली आहे.

नगर पालिका प्रशासनाने शहराचा कचरा प्रकल्प वैद्यनाथ मंदिराच्या मागील डोंगरावर सुरू केला.या कचरा डेपोला परळीकरांनी सुरवातीलाच विरोध केला होता. मात्र परळीखरांचा विरोध डावलून हा प्रकल्प डोंगरावर सुरू केला. या प्रकल्पाच्या बाजूलाच वनविभागाचे डोंगर आहेत. या डोंगरावर अनेक वन्यजीवांचा अधिवास आहे. हरीण, मोर,ससा,कोल्हे असे अनेक प्रकारचे पक्षी,प्राणी येथे मुक्तपणे संचार करत असतात.मात्र आता या कचऱ्यामुळे डोंगरावर भटक्या कुत्र्यांचे टोळकेचे टोळके फिरत आहेत.या कुत्र्यांच्या टोळक्यांमुळे येथील वन्यजीवांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. दरम्यान या डोंगररांगांच्या परिसरात शहरातील नागरिक मोठ्या संख्येने मॉर्निंग वॉक साठी या डोंगरावर जातात. कचरा डेपोमुळे याठिकाणी मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक पसरले आहे. तसेच कुत्र्यांच्या टोळक्यांच्या वावर वाढला आहे. हे कुत्रे येथील मोर, हरिण सारख्या प्राण्यावर हल्ला करून जखमी करत आहेत. शनिवारी (दि.०४ मे) पहाटे मॉर्निंग वॉकसाठी गेलेले वैजनाथ माने, महावीर महालिंगे,रमेश कोमावार यांना हरिणाच्या विवळण्याचा आवाज आला.आम्ही आवाजाच्या दिशेने जंगलात पुढे गेलो तर याठिकाणी एक हरिण जखमी अवस्थेत दिसून आले. त्यांनी हरणा जवळ जावून पाहिले असता त्या हरणाच्या शरीरावर कुत्र्यांनी हल्ला करून जखमी केलेले दिसून आले. यांनी तात्काळ आपल्या जवळील पिण्याचे पाणी पाजले. पण अनेक ठिकाणी हरणाच्या शरीराचे लचके तोडलेले असल्याने पुढे काही उपाययोजना करण्या अगोदर काही वेळातच या हरिणाचा मृत्यू झाला. लगेच वन अधिकारी मनोहर पुंड यांना फोन केला असता त्यांनी तब्बल दोन तासांनी निमशासकीय कर्मचाऱ्यांना पाठवले व हरिण घेऊन गेले. तर नगरपालिकेचे मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे यांनाही यासंदर्भात माहिती दिली असता कर्मचारी पाठवतो म्हटले पण हरिण उचलून घेऊन जाईपर्यंत त्यांची माणसे तिकडे पोहचलीच नाहीत. अशा अनेक प्राण्यांना या भटक्या कुत्र्यांनी जखमी केलेले आहे. भविष्यात हे कुत्र्यांचे टोळके मॉर्निंग वॉक करणाऱ्या नागरीकावरही हल्ला करु शकतात. यामुळे यांचा आता तरी बंदोबस्त करावा अशी मागणी होत आहे.

यासंदर्भात नेहमी मॉर्निंग वॉक करणारे शिवसेनेचे शहरप्रमुख वैजनाथ माने यांनी काही दिवसांपूर्वी १३ डिसेंबर २३ रोजी वनविभाग व नगरपालिकेला भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करुन वन्यजीवांचे संरक्षण करा असे निवेदन दिले होते. मात्र नगरपालिकेने व वनविभागाने वाटाण्याच्या अक्षिदा देत या निवेदनाकडे दुर्लक्ष केले. यामुळे हरिणा सारख्या अनेक प्राण्यांना आपला जीव गमवावा लागत आहे. नगरपालिकेचा कचरा डेपो असल्याने नगरपालिकेने व वनविभागाने याकडे लक्ष देवून योग्य ती कारवाई करण्याची मागणी वैजनाथ माने यांनी केली आहे.यासंदर्भात वन अधिकारी मनोहर पुंड यांनी सांगितले की,आज सकाळी भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात हरिणाचा मृत्यू झाला आहे. आम्ही हरिण आणले असून त्याचे शवविच्छेदन केले आहे. दोन दिवसात याचा रिपोर्ट येईल. बहुतेक नगरपालिकेच्या कचरा डेपोमुळे याठिकाणी भटक्या कुत्र्यांची संख्या वाढली आहे. आम्ही लवकरच यासंदर्भात नगरपालिकेला पत्र देवून कुत्र्यांचा बंदोबस्त कराण्यासाठी प्रयत्न करणार आहोत सध्या निवडणूकीचे प्रशिक्षण सुरू आहे, मुख्याधिकारी यात व्यस्त आहेत त्यांच्या मोकळ्या वेळेत भेटून काय उपाययोजना करता येतील त्या उपाययोजना करणार आहोत.

कचरा डेपो गंगाखेड मार्गावर हलवा

गंगाखेड रस्त्यावर औष्णिक विद्युत निर्मिती केंद्राचे राखेचे तळे रिकामे झाले आहे.या रिकाम्या झालेल्या राखेच्या तळ्याच्या जागेवर हा प्रकल्प उभा केला जावू शकतो. हा प्रकल्प याठिकाणी हलवला तर भविष्यातील संकट दूर होऊ शकते. यामुळे नगरपालिकेने लक्ष देवून कचरा डेपो हलवण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.अन्यथा याठिकाणी असलेले वन्यजीव नष्ट होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# पंकजा मुंडेंच्या प्रचारार्थ आ.लोणीकर व आ.पवारांच्या उपस्थितीत कॉर्नर बैठक

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.६ एप्रिल**

सर्वसामान्य माणसाचा विकास झाला पाहिजे आणि तरुणांच्या हाताला काम मिळालं पाहिजे आणि या राज्याचा आणि या देशाचा कायापालट झाला पाहिजे आणि म्हणून ही निवडणूक आपल्यासाठी तुमच्यासाठी माझ्यासाठी खूप महत्त्वाची आहे.यानिवडणुकीमध्ये आपण ग्रामपंचायतीला ज्या ताकतीने लढतो ज्या ताकतीने आपण जिल्हा परिषद पंचायत समितीला लढतो ज्या ताकतीने आपण नगरपालिकेमध्ये लढतो ज्या ताकतीने तुम्ही विधानसभेमध्ये लढतो त्यापेक्षा दुप्पट ताकतीने आपल्याला लढायचं आहे आणि पंकजा मुंडे यांना भरघोस मताने दिल्लीमध्ये खासदार म्हणून पाठवायचा आहे पंकजा मुंडे खासदार झाल्यानंतर मोदी जी अमित शहाजी हजार टक्के त्यांना मंत्री करणार आहे गोपीनाथराव मुंडे ग्रामविकास मंत्री केंद्रात झाले फार वेळ त्यांना काम करायला संधी मिळाली नाही परमेश्वरांना आघात केला आणि आघात मध्ये मुंडे साहेब आपल्यातून गेले गोपीनाथ मुंडेचे अपुर्ण स्वप्न पूर्ण करण्यासाठी पंकजाताई मुंडेना प्रचंड मताधिक्य द्या असे आवाहन मा.मंत्री बबनराव लोणीकर यांनी केले आहे

यावेळी बोलतांना आ.लक्ष्मण पवार म्हणाले केद्र व सरकारच्या माध्यमातून आपण मोठ्या प्रमाणात निधी खेचून आणुन गेवराई मतदारसंघाचा



विकास साधला आसल्याचे आ.पवार म्हणाले पुढे बोलतांना ते म्हणाले की, बबनराव लोणीकर आज तलवाडा येथे पंकजाताईच्या प्रचारासाठी आले आहेत लोणीकर साहेबांनी त्यांच्या मतदारसंघांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी प्रत्येक ठिकाणी फिल्टर लावून त्या फिल्टर प्लांट च्या माध्यमातून २०० गावांना ते आज शुद्ध पाणी देत आहेत.महायुतीच्या उमेदवाराला निवडून दिल्यानंतर किंवा मतदान केल्यानंतर आपल्या अडचणी कमी होतील याचा विचार करुन भाजपला मत म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मत आहे


लोकसभा निवडणुकीचा प्रचारार्थ आज दि.६ रोजी गेवराई तालुक्यातील तलवडा व जातेगाव येथे पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ आ.बबनराव लोणीकर व आ.लक्ष्मण पवार यांच्या उपस्थितीत कॉर्नर बैठक संपन्न झाली.यावेळी विश्वजित खरात,सुशील जवंजाळ, राजेंद्र राक्षसभुवनकर, भगवान घुबार्डे,दादासाहेब गिरी,जे.डी.शहा,बंडूभाऊ बारगजे, दत्ता जाधव, पांडुरंग थडके,विठ्ठल हात्ते,आबुराव कर्वे, कुंड , विनोद सौंदरमल, राजाभाऊ आर्दड, प्रितम गर्जे,अभिजित मरकड,शेख मोहम्मद, शेख सिराज,आयाज कुरेशी,सागर शर्मा,सचिन वावरे, ईश्वर पवार, श्रीराम घाटुळ,महादेव खटके,पापा पंडीत, आदी उपस्थित होते.

# पोलिस वाहनाची धडक दुचाकीस्वाराचा मृत्यू

## लोखंडी सावरगाव टी - पॉईंटजवळ झाला अपघात

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.६ एप्रिल**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मंगळवारी अंबाजोगाईत होणाऱ्या सभेच्या बंदोबस्तासाठी जाणाऱ्या पोलिस जीपने दुचाकीला जोराची धडक दिली. या अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला आहे.हा अपघात अंबाजोगाई तालुक्यातील लोखंडी सावरगाव टी - पॉईंटजवळ रविवारी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास झाला आहे.



अंबाजोगाईतील मोदींच्या सभेसाठी पोलिस जीप एमएच २३, एफ ००१९ ही रविवारी अंबाजोगाईकडे जात होती. रात्री ८ वाजण्याच्या सुमारास या भरधाव जीपने लोखंडी सावरगाव येथील टी - पॉईंटजवळ दुचाकीला जोराची धडक दिली. या अपघातात हनुमंत महादेव पवार रा. गिरवली या युवकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.तसेच या अपघातात जीपचेही मोठे नुकसान झाले असून तीन पोलिसही जखमी झाले आहेत, अशी माहिती प्राप्त झाली आहे.

# ग्रामीण भागातील तरुण 'ऑनलाईन' जुगाराच्या विळख्यात

**तभा वृत्तसेवा**
**फुलवळ, ६ मे -**

कंधार तालुक्यातील शहर तसेच ग्रामीण भागात नवनवीन 'फॅशन ट्रेंड' दिवसागणिक मोठ्या प्रमाणात वाढत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. सध्याचे युग हे तंत्रज्ञानाचे असून तरुण पिढी इंटरनेट आणि फोनच्या इतकी आहारी गेली आहे की, या तरुणांना त्याचे एक प्रकारे व्यसनच जडले आहे. आज प्रत्येक तरुणाकडे 'स्मार्टफोन' आहे. त्यामध्ये इंटरनेटवर चालणारे अनेक प्रकारचे 'ऑनलाईन' खेळ (गेम) असतात. या खेळांनी तरुणांना अक्षरशः वेड लावले आहे. 'ऑनलाईन' रमी, सुडुको, तीनपत्ती (पत्त्यांचा एक प्रकार), क्रिकेट सामन्यांसाठी( ड्रीम ११) 'ऑनलाईन' संघ सिद्ध करणे, 'कॅण्डी क्रश', 'ब्ल्यू व्हेल', 'अँग्री बर्ड', 'पोकेमॉन', 'पब्जी' असे खेळ इंटरनेटवर धुमाकूळ घालत आहेत.

आजच्या आधुनिक युगात सध्या फोन हा प्रत्येकाच्या जीवनाचा एक भाग बनला आहे, त्यात वेगवेगळ्या सिम कार्ड कंपन्यांनी प्रतिदिन १.५ ते २ 'जीबी डेटा'काही दिवस मुक्त मध्ये देऊन तरुणांना भुरळ घातल्याचे पहावयास मिळत आहे. सध्या भारतामध्ये आयपीएल क्रिकेटचे सामने चालू आहेत. त्यामध्ये ड्रीम ११ ऑनलाइन गेम चा वापर करून त्यातून घरबसल्या पैसा कमावता येऊ शकतो, हे सगळ्यांना आकर्षित करत असल्याचे जाणवत आहे. त्यासह तीनपत्ती, रम्मी, लुडो यांची जाहिरातही अभिनेते, क्रिकेटपटू करत असल्यामुळे तरुण अधिक प्रमाणात त्याला बळी पडत आहेत.

१७ ते ४० वर्षातील ४ नवतरुण सार्वजनिक ठिकाणी एकत्र येत 'स्मार्टफोन'वर 'लुडो' खेळतांना दिसत आहेत. इंटरनेटच्या युगात एका क्लिकवर हे तरुण तासन् तास खेळाच्या सुखात मग्न होतांनाचे चित्र दिसत आहे. ग्रामीण भागामध्ये या ऑनलाइन गेम च्या आहारी गेल्या नवतरुणामुळे रोजगारांचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर उद्भव आहे. शेतीमध्ये शेत काम करण्यासाठी सहजासहजी कामगार उपलब्ध होताना दिसून येत नाहीत.

केवळ तरुणच नव्हे, तर आजी, आजोबा, नातवंडे, आई आणि बाबा यांच्यातही 'लुडो' खेळाचा डाव चांगलाच रंगू लागला आहे. स्मार्टफोनमध्ये असलेल्या 'लुडो' या खेळाचे खूळ सध्या शहरासह गावखेड्यात वाऱ्यासारखे पसरले आहे. पूर्वी लहान मुलांच्या मनोरंजनासाठी खेळ खेळला जायचा; मात्र तरुणांमध्येही त्याची 'क्रेझ' मोठ्या प्रमाणात वाढली आहे.

लुडो हा खेळ भटकण्याचा नसला, तरी त्याने तरुणांना तहानभूक विसरायला लावली आहे.

स्मार्टफोनचा शोध लागण्यापूर्वीही समाजात जुगार अस्तित्वात होता; मात्र जुगार खेळणे, लॉटरी या गोष्टी सहज होत नव्हत्या. विविध भाषा मधील विविध 'ॲप'च्या माध्यमातून जुगार खेळणे अधिक सोपे झाले आहे. 'खेलो और जीतो', 'खेलो और पाओ' किंवा 'खेळा आणि भरपूर जिंका', अशा मथळ्याखाली मोठमोठी आश्वासने देत असतात.

ऑनलाईन जुगाराविषयी सरकारचे धोरणच नाही, त्यामुळे तो फोफावत आहे.

महाराष्ट्र सरकारने अजून या जुगारावर कायद्याने बंदी घातलेली नाही. या जुगारामागचे चित्र फार विदीर्ण आणि भीषण आहे. नोकरी करणारे अनेक नागरिक हे जुगाराच्या नादी लागून कर्जबाजारी झाले आहेत. अनेक लोक गुन्हेगारी मार्गाला लागले आहेत. कित्येक तरुण मुलांनी आत्महत्या केल्या आहेत. अशी किती कुटुंबे देशोधडीला लागली असतील ? याची गणती नाही. जुगाराचे व्यसन लागलेल्या व्यक्तीला योग्य वेळी समुपदेशन न केल्यास हे दुष्टचक्र चालूच रहाते.

हातातील स्मार्टफोनमुळे आपण 'स्मार्ट' (हुशार) झालो असलो, तरी हाच स्मार्टपणा असा धोकादायक ठरू शकतो, याकडे सर्वांनी सर्वांनी गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे.

# देगलुरात आयपीएलच्या सट्ट्याने धरला वेग

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर, ६ मे -**

गेल्या दीड महिन्यापासून शहर व परिसर अवैध सट्टेबाजाराच्या विळख्यात सापडला आहे. या माध्यमातून आयपीएलवर दररोज लाखोंची उलाढाल होत असताना येथील पोलीस यंत्रणा कुठलीच कावाई करत नसल्याने पोलीस देखील यात हिस्सेदार आहेत की काय ? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.



शहरात सुरुवातीला देगाव नाका जवळील एका गल्लीतून हा सट्टा केंद्र चालविला जात होता. कालांतराने या सट्टे बाजाराचे लोन आजूबाजूच्या तालुक्यासह सीमेपलीकडील भागात पसरवीत मुख्य भागात बुकी नेमले आहेत. कमी कालावधीत लाखो कमविण्याच्या लालसेने अनेक तरुण ऑनलाइन जुगाराच्या विळख्यात सापडले आहेत. गेल्या दीड महिन्यापासून चालू असलेला हा आर्थिक जीवघेणा जुगार येथील डीबी शाखेत गेल्या तीन-चार वर्षापासून कार्यरत असलेल्या पाच अक्षरी आडनाव असलेल्या कर्मचाऱ्याच्या कृपादृष्टीने चालू असल्याची चर्चा होत आहे.

अजून २० ते २१ दिवस आयपीएलचा हंगामा चालू राहणार आहे. यादरम्यान क्रिकेटवर मोठ्या प्रमाणात ऑनलाइन सट्टा लावण्याची दाट शक्यता आहे. आता याचे केंद्र तेलंगणा सीमा भागात हलविण्यात आले आहे. मोठ्या बुकिनी गावागावात काही व्यक्ती नियुक्त करून ते सट्टा खेळणाऱ्याला ऑनलाइन लिंक पुरवित असल्याची माहिती पुढे येत आहे. या माध्यमातून साहजिकच प्रत्येक सामन्यावर लाखो रुपयांची उलाढाल होण्याची शक्यता आहे. झटपट श्रीमंत होण्याच्या नादात अनेकजण कर्ज बाजारी झाले आहेत. तर सट्टा चालविणारे अल्पावधीतच मालामाल झाल्याचे चित्र आहे. या गंभीर बाबीकडे पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी लक्ष घालून सट्टेबाजारांना आवर घालावी तसेच यास पाठबळ देणाऱ्या डीबी शाखेतील कर्मचाऱ्यांची तात्काळ उचल बांगडी करावी अशी मागणी सर्वसामान्य नागरिकांतून होत आहे.

## संक्षिप्त वृत्त

### रुग्णांना फळे वाटप व वृक्षारोपण करत वाढदिवस साजरा

**हदगाव -** चढत्या उन्हाचा पारा आणि भविष्यात वाढणाऱ्या उन्हाची तिव्रता लक्षात घेऊन हदगाव तालुक्यातील अनेक वाडी - तांड्यात गोर सेनेच्या कार्यकर्त्यांनी वृक्षरोपण व उप जिल्हा रुग्णालय हदगाव येथे रुग्नांना फळे वाटप करून गोर सेना तालूका अध्यक्ष रविकुमार चव्हाण यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. वाढदिवसाला होणार व्यर्थ खर्च टाळून पर्यावरणाला वाचवण्यासाठी वृक्ष लागवड करणे सर्वांचे कर्तव्य आहे आणि या पुढे सर्वांनी आप आपल्या वाढदिवसाला किमान पाच झाडे लावावीत असे या वेळी गोर सेनेच्या कार्यकर्त्यांनी ठरविले आहे. येणाऱ्या काळात गोर सेने कडून पाच हजार वृक्ष लागवड करण्याचा निर्धार केला आहे असे या वेळी सांगण्यात आले.

### शिष्यवृत्ती परिक्षेत मॉडर्नच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश



**उमरी -** महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद पुण्याच्या वतिने घेण्यात आलेल्या इयत्ता पांचवीआणि आठवीच्या शिष्यवृत्ती परिक्षेत मॉर्डन इंग्लिश स्कूल उमरीच्या दहा विद्यार्थ्यांनी पात्रता प्राप्त केली आहे. त्यामध्ये इयत्ता ५ वीतील अर्पित माने, माही असावा, ममताश्री शिंदे. इयत्ता ८ वीतील शर्वरी तम्मेवार, वैभवी यम्मेवार, अक्षरा बिजमवार, सोनल सुरबुलवाड, शौर्य उत्तरवार आणि आशुतोष कदम ह्या विद्यार्थ्यांनी पात्रता प्राप्त केली आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. अनुराधा संजय कुलकर्णी यांनी अभिनंदन केले आणि शाळेच्या सर्व शिक्षक सहकार्यांनी विषेश परिश्रम घेऊन मॉर्डन इंग्लिश स्कूलची यशस्वीतेची परंपरा कायम राखल्याबध्दल स्टाफचे देखिल कौतुक केले.

### शेतकऱ्याच्या बैलजोडीची चोरी

**मुदखेड -** मुगट येथील एका शेतकऱ्याची बैलजोडी आखाड्यावरून चोरी गेल्याची घटना घडली. मुगट येथील शेतकरी भास्कर चोखोबा गोडबोले राहणार इंदिरानगर नांदेड येथील रहिवाशी असून त्यांची शेती मुदखेड तालुक्यातील मुगट येथे असुन दि. ३ मे रोजी संध्याकाळी सात वाजता सुमारास ८० हजार किमतीचे बैल जोडी चोरट्याने आखाड्यावर बांधलेले बैलजोडी चोरून नेल्याची घटना घडली. सध्या नांदेड जिल्ह्यात जनावर चोरी करण्याची टोळी तैनात झालाअसून शेतकऱ्यांच्या शेतातील बैल जोडी असो किंवा जनावर चोरून नेण्याचा प्रकार वारंवार घडत असल्याचे शेतकरी सांगतात. सदर बैल जोडी हे तांबड्या रंगाची असून शेपुट काळा, शिंग उभे असुन शेतकरी भास्कर चोखोबा गोडबोले यांनी दिलेल्या तक्रारीवरून मुदखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### शिष्यवृत्ती परीक्षेत गुरुकुल पब्लिक स्कूलचे विद्यार्थी चमकले



**नरसी फाटा -** पूर्व प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षांच्या नुकत्याच आलेल्या निकालात नायगाव शहरातील गुरुकुल पब्लिक स्कूल च्या ८ विद्यार्थ्यांनी स्कॉलरशिप परिक्षा पात्र करून बाजी मारली आहे. या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र आभिनंदन होत आहे. गुरुकुल पब्लिक स्कूल हे गेल्या अनेक वर्षांपासून शहरात विविध शैक्षणिक उपक्रमासह सामाजिक, सांस्कृतिक क्टीविटी मध्येही मुलांची जडणघडण घडवून अणाणरी शाळा म्हणून अल्पावधीत नावरूपाला आली आहे. सन २०२३ -२४ या शैक्षणिक वर्षात तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात या शाळेने प्रथम क्रमांक मिळविला होती. त्यानंतर आता नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या स्कॉलरशिप परीक्षेतही गुरुकुल पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. त्यात शाळेतील श्रीकर रघुनाथ सूर्यवंशी, सानवी संतोष कल्याण, सचिन सुभाषराव बेंद्रीकर, अवनी शरद कदम, तनवी प्रदीप करमाळे, कृष्णा विजय पवार, सिद्धांत विजय गाडले, आराध्या संतोष मोरे या विद्यार्थ्यांनी स्कॉलरशिप परीक्षेत आपली पात्रता सिद्ध केले आहे. या त्यांच्या यशस्वी भरारी बद्दल शाळेचे सर्व शिक्षक व कर्मचारीवृदांसह मुख्याध्यापक स्वाती कल्याण मॅडम, संस्थेच्यावतीने संस्थेचे सचिव संतोष पाटील कल्याण यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे स्वागत करून त्याना पुढिल वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

### जिल्हाधिकारी कार्यालयात पेन्शन अदालत

**नांदेड -** जिल्ह्यातील महसूल विभागातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या अडचणीचे निवारण करण्यासाठी मे २०२४ महिन्याच्या दुसऱ्या मंगळवार ७ मे २०२४ रोजी सकाळी ११ ते दुपारी १.३० वा. जिल्हाधिकारी कार्यालय येथे पेन्शन अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

# कदमाची वाडी येथील ग्रामस्थांचा मतदानावर बहिष्कार

**तभा वृत्तसेवा**
**लोहा, ६ मे -**

गत विधानसभा निवडणूक प्रारंभी कदमाची वाडी येथील ग्रामस्थांनी दगडसांगवी, कदमाचीवाडी, कुरुळा हा रस्ता डांबरीकरण करून नदीवर पुलाचे बांधकाम करण्यात यावे या प्रमुख मागणीसाठी २०१९ च्या विधानसभा निवडणुकीवर बहिष्कार घातला होता. तेव्हापासुन लोकप्रतिनिधीं किंवा शासनाकडुन या मागणीची पुर्तात केली नाही. मागीणी करुनही ५वर्षाचा काळ संपुष्टात आला. परंतु मागणी मान्य झाली नसल्यामुळे कदमाची वाडी येथील ग्रामस्थांनी लातूर लोकसभा मतदारसंघात ७ मे रोजी होणाऱ्या निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचा निर्धार केला आहे.

लोहा तालुक्यातील कदमाची वाडी येथे एकूण ५७७ मतदार आहेत. त्यापैकी ३१५ पुरुष तर २६२ महिला मतदार आहेत. सदर गाव लातूर लोकसभा मतदारसंघात तर लोहा कंधार विधानसभा मतदारसंघ समाविष्ट आहे. हा भाग डोंगराळ व आडवळणी दऱ्या खोऱ्यात आहे. तालुक्याला अथवा इतर गावांना जाण्यासाठी कदमाची वाडीवासीयांना चांगला रस्ता नाही. त्यामुळे दगड सांगवी - कदमाची वाडी-कुरुळा रस्ता डांबरीकरण करून नदीवर पुलाचे बांधकाम करण्यात यावे, अशी मागणी ग्रामस्थांनी पाच वर्षांपासून लावून धरली. या गावातील लोकांना पावसाळ्यात येण्या-जाण्यासाठी आडचण होत असल्यामुळे ग्रामस्थांनी एकमुखी ठराव घेत २०१९ मधील सार्वत्रिक विधानसभा निवडणुकीवर बहिष्कार टाकला होता. मात्र ५ वर्षांत शासनाकडून दगडसांगवी कदमाची वाडी-कुरुळा या प्रमुख रस्त्यासंदर्भात कुठलाच निर्णय घेण्यात आला नाही. त्यामुळे गावकऱ्यांनी लातूर लोकसभा मतदारसंघात ७ मे रोजी होणाऱ्या निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे. या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले आहे.

कदमाची वाडी येथील गावकऱ्यांची समजूत काढून त्यांना मतदान प्रक्रियेत सहभागी करून घेण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी अरुणा संगेवार, तहसीलदार विठ्ठल परळीकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रयत्न सुरू आहेत. दि. ४ मे रोजी तहसीलदार परळीकर यांनी कदमाची वाडी येथे गावकऱ्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला असल्याचे नायब तहसीलदार संजय भोसीकर यांनी सांगितले.

# पशुपालकांनी पशुंना जपावे : डॉ. बोधनकर

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ६ मे -**

उन्हाची दाहकता आता वाढली आहे. उन्हाळ्याच्या दिवसांत अपुरा चारा व निकृष्ट आहारामुळे जनावरे अशक्त बनून त्यांची प्रतिकारशक्ती कमी होते. ते विविध रोगांना बळी पडतात. त्यामुळे पशुपालकांनी गुरांना जपावे असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. भुपेंद्र बोधनकर यांनी केले आहे.



उन्हाळ्यात गुरांना हिरवा चारा मिळत नाही. परिणामी, त्यांना विविध आजारांचा सामना करावा लागतो. तालुक्यात उन्हाचा चटका आता वाढत आहे. त्यांना सावली व चारापाणी याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. गुरांना जपण्यासाठी त्यांचे लसीकरण करून घेण्यासोबतच त्यांचा उन्हापासून बचाव करणेही गरजेचे आहे. जनावरांना लाळ खरकत, घटसर्प, फऱ्या रोगाची लस टोचावी. परोपजीवी जंतूंचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी जंतुनाशक औषधे पाजावीत. गाभण जनावरे व दूध उत्पादक जनावरांची विशेष काळजी घ्यावी. जनावरांचा गोठा व परिसर स्वच्छ असावा. मलमूत्राची व्यवस्थित विल्हेवाट लावावी, असा सल्ला पशुतज्ज्ञांकडून दिला जात आहे. गुरांना उष्माघाताचे अक्षण आढळल्यास तत्काळ पशुवैद्यकांचा सल्ला घ्यावा. वाढत्या उन्हापासून गुरांचा बचाव करण्यासाठी पशुपालकांनी काळजी घ्यावी. गुरांना उन्हात बांधू नये. उन्हाचा झळा लागू नये याची काळजी घ्यावी. सावलीची व्यवस्था करावी. गुरांच्या चारापाण्याकडे लक्ष द्यावे. तसेच गुरांना उन्हाळ्यात पाच ते सहा वेळा पाणी पाजावे असे आवाहन डॉ. भुपेंद्र बोधनकर यांनी केले आहे.

# सोनाली मोळके हिने पटकावला आदिवासी कोळी महादेव समाजात पहिली डॉक्टर होण्याचा मान

**तभा वृत्तसेवा**
**अर्धापूर, ६ मे -**

जिद्द व चिकाटीच्या जोरावर निमगाव (ता अर्धापूर) येथील आदिवासी कोळी महादेव समाजातील पहिली महिला डॉक्टर होण्याचा मान सोनाली मोळके हीने पटकावला आहे. तिच्या यशाचे कौतुक नागरिकांकडून होत आहे.

निमगावात आदिवासी कोळी महादेव समाज खूप मोठ्या संख्येने राहतो. या समाजाची शैक्षणिक प्रगती होत असुन येथील तरुण वेगवेगळ्या क्षेत्रात यशस्वी वाटचाल करीत आहेत. तसेच हा समाज शिक्षणाच्या प्रवाहात येत आहे.

निमगाव येथील सोनाली गिरीधारी मोळके हीच जन्म एका शेतकरी कुटुंबात झाला. कुटुबांत शैक्षणिक वातावरण असल्याने तिची ओढ शिक्षणाकडे लागली. तीचे प्राथमिक शिक्षण निमगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत झाले. तर माध्यमिक शिक्षण नांदेड येथील प्रतिभा निकेतन माध्यमिक शाळेत झाले. तीने दहावी व बारावीच्या परीक्षेत चांगले घेतलें होतें. तिने डॉक्टर होण्याचे स्वप्न बाळगले होते.

वैद्यकीय शिक्षण प्रवेश पात्रता परिक्षेची तयारी सुरू केली. या प्रतिक्षेत चांगले गुण मिळाले. वैद्यकीय शिक्षणासाठी पुणे येथील बी.जे.ससून वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश घेतला. या वैद्यकीय महाविद्यालयात तिनें पुर्ण केले आहे.काही दिवसांपूर्वी पदविदान समारोह संपन्न झाला.

तिच्या यशाचे गावांसह व पंचक्रोशीतील गावातील नागरिकांनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या. यावेळी गावातील सेवा सहकारी सोसायटीचे माजी अध्यक्ष दगडुजी जगताप, तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष गंगाराम झुडपे, संजय घोरपडे, पांडुरंग मोळके, वसंतराव चव्हाण, माजी उपसरपंच बालाजी जगताप, राधेश्याम पारीख, गणेश गोमासे पाटील, नागोराव गोमासे पाटील, साहेबराव मोरे, जी. पी. सुर्यवंशी, बालाजी पन्नासे, पत्रकार दिगंबर मोळके, अनिल मोळके आदी उपस्थित होते.

आमच्या कुटुंबात शैक्षणिक वातावरण होते. मी डॉक्टर होण्याचे स्वप्न बाळगले व ते साकार करण्यासाठी आभ्यात सातत्य ठेवले. मला आई-वडीलांनी प्रोत्साहन दिल्याने माझे डॉक्टर होण्याचे स्वप्न साकार झाले आहे अशा भावना सोनिली मोळके यांनी व्यक्त केल्या.

# ईस्लापूर येथील जल जीवन मिशनच्या कामामुळे नागरिक त्रस्त



**तभा वृत्तसेवा**
**ईस्लापूर, ६ मे -**

गावामध्ये जाणारा मुख्य रस्ता फोडून जलजीवन मिशनचे काम चालू आहे पण त्या कामामुळे येथील ग्रामस्थांना खूप त्रास सोसावा लागत आहे. येथील संबंधितांना वारंवार सांगून सुद्धा मुख्य रस्त्यावरील खोदलेली नाली हे अर्धवट बुजून उर्वरित दगड माती ही अद्यापही काढलेली नाही यामुळे ये-जा करण्या करीता नागरीकांना त्रास सहन करावा लागत आहे.

शासनाकडून मिळणाऱ्या विविध योजनांच्या माध्यमातून अंतर्गत रस्ते विकासाची कामे पूर्णत्वास गेली. गेल्या अनेक वर्षाचा रस्त्याचा वनवास संपला म्हणून ईस्लापूर येथील नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला. आता चांगल्या रस्त्यावरून जल जीवन मिशन अंतर्गतची प्रभावी सार्वजनिक नळ योजना मंजूर झाली. या योजनेचे काम चालू झाल्यानंतर पाईपलाईन खोदकाम म्हणून गावातील रस्ते खोदून पाईपलाईन टाकण्यात आली. परंतु खोदलेल्या रस्त्यावरून चालतांना येथील नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. या खोदकाम केलेल्या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम हे पाणीपुरवठ्याच्या ठेकेदाराकडे आहे. आता येणारा पावसाळा एका महिन्यावर येऊन ठेपला आहे. नळ योजनेचे काम अपूर्ण असल्यामुळे आता रस्ते दुरुस्तीचे काम केंव्हा होणार आहे असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत. या बाबीकडे वरिष्ठांनी तात्काळ लक्ष घालून येथील पाणीपुरवठा योजनेच्या थांबलेल्या कामाला पावसाळ्या अगोदर पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित गुत्तेदारांना देऊन तातडीने खोदलेल्या रस्त्याचे अपूर्ण काम पूर्ण करण्यासाठी व जल जीवन योजनेचे चालू असलेले काम पूर्ण करण्याच्या सूचना संबंधितांना द्याव्यात अशी मागणी ईस्लापूर येथील नागरिकांतून केली जात आहे.



**मुखेड - शहरात उन्हाची तीव्रता वाढल्यामुळे नागरिकांना घराच्या बाहेर पडणे अशक्य झाले आहे. सोमवारी मुखेड येथे आठवडी बाजार असताना आठवडी बाजारात शुकशुकाट दिसून आला आहे. नागरिकांना भाजीपाला विक्री करण्यासाठी मोठी कसरत करावी लागली आहे. (छाया- हाफीजखान पठाण, मुखेड)**

# विजेच्या कडकडाटासह पाऊस पडण्याची शक्यता

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ६ मे -**

प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र मुंबई यांनी दिनांक ६ मे २०२४ रोजी दुपारी १ वाजता दिलेल्या सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी दिनांक ६ व ७ मे २०२४ हे दोन दिवस येलो अलर्ट जारी केलेला आहे. दिनांक ६ व ७ मे २०२४ ह्या दोन दिवसांच्या काळात जिल्ह्यात एक किंवा दोन ठिकाणी ताशी ३० ते ४० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची, विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह पाऊस पडण्याची शक्यता वर्तविली आहे. या नैसर्गिक आपत्ती संदर्भात सर्व संबंधित यंत्रणा आणि जनतेने खबरदारी घ्यावी. खबरदारीची उपाययोजना म्हणून खालील प्रमाणे काळजी घ्यावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर यांनी केले आहे.

# लाखो रुपये खर्चून उभारलेल्या पाणी फिल्टर मशीन पडल्या धुळखात

**तभा वृत्तसेवा**
**हिमायतनगर, ६ मे -**

तालुक्यातून सन २०१८ते सन २०२० या कालावधी २२ ग्रामपंचायतीने १४ वा वित्त आयोगाचे लाखो रुपये खर्च करून गावातील नागरिकांच्या आरोग्यासाठी पी आर ओ पिण्याच्या पाण्यासाठी पाणी फिल्टर मशीन खरेदी करून काही दिवसा करिता त्याद्वारे शुद्ध फिल्टर पाणी नागरिकांना पुरविण्यात आले परंतु आता ह्या अनेक ठिकाणच्या मशीन बंद पडल्याने अनेक नागरिकांचे पि.आर.ओचे पाणी पिण्याचे स्वप्न भंगले आहे परंतु संबंधित ग्रामपंचायत अधिकारी, सरपंच, ही मशीन दुरुस्त करून नागरिकांना पुरविण्याकडे दुर्लक्ष करीत असल्याने नागरिकांतुन खेद व्यक्त केला जात आहे.

तालुक्यातील ग्रामपंचायत अंतर्गत इसवी सन २०१७ मध्ये १४ वा वित्त आयोगाचे लाखो रुपये खर्च करून नागरिकांच्या आरोग्यासाठी पी आर ओ शुद्ध पिण्याच्या पाण्यासाठी मशिनी खरेदी करण्यात आल्या व त्याद्वारे जवळपास अंदाजे १२० ते १३० ग्राहकांना प्रति बॉटली२० लिटर पाच रुपये प्रमाणे विक्री करण्यात येत होती परंतु कालांतराने अवघ्या काही दिवसात या मशीन बंद पडल्याने नागरिकांच्या आरोग्यासाठी लागणारी शुद्ध पि आर ओ पाणी मिळणे मुश्किल झाले नाईला जास्तव पी आर ओ पिण्याच्या पाण्याची लागलेली सवय अनेकांना बंद करता आली नसल्याने खाजगी मालक धारकाकडून पिण्याकरिता पि.आर. ओ पाण्याची खरेदी करावी लागत आहे परंतु चौदाव्या वित्त आयोगातून लाखो रुपये खर्च करून गावकऱ्यांच्या आरोग्या करिता उभारण्यात आलेल्या बंद पडलेल्या पीआरओ मशीन संबंधित ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी, पदाधिकारी जाणीवपूर्वक त्याकडे दुर्लक्ष करीत असल्याची खंत नागरिकातून ऐकावयास मिळते. याच प्रकारे हिमायतनगर तालुक्यातून चौदावा वित्त आयोग खर्च करून २२ ग्रामपंचायतीने नागरिकांच्या आरोग्यासाठी पी आर ओ मशीन खरेदी करण्यात आल्या होत्या त्यातील अनेक मशीन धुळखात पडून असल्याचेही जाणकारांच्या तोंडून ऐकावयास मिळत आहे परंतु त्या बाबतीत दुरुस्त करण्याकरिता ग्रामविकास अधिकारी व सरपंच यांची उदासीनता दिसून येत असल्याचे बोलल्या जात आहे.



खाजगी पी आर ओ पाणी बॉटल साठी २५ ते ३० रुपये मोजावे लागत आहे तर सर्वांच्या सोयीसुविधीसाठी असलेली लाखो रुपये खर्च करून उभारण्यात आलेल्या पाणी प्लांटला काही प्रमाणात खर्च करून दुरुस्त केल्यास गोरगरीब नागरिकांचे पि.आर.ओचे शुद्ध पिण्याच्या पाण्याचे स्वप्न निचितच साकार होईल अशी अपेक्षा अनेकांनी व्यक्त केली आहे.

CMYK

# लातूर दिनांक

लातूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले

## महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर दि, ६ मे-**

श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर न्यासाच्या निवडणूक कार्यक्रमाप्रमाणे श्री.सं.क.कुलकर्णी (धर्मदाय सहआयुक्त, छत्रपती संभाजी नगर) यांच्या नियंत्रणाखाली दि. ०२/०५/२०२४ रोजी संस्थेच्या कार्यालयात संस्थेची निवडणूक संपन्न झाली.

यामध्ये आदिनाथ बसवंतराव सांगवे यांची अध्यक्ष, तर माधवराव त्रिबंकराव पाटील (तपसेचिंचोलीकर) यांची उपाध्यक्ष म्हणून निवड झाली आहे. त्यांचा आणि कार्यकारी मंडळाच्या सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा महाविद्यालयाच्या प्राचार्य कक्षामध्ये प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी शाल, पुष्प गुच्छ, स्मृतीचिन्ह आणि पेढे देऊन यथोचित सत्कार केला. यावेळी नवनिर्वाचित संस्था पदाधिकारी राजेश्वर वैजनाथराव बुके, प्रदीपकुमार विश्वनाथप्पा दिंडीगावे, प्रभूप्पा शिवलिंगप्पा पटणे, बसवराज (राजू) गुरुपादप्पा येरटे, महेश वीरभद्रप्पा हालगे, बाबुराव विठ्ठलराव तरगुडे, ॲड. काशिनाथ गुणवंतप्पा साखरे, माधवराव हणमंतराव पाटील, सुनील सिद्रामप्पा मिटकरी, विजयकुमार नागनाथप्पा रेवडकर, प्राचार्य डॉ. बाबू खडकभावी, उपप्राचार्य डॉ.राजकुमार लखादिवे आणि कार्यालय प्रमुख नाम देव बेंदरगे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी आभारपर मनोगत व्यक्त करताना प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, महाविद्यालयाचा विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून त्याच्या सर्वांगीण विकासासाठी संस्था, महाविद्यालय प्रशासन, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले पाहिजे. सूत्रसंचालन उपप्राचार्य डॉ. राजकुमार लाखादिवे यांनी केले.



# लातुरात आज मतदान; प्रशासन सज्ज



**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि.६ मे -**

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी लातूर मतदारसंघात ७ मे रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ दरम्यान २ हजार १२५ मतदान केंद्रावर मतदान होणार आहे. यासाठी निवडणूक यंत्रणा सज्ज झाली आहे. ५ मे रोजी सायंकाळी ६ पासून जाहीर प्रचार बंद झाला आहे. या अनुषंगाने आदर्श आचारसंहितेचे पालन करण्यासाठी विविध पथके कार्यान्वित करण्यात आली आहेत. मतदारांवर कोणत्याही आमिष, प्रलोभन दिले जात असल्यास किंवा कोणताही दबाव आणला जात असेल किंवा धमकावले जात असल्याचे निदर्शनास असल्यास अशा व्यक्तींवर कठोर कार्यवाही करण्यात येईल, असे जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बैठक सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेला पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, प्रभारी अपर जिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत कदम, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके यांची प्रमुख उपस्थिती होती.

लातूर लोकसभा मतदारसंघात एकूण १९ लाख ७७ हजार ४२ इतके मतदार आहेत. २ हजार १२५ मतदान केंद्रांवर मतदान घेतले जाणार असून यासाठी नियुक्त मतदान पथकांमध्ये ८ हजार ५०० अधिकारी, कर्मचारी यांचा समावेश आहे. तसेच त्यांना सहाय्य करण्यासाठी बीएलओ, चतुर्थश्रेणी कर्मचारी, अंगणवाडी सेविका, आरोग्य कर्मचारी, क्षेत्रिय अधिकारी असे ८ हजार २६५ अधिकारी, कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे मतदान केंद्राच्या सुरक्षेसाठी पोलीस अधिकारी, कर्मचारी नियुक्त करण्यात आलेली आहेत. कायदा व सुव्यवस्थेसाठी बीएसएफ, एसआरपीएफ दलाच्या तुकड्या जिल्ह्यात आल्याचे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी सांगितले.

**उष्णतेच्या लाटेपासून बचावासाठी मतदान केंद्रावर विशेष खबरदारी**

उष्णतेच्या लाटेची शक्यता लक्षात घेवून मतदान केंद्रांवर विशेष उपाययोजना करण्याचे निर्देश भारत निवडणूक आयोगाने दिले आहेत. त्यानुसार प्रत्येक मतदान केंद्रांवर पिण्यासाठी पाणी, मतदारांच्या रांगेच्या ठिकाणी मंडप, मतदान केंद्रावर उपलब्ध असलेल्या खोलीमध्ये मतदारांना बसण्यासाठी खुर्च्या, पंख्यांची व्यवस्था करण्यात येणार आहे. आरोग्य विभागामार्फत सर्व मतदान केंद्रांवर विशेष खबरदारी घेण्यात आली आहे. मतदारांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी प्रथमोपचार कीटसह आरोग्य कर्मचारी प्रत्येक मतदान केंद्रावर उपस्थित राहणार आहेत. त्यांच्याकडे मुबलक प्रमाणात ओआरएस पावडर आणि औषधी उपलब्ध राहतील. जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र आणि ग्रामीण रुग्णालये यांच्या कार्यक्षेतत्रात रुग्णवाहीकेद्वारे आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.

**एक हजार ६२ केंद्रांवरील मतदान प्रक्रियेवर वेब कास्टिंगद्वारे नजर**

लातूर लोकसभा मतदारसंघातील ५० टक्के म्हणजेच जवळपास एक हजार ६२ मतदान केंद्रांवरील मतदान प्रक्रियेचे वेब कास्टिंग केले जाणार असून याद्वारे संबंधित सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी, निवडणूक निरीक्षक यांची मतदान प्रक्रियेवर नजर राहणार आहे. यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात स्वतंत्र संनियंत्रण कक्ष तयार करण्यात आलेला आहे.

मतदान पथके, मतदान यंत्र वाहतुकीवर राहणार लक्ष

लातूर मतदारसंघातील मतदान प्रक्रियेसाठी ६ मे रोजी मतदान पथके रवाना होणार आहेत. तसेच क्षेत्रीय अधिकारी, भरारी पथके, स्थिर निगराणी पथके, व्हीडीओ निगराणी पथके अधिक क्षमतेने कार्यान्वित करण्यात आलेली आहेत. या ७९३ जीप, ३०१ बसेसची व्यवस्था करण्यात आली असून या सर्व वाहनांच्या हालचालीचे जीपीएस प्रणालीद्वारे संनियंत्रण केले जाणार आहे. विशेषतः मतदान यंत्रे घेवून जाणारी वाहने आणि क्षेत्रीय अधिकारी यांच्या ताब्यातील मतदान यंत्रांची वाहतूक करणाऱ्या वाहनांवर जिल्हाधिकारी कार्यालयातून निगराणी केली जाणार आहे.

**सकाळी साडेपाच वाजता मॉक पोल**

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी ७ मे रोजी होणाऱ्या मतदानादिवशी पहाटे साडेपाच वाजता सर्व उमेदवारांनी नियुक्त केलेल्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत मॉक पोलची प्रक्रिया पार पडणार आहे. त्यानंतर सकाळी ७ वाजता प्रत्यक्ष मतदानाला सुरुवात होईल. मतदाना दिवशी ४ हजार २५० बॅलेट युनिट, २ हजार १२५ कंट्रोल युनिट आणि २ हजार १२५ व्हीव्हीपॅट यंत्रांचा वापर केला जाणार आहे.

**पर्यावरण रक्षणासाठी मतदान केंद्रांवर होणार वृक्षांच्या बियांचे वाटप**

लोकसभा मतदारसंघात यावर्षी प्रथमच इकोफ्रेंडली मतदान केंद्रांची उभारणी केली जाणार आहे. तसेच लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातील मतदान केंद्रांवर विविध प्रकारच्या बियांचे वाटप करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्याची अभिनव संकल्पना जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या सूचनेनुसार राबविण्यात येत आहे. तसेच प्रत्येक मतदारसंघात महिला नियंत्रित, युवा नियंत्रित आणि दिव्यांग नियंत्रित प्रत्येकी एक मतदान केंद्र असणार आहे.

**पोलीस बंदोबस्त तैनात**

लातूर लोकसभा मतदारसंघातील मतदान ७ मे रोजी होणार असून प्रचाराचा कालावधी संपला आहे. मतदान प्रक्रिया शांततेत आणि कोणताही अनुचित प्रकार न घडता पार पडावी, यासाठी आवश्यक ३ हजार ७६८ अंमलदार, २४२ अधिकारी आणि १ हजार ८०० होमगार्ड यांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. यामध्ये अकोला, सोलापूर, गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यातील अधिकारी, कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. तसेच बीएसएफची एक तुकडी आणि आंध्र प्रदेशातील राज्य राखीव पोलीस दलाच्या चार तुकड्याही जिल्ह्यात आलेल्या आहेत. समाज माध्यमातून मतदारांना आमिष दाखविणे, त्यांच्यावर दबाव आणण्यासारखे प्रकार रोखण्यासाठी सायबर सेल काम करीत आहे. असे प्रकार आढळून आल्यास संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याचे जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी सांगितले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी आदर्श आचारसंहिता कक्षाच्या कार्यवाहीची माहिती दिली. प्रारंभी उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत कदम यांनी निवडणूक सज्जतेबाबत माहिती दिली.

## तीन लाख मतदारांसाठी १,३९८ कर्मचाऱ्यांची नियुक्ती

**तभा वृत्तसेवा,**
**औसा दि. ६ मे-**

धाराशिव लोकसभा मतदार संघ अंतर्गत औसा विधानसभा मतदार संघातील २ लाख ९४ हजार ८६ मतदारांच्या मतदानासाठी सोमवार दि .६ रोजी १३६८ कर्मचाऱ्यांची फौज रवाना झाली असून निवडणुकीसाठी निवडणूक विभाग सज्ज झाला आहे. धाराशिव लोकसभा मतदार संघ अंतर्गत औसा विधानसभा मतदार संघ असून निवडणुक अधिकारी तथा उपविभागीय आधिकारी अविनाश कोरडे, तहसिलदार भरत सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली गटविकास अधिकारी युवराज गायकवाड, औसा नगरपालिकेचे प्रशासन अधिकारी तथा उपायुक्त रामदास कोकरे, नायब तहसीलदार इंद्रजित गरड, सुरेश पाटील, अजय पाटील, दत्ता कांबळे यांनी चोख बंदोबस्त केला आहे. औसा विधानसभा मतदार संघातील ३०७ मतदान केंद्र आहेत. तर २ लाख ९४ हजार ८६ स्त्री आणि पुरुष मतदार आहेत. या मतदारांचे मतदान शांततेत पार पाडण्यासाठी १३६८ कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यापैकी ७५० पोलीस कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. मंगळवार दि.७ मे रोजी सकाळी ५.३० वाजता मतदार संघातील मतदान केंद्रात उमेदवारांचे प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत प्रत्येक प्रतिनिधीचे एक असे प्रत्येक मशीनमधून किमान ५० अभिरुप मतदान करण्यात येणार आहेत. यानंतर सकाळी ७ वाजता मतदानासाठी मशीन सज्ज करण्यात येणार आहे. या मतदार संघातील ३०७ मतदान केंद्रावर मतदारांना शांततेत मतदान करता यावे, यासाठी ७५० पोलिसांचा बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. यावर्षीच्या उन्हाळ्यातील उष्णतेची लाट लक्षात घेऊन उपाययोजना करण्याचे निर्देश भारत निवडणूक आयोगाने दिले आहेत. त्यानुसार प्रत्येक केंद्रात पिण्याचे पाणी तसेच आरोग्य विभागाअंतर्गत प्रथमोउपचाराच्या सर्व सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत रुग्णवाहिका सेवा उपलब्ध करण्यात आली आहे. मतदारांनी मतदान करुन या निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढवावी. तसेच मतदान शांततेत पार पाडून निवडणूक विभाग, कर्मचारी व प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन निवडणूक अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी आविनाश कोरडे यांनी केले आहे.

**औसा मतदार संघातील निवडणुकीसाठी निवडणूक विभाग सज्ज**



## निवडणूक खर्च निरीक्षक बॅनजी यांची चेक पोस्टला भेट

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि.६ मे-**

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीमध्ये लातूर लोकसभा मतदारसंघासाठी भारत निवडणूक आयोगाने नियुक्त केलेले निवडणूक खर्च निरीक्षक संजीब बॅनर्जी यांनी आज रात्री अचानक आंतरराज्य सीमेवरील स्थिर निगराणी पथकांना (चेकपोस्ट) भेट देवून तेथील कामकाजाचा आढावा घेतला.

लातूर जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, गट विकास अधिकारी संतोष माने यावेळी उपस्थित होते. लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीचा जाहीर प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर निवडणूक यंत्रणा अधिक सतर्कतेने कार्यरत झाली आहे. रोकड, मद्य किंवा इतर प्रतिबंधित पदार्थ, वस्तूंची वाहतूक होवू नये, यासाठी स्थिर निगराणी पथकावर वाहनांची तपासणी केली जात आहे. या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी निवडणूक खर्च निरीक्षक बॅनर्जी यांनी तोगरी व तादलापूर येथील स्थिर निगराणी पथकाला भेट दिली.

# कर्मचाऱ्यांचे पथक मतदान केंद्रांकडे रवाना

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि.६ मे -**



भारत निवडणूक आयोगाने घोषित केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार लातूर लोकसभा मतदारसंघात मंगळवारी, (दि. ७) सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत मतदान होणार आहे.

यासाठी मतदान पथके रवाना झाली. मतदान केंद्रावर नियुक्त मतदान पथकांशी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी संवाद साधून त्यांना शुभेच्छा दिल्या.

तसेच मनावर कोणतेही दडपण न घेता आपल्यावर सोपविलेली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडावी, अशा सूचना केल्या. जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः संवाद साधल्याने आपल्या मनावरील दडपण कमी झाले असून आता अधिक उत्साहाने मतदान कर्तव्य पार पाडणार असल्याचे यावेळी उपस्थित अधिकारी, कर्मचारी यांनी सांगितले.

पुरणमल लाहोटी शासकीय तंत्र निकेतन येथे लातूर ग्रामीण मतदारसंघ क्षेत्रातील मतदान पथकांना मतदान साहित्य वाटपाच्या कामकाजाची जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी पाहणी केली. तसेच यासाठी नियुक्त अधिकारी, कर्मचारी यांच्याकडून त्यांच्या कामाची माहिती जाणून घेतली. याठिकाणी उपस्थित पोलीस अधिकारी, कर्मचारी यांच्याशीही त्यांनी संवाद साधला. सहायक जिल्हाधिकारी नमन गोयल, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी प्रियांका आयरे, तहसीलदार मंजुषा भगत यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

लातूर शहर विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातील मतदान साहित्य वाटप शासकीय महिला निवासी तंत्र निकेतन येथे करण्यात आले. याठिकाणी सुरु असलेल्या कामकाजाची पाहणी करून जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी मतदान पथकातील अधिकारी, कर्मचारी यांच्याशी संवाद साधला.

निवडणूक सामान्य निरीक्षक निरंजन कुमार यांनीही याठिकाणी भेट देवून कामकाजाची माहिती घेतली. सर्व मतदान पथके मतदान केंद्रांवर रवाना झाली. २ हजार १२५ मतदान केंद्रांवर नियुक्त मतदान पथकांमध्ये ८ हजार ५०० अधिकारी, कर्मचारी यांचा समावेश आहे

## मतदान यंत्र सुरक्षा कक्षाची निवडणूक निरीक्षकांकडून पाहणी

**लातूर, दि. ६ मे -**

लातूर शहरातील बार्शी रोडवरील शासकीय महिला निवासी तंत्रज्ञान येथे तयार करण्यात आलेल्या मतदान यंत्र सुरक्षा कक्षाला निवडणूक सामान्य निरीक्षक निरंजन कुमार यांनी भेट दिली. तसेच याठिकाणी मतदान यंत्र वितरण आणि जमा करून घेण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांची माहिती घेतली. उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत कदम, उपविभागीय अधिकारी तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, तहसीलदार सौदागर तांदळे यावेळी उपस्थित होते.

## नारायण देव जोशी यांचे निधन

**लातूर दि. ६ मे-**



नळेगाव तालुका चाकूर येथील जेष्ठ नागरिक नारायण देव सामदेव जोशी वय वर्ष ७५ यांचे दीर्घ आजाराने लातूर येथे राहत्या घरी सोमवारी सकाळी आठ वाजता निधन झाले त्यांच्यावर लातूर येथे खाडगाव स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुली, २ मुले, पत्नी असा परिवार आहे लातूर येथील पत्रकार हरीराम कुलकर्णी यांचे ते सासरे होत तर देशिकेंद्र शाळेतील सहशिक्षिका सुलभा जोशी (कुलकर्णी) यांचे ते वडील होत.

# उदगीर मतदारसंघात ३ लाख १४ हजार मतदार बजावणार हक्क

**तभा वृत्तसेवा,**
**उदगीर, दि.६ मे-**

लातूर लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी मंगळवार (दि. ७) रोजी मतदान होणार आहे. उदगीर विधानसभा मतदारसंघातील तीन लाख तेरा हजार ५८२ मतदारांना मतदानाचा हक्क आहे. त्यात पुरुष मतदार संख्या एक लाख ६३ हजार ५४१ तर महिला मतदारसंख्या एक लाख ४९ हजार ३०६ इतकी आहे. उदगीर विधानसभा मतदारसंघात पुरुष मतदारांपेक्षा १४ हजार २३५ ने महिला मतदारांची संख्या कमी आहे. या लोकसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी प्रशासनाच्यावतीने अनेक उपक्रम राबवून जनजागृती करण्यात आली. मात्र अनेक मतदार मतदानाचा हक्क असूनही मतदान करण्याकडे दुर्लक्ष करतात. लोकशाही बळकट करण्यासाठी मतदान करणे आवश्यक असल्याचे प्रशासनाकडून वारंवार आवाहन करण्यात आले आहे.

उदगीर विधानसभा मतदार संघामध्ये तृतीयपंथी मतदार संख्या १८ असून सैनिक मतदाराची संख्या ७१७ इतकी आहे. लोकसभा निवडणुकीसाठी एकूण ३३६ मतदान केंद्र आहेत. मतदानाची प्रक्रिया पार पाडण्यासाठी एकूण ३७३ मतदान पथके गठीत करण्यात आलेली आहेत. या ३३६

मतदान केंद्रावर मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी एकूण १५९६ इतके मनुष्यबळ नियुक्त करण्यात आलेले आहेत. लोकसभा सार्वत्रिक निवडणूक प्रक्रिया पार पाडण्याच्या अनुषंगाने कर्मचाऱ्यांना स्क्रीनद्वारे प्रशिक्षण आणि प्रत्यक्ष इव्हीएम मशीन हाताळण्याचे दोन वेळा प्रशिक्षण देण्यात आले. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे या निवडणुकीत पहिल्यांदाच ८५ वर्षांपेक्षा अधिक वयाचे वयोवृद्ध आणि दिव्यांग मतदारांसाठी 'होम वोटिंग' अशी सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. उदगीर विधानसभा मतदारसंघात ८५ वर्षांपेक्षा अधिक वयाच्या ज्येष्ठ मतदारांची संख्या सुमारे ३५०० तर दिव्यांग मतदारांची संख्या सुमारे ३२०० इतकी आहे. या वयोवृद्ध व दिव्यांग मतदारांना त्यांच्या घरूनच मतदान करण्याचा पर्याय देण्यात आलेला आहे. ज्येष्ठ व दिव्यांग मतदारांचा बीएलओमार्फत सर्वे करून त्यांना 'होम वोटिंग' पर्याय देण्यात आला होता. ज्या मतदारांना मतदान केंद्रावर जाणे शक्य नाही अशा मतदारांनी 'होम वोटिंग' हा पर्याय देण्यात आला होता. 'होम वोटिंग' हा पर्याय निवडलेल्या मतदारांचे मतदान फिरत्या पथकाद्वारे घरी जाऊन त्यांचे पोस्टल बॅलेटद्वारे गोपनीय

पद्धतीने सुरक्षेसह पोस्टल मतदान करून घेण्यात आले. उदगीर विधानसभा मतदारसंघातील एकूण ३३६ मतदान केंद्रावर मंगळवारी मतदान होणार आहे. सोमवारी ईव्हीएम, व्हीव्हीपॅट यंत्रे घेऊन कर्मचारी मतदान प्रक्रियेसाठी रवाना होणार आहेत. यासाठी एसटी महामंडळाच्या २८



बसेस, ५० खासगी क्रुझर जीपचा कर्मचाऱ्यांच्या वाहतुकीसाठी घेण्यात आलेल्या आहेत. तर घोणसी (ता. जळकोट) आणि उदगीर शहरातील शासकीय अध्यापक महाविद्यालय असे दोन मतदान केंद्र संवेदनशील आहेत. ४१ मतदान क्षेत्रीय अधिकारी यांच्यासोबत व्हिडिओग्राफी पथक असणार आहेत. मतदारसंघात दोन वाहने गस्तीवर राहणार असल्याची माहिती नायब तहसीलदार संतोष गुट्टे यांनी दिली आहे. तर लोकसभा निवडणुकीच्या मंगळवारी पार पडणाऱ्या मतदान प्रक्रियेसाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली आहे. सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी सुशांत शिंदे, उदगीरचे तहसीलदार राम बोरगावकर, जळकोटच्या तहसीलदार सुरेखा स्वामी, नायब तहसीलदार संतोष गुट्टे आदी अधिकारी मतदान प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी प्रयत्नशील आहेत.



## निवडणूक सामान्य निरीक्षक निरंजन कुमार यांची विविध मतदान कक्षांना भेट

**मतदान पूर्वतयारीचा आढावा**

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि.६ मे-**

लातूर लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक सामान्य निरीक्षक निरंजन कुमार यांनी आज जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयातील विविध कक्षांना भेट देवून मतदानाच्या अनुषंगाने करण्यात आलेली पूर्वतयारीचा आढावा घेतला.

उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत कदम, लघुपाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता रोहित जगताप, नायब तहसीलदार पंकज मंदाडे यावेळी उपस्थित होते. तक्रार निवारण कक्ष, सी-व्हीजील कक्ष, प्रसारमाध्यम कक्ष आणि एनआयसी कक्षाला त्यांनी भेट देवून आवश्यक सूचना केल्या.

एनआयसी कक्षामध्ये जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी प्रदीप डूमणे यांनी मतदानादिवशी विविध अहवाल संकलित करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या प्रणालीची माहिती दिली.

तसेच प्रसारमाध्यम कक्षात नोडल अधिकारी तानाजी घोलप यांनी मतदाना दिवशी आणि मतदानाच्या एक दिवस अगोदर करण्यात येणाऱ्या कार्यवाहीबाबत माहिती दिली. यावेळी विभागीय माहिती कार्यालयाचे सहायक संचालक डॉ. श्याम टरके, उपसंपादक रेखा गायकवाड यांच्यासह प्रसारमाध्यम कक्षातील विविध अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.